# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०९/ २०१७** **दिनांक ०८.०९.२०१७**
**स्थळ- साईनिवास अतिथीगृह, शिर्डी** **वेळ- दुपारी १२.०० वाजता**

श्री साईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा शुक्रवार दिनांक ०८.०९.२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये आयोजित करण्यात आली असलेबाबत, इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २९२२/ २०१७, दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा शुक्रवार दिनांक ०८.०९.२०१७ रोजी दुपारी १२.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील साईनिवास अतिथीगृहामध्ये मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

०१. मा.श्री.सुरेश काशिनाथ हावरे, अध्यक्ष ०२. मा.श्री.चंद्रशेखर लक्ष्मणराव कदम, उपाध्यक्ष
०३. मा.श्री.भाऊसाहेब राजाराम वाकचौरे, सदस्य ०४. मा.श्री.बिपीनदादा शंकरराव कोल्हे, सदस्य
०५. मा.सौ.योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या

मा.श्रीमती रुबल अग्रवाल, भा.प्र.से.
मुख्यकार्यकारी अधिकारी

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.

सदरहू सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत, समिती सदस्य मा.ॲड. मोहन मोतीराम जयकर व मा.श्री.प्रताप सखाहारी भोसले व यांनी दूरध्वनीद्वारे तसेच मा.डॉ.राजेंद्र राजाबाली सिंग यांनी ई-मेलद्वारे कळविले होते.

त्याचप्रमाणे समिती सदस्य मा.डॉ.मनीषा कायंदे, मा.श्री.रविंद्र गजानन मिर्लेकर व मा.श्री.अमोल गजानन कीर्तिकर यांनी कोणतीही पुर्व सुचना देता, ते सभेसाठी अनुपस्थित होते. याची नोंद घेऊन, समितीने त्यांना अनुपस्थित राहण्याची अनुमती दिली.

सभेस आवश्यक गणपुर्ती नसल्यामुळे विधी व न्याय विभागाकडील दि.१३ जुलै, २०१७ रोजीचे अधिनियम दुरुस्तीतील कलम ३ (क) पोटकलम (२) मधील तरतूदीनुसार तीस मिनीटाकरीता सभेचे कामकाज तहकुब करणेत येऊन, त्यानंतर दुपारी १२.३० वाजता मा.अध्यक्ष महोदय यांनी विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

**विषय नं.०१** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजीत करावयाचे विविध धार्मीक, सांस्कृतीक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमास अंतीम स्वरुप देणे व मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.
२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.
३. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम २(ठ) अन्वये, श्री साईबाबांचे जीवन, त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण यांबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार व प्रसार करील आणि श्री साई साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील.

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय-**

१. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १७१.
२. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २७७.
३. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२८०.
४. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २३/०५/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ३५८.
५. मा. व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५१९.
६. मा. व्यवस्थापन समितीचे दि. २५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६५४, ६७१, ६७२.
७. मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक- ६८२

**प्रस्तावना-** थोर संत श्रीसाईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. यासाठी संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करणे जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे.

**प्रस्ताव–** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे नियोजन केल्यास संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईलया दृष्टीकोनातून आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे यशस्वितेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे वेळोवेळी झालेल्या बैठंकातील निर्णयानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही केलेली आहे.

**अ) <u>धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाचे वेळापत्रक-</u>**

आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चातसेच वेळोवेळी मा. व्यवस्थापन समितीच्या झालेल्याबैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते. सदरचे प्रारुप वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत सादर करण्यात आलेत्यास मान्यता मिळालेली आहे परंतु त्यातील काही बांबीबाबत प्रशासकीयदृष्ट्या अंमलबजावणी करणे अडचणीचे ठरत असल्याने त्यात काही बदल सुचवुन सुधारीत वेळापत्रक सादर करणेत आले होते. त्यावर मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६८२ नुसार काही बदल सुचविणेत आले व त्यानुसार आता धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची सुधारीत रुपरेषा (वेळापत्रक) सोबतचे **<u>परिशिष्ट अ</u>** मध्ये नमूद केली आहे.

**ब) <u>साईभजन संध्या कलाकार निश्चिती व मानधन -</u>**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक सादर करणेत आले होते. त्यावर निर्णय क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"*धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे स्वरूप पाहून संबंधीतांना मोफत कार्यक्रम सेवा सादर करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात यावे. जे कलाकार मोफत कार्यक्रम सादर करणेस तयार नसतील, अशा कलाकारांकडून मानधनाबाबतचा प्रस्ताव घेऊन, या कार्यक्रमांसाठी देणगीदार/ प्रायोजक मिळतात का, ते पहावे अन्यथा त्यांच्या मानधनाबाबत व्यवस्थापन समिती उचित निर्णय घेईल.*"

शताब्दी वर्षातील आयोजित कार्यक्रमांसाठी मा व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयानुसार दि.१५/०६/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवासाठी आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी नामवंतकलाकार निश्चित करणेस व कलाकार निश्चित झालेनंतर त्यांना निंमंत्रीत करणेसाठी पत्रव्यव्हार करणेस तसेच त्यांचे मानधन निश्चित करणेसाठीचा प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर निर्णय क्रं. ४९५ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी सोबत परिशिष्ट म्हणून सादर केलेल्या नामांकित कलाकारांच्या यादीमधील कलाकारांशी संपर्क करुन, ते शिर्डी येथे कार्यक्रम सादर करणेस तयार आहेत का, ते पहावे व त्यांचे मानधनासह तारखा घेण्यात येऊन, याबाबतचा फेरप्रस्ताव व्यवस्थापन समिती सभेसमोर सादर करणेत यावा."

उपरोक्त निर्णयास अनुसरुन कार्यवाही करताना काही कलाकारांचे दूरध्वनी उपलब्ध न झाल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला नाही तसेच त्यातील काही कलाकारांनी प्रतिसाद न दिल्याने दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत साईभजन संध्या कार्यक्रमांसाठी (मानधनासह व मोफत अशा ०२ स्वतंत्र) कलाकारांची यादी सादर केली होती. सदर सभेतील निर्णयास अनुसरुन स्थानिक उपसमितीसमोर सुधारीत यादी स्वतंत्रपणे सादर करणेत येत आहे.

**क) <u>सांस्कृतिक कार्यक्रम कलाकार निश्चिती व मानधन-</u>**

मा.व्यवस्थापन समितीचे दि. १५/०६/२०१७ रोजीचे सभेत झालेल्या निर्णयास (४९५) अनुसरुन अनुसरुन कार्यवाही करताना काही कलाकारांचे दूरध्वनी उपलब्ध न झाल्याने त्यांच्याशी संपर्क होऊ शकलेला

नाही तसेच त्यातील काही कलाकारांनी प्रतिसाद न दिल्याने मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत साईभजन संध्यासाठी (मानधनासह व मोफत अशा ०२ स्वतंत्र)कलाकारांची यादी सादर केली होती. सदर सभेतील निर्णयास अनुसरुन स्थानिक उपसमितीसमोर सुधारीत यादी स्वतंत्रपणे सादर करणेत येत आहे.

ड) **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवी वर्षातील प्रवचन कार्यक्रमाची सद्यस्थिती**

शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले होते. सदर प्रारुप वेळापत्रकात शताब्दी वर्षातील प्रत्येक महिन्यात नामवंत प्रवचनकारांच्याप्रवचनांचा कार्यक्रमांचासमावेश केलेला आहे. सदरहू वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रमाचे आयोजनासाठी सदर प्रवचनकारांना ई-मेल, दुरध्वनीव पत्रव्यवहार करुन संपर्क करणेत आला. त्यानुसार खालीलप्रमाणे सदर कार्यक्रमाचे आयोजनाबाबतची आजतागायतची सद्यस्थिती व नव्याने प्रस्तावित प्रवचनकारांची माहिती मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत सादर केली होती. सदर सभेतील निर्णयास अनुसरुन स्थानिक उपसमितीसमोर सुधारीत यादी स्वतंत्रपणे सादर करणेत येत आहे.

इ) **शताब्दी वर्षात आयोजित उत्सवांकरीता किर्तन कार्यक्रम-**

दरवर्षी साज-या होणा-या पारंपारीक उत्सवामध्ये विविध नामवंत नारदीय किर्तनकारांचे किर्तन कार्यक्रम आयोजित केले जातात. करीता याही वर्षी श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात साजरे होणारे श्री पुण्यातिथी, गुरुपौर्णिमा व रामनवमी उत्सवात विविध नामवंत नारदीय किर्तनकारांचे किर्तन कार्यक्रम साजरे करावयाचे नियोजन आहे. तरी शताब्दी वर्षाचे दृष्टीकोनातून किर्तन कार्यक्रम ठरविणेसाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत सादर केली होती. सदर सभेतील निर्णयास अनुसरुन स्थानिक उपसमितीसमोर सुधारीत यादी स्वतंत्रपणे सादर करणेत येत आहे.

उपरोक्तकामी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ६८२ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या विविध प्रस्तावित धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमाची खालीलप्रमाणे सुधारित रुपरेषा ठरविणेत आली.

तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठीचे कलाकार व त्यांचे मानधन याचे परिशिष्ट ब, क, ड व इ सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार व त्यांचे मानधन स्थानिक उपसमितीने छाननी करुन कार्यक्रम निश्चित करावेत. त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्वप्रकारच्या कार्यक्रमांसाठी, अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एकाकार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रु.३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, सांऊंड सिस्टीम, विद्युत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था, आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणारा खर्च व इतर अनुषंगिक खर्चासही मान्यता देण्यात आली.तरी श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्ष भव्य स्वरुपात साजरे करण्याचे दृष्टीकोनातून साईभजन संध्या, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांबाबत खालील बाबींवर धोरणात्मक निर्णय होणे अपेक्षित आहे.

१) शताब्दी वर्षात आयोजित साईभजन संध्या, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांची रुपरेषा निश्चित करणे व वेळापत्रक अंतिम करणे.

२) शताब्दी वर्षात आयोजित साईभजन संध्या, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांकरीता प्रवचनकार, किर्तनकार, कलाकार निश्चित करणे.

३) शताब्दी वर्षात आयोजीत केलेल्या कार्यक्रमांमध्ये कोणता कार्यक्रम कोणत्या ठिकाणावर (स्थळ) असावा याबाबत निर्णय घेणे.

४) शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक व साईभजन संध्या कार्यक्रमांसाठी कलाकार, प्रवचनकार तसेच किर्तनकार यांचे मानधन निश्चित करणे.

तरी उपरोक्त नमूद बाबींवर धोरणात्मक निर्णय होणेसाठी सविनय सादर.

**निर्णय क्र.७५०** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ या कालावधीत आयोजीत करावयाचे विविध धार्मीक, सांस्कृतीक कार्यक्रम व पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमांबाबत सविस्तर चर्चा होऊन, त्यास खालीलप्रमाणे अंतीम स्वरुप देण्यात आले.**

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-१८ मध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक**,** सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे सुधारीत वेळापत्रक खालीलप्रमाणे-

**माहे सप्टेंबर- २०१७**

| वार/ दिनांक/ दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रमाचे ठिकाण |
|---|---|---|---|
| शुक्रवार,२९/०९/२०१७ श्रीपुण्यतिथी उत्सव प्रथम दिवस | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक -** पंडीत विजय घाटे व इतर कलाकार (तालवाद्य कचेरी) यांचा कार्यक्रम | साईनगर मैदान |
| शनिवार,३०/०९/२०१७ श्री पुण्यतिथी उत्सव मुख्य दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साईनगर मैदान |

**माहे ऑक्टोबर- २०१७**

| वार/ दिनांक/ दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| रविवार, ०१/१०/२०१७ पुण्यतिथी उत्सव तिसरा दिवस/ एकादशी तथा शताब्दी महोत्सव प्रारंभ दिवस | स. ६ ते ९ | **धार्मिक-** १) ध्वज शोभायात्रा (शिर्डीतून) | शिर्डी गावातून |
| | स.०७.३० | २) गणेश याग यज्ञ- उपासनी कन्याकुमारी स्थान, साकुरी ता. राहाता यांचेमार्फत | लेंडीबाग दत्त मंदिर |
| | स.०९.३० | ३) ध्वजारोहण कार्यक्रम – मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण | लेंडीबाग |
| | स.१० ते ११.३० | ४) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे उपस्थितीत मुख्य उदघाटन कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |
| | दु. १२.३० | **सामाजिक-** १) नेत्र तपासणी व चष्मेवाटप–डॉ.प्रकाश गंगवाणी,मुंबई २) नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर- डॉ. कुलीन कोठारी, मुंबई व इतर (जगभरातील सर्व साई मंदिरामार्फत जागतिक पातळीवर नेत्र तपासणी व शस्त्रक्रिया शिबीर कार्यक्रम) | श्रीसाईनाथ रुग्णालय |
| | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** महानाट्य – सबका मालिक एक है | साईनगर मैदान |
| सोमवार,०२/१०/२०१७ पुण्यतिथी उत्सव चौथा दिवस | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |
| गुरुवार,दि.१२/१०/२०१७ ते शनिवार,१४/१०/२०१७ ०२ दिवस | | **पादुका दर्शन सोहळा-** साई सेवा ट्रस्ट, पणजी (गोवा) | |
| रविवार, दि.१५/१०/२०१७ | | **पादुका दर्शन सोहळा-** श्रद्धा पदयात्रिक मित्र मंडळ, कनकवली (महाराष्ट्र) | |
| सोमवार, दि.१६/१०/२०१७ | | **पादुका दर्शन सोहळा-** श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, क-हाड (महाराष्ट्र) | |
| शनिवार,२८/१०/२०१७ | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |

**माहे नोव्हेंबर- २०१७**

| वार/ दिनांक/ दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| बुधवार दि.०८/११/२०१७ ते गुरुवार दि.०९/११/२०१७ | | **पादुका दर्शन सोहळा -** ऑल ईंडिया साई समाज, मैलापुर- चेन्नई (तामिळनाडू) | |
| शुक्रवार दि.१०/११/२०१७ व शनिवार दि.११/११/२०१७ | | **पादुका दर्शन सोहळा -** शिर्डी साई ट्रस्ट, पाटीपुलम (श्री.रमणी) व - कमलासाई शिर्डी साई सेवा समिती, पॉडीचेरी | |

| | | | |
|---|---|---|---|
| रविवार, दि.१२/११/२०१७ ते सोमवार, दि.१३/११/२०१७ | | **पादुका दर्शन सोहळा -** नागासाई ट्रस्ट, श्री नागासाई मंदिर, कोईमतूर (तामिळनाडू) | |
| मंगळवार दि.१४/११/२०१७ | | **पादुका दर्शन सोहळा -** शिर्डी साईबाबा डिव्होटीज ट्रस्ट, चेन्नई (तामिळनाडू) | |
| गुरुवार, दि.०९/११/२०१७ ते सोमवार, दि.२७/११/२०१७ | | **पादुका दर्शन सोहळा -** श्री दत्त पीठम, अमेरिका | |
| शनिवार,११/११/२०१७ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| मंगळवार,दि.१४/११/२०१७ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** शैक्षणिक संकुलामार्फत बाल दिनानिमित्त कार्यक्रम- | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| शनिवार,२५/११/२०१७ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |

**माहे डिसेंबर -२०१७**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| रविवार दि.१७/१२/२०१७ ते सोमवार दि.१८/१२/२०१७ | | **पादुका दर्शन सोहळा-** शिर्डी साईधाम धर्मार्थ संस्था, भोपाळ (मध्यप्रदेश) | |
| शनिवार, २३/१२/२०१७ | स.१० ते ६ | **धार्मिक-** जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद (ग्लोबल साई टेंम्पल ट्रस्ट सम्मीट) चर्चासत्र –देशातील व विदेशातील साईमंदिरे | साईआश्रम -०१ |
| | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साईभजन संध्या – श्री.अजित कडकडे, श्री.सुखविंदर सिंग | |
| रविवार, २४/१२/२०१७ – | | **धार्मिक-** जागतिक साईमंदिर विश्वस्त परिषद (ग्लोबल साई टेंम्पल ट्रस्ट सम्मीट) चर्चासत्र –विदेशातील साईमंदिरे | प्रसादालय हॉल/ साईआश्रम -१ |
| रविवार, २४/१२/२०१७ ते रविवार, ३१/१२/२०१७ – एकूण ०८ दिवस | रा.७ ते१० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |

**माहे जानेवारी- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| सोमवार ०१/०१/२०१८ | स.१० ते ६ | **सामाजिक –** रक्तदान शिबीर व जगभरातील सर्व साई मंदिरामार्फत रक्तदान शिबीर आयोजित करणेसाठी आवाहन | साईनगर मैदान / १६ गुंठे परिसर |
| गुरुवार दि.०४/०१/२०१८ ते शनिवार दि.०६/०१/२०१८ | | **पादुका दर्शन सोहळा-** साई विश्व समस्त साई भक्त मंडळ, सुरत (गुजरात) | |
| रविवार दि.०७/०१/२०१८ ते सोमवार दि.०८/०१/२०१८ | | **पादुका दर्शन सोहळा-** शिर्डी साईबाबा समाज सेवा संस्थान, अहमदाबाद (गुजरात) | |
| शनिवार, १३/०१/२०१८ | | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| गुरुवार, दि.२५/०१/२०१८ ते बुधवार, दि.३१/०१/२०१८ | | **पादुका दर्शन सोहळा-** श्री सदगुरु साई चॅरीटेबल ट्रस्ट, नागपूर व विदर्भ (महाराष्ट्र) | |
| शुक्रवार, २६/०१/२०१८ – भारतीय प्रजासत्ताक दिन | | **सांस्कृतिक -** चित्ररथ – दिल्ली येथे राजपथावर श्री साईबाबांचे जीवनचरित्रावर आधारीत- प्रस्तावित आहे. | दिल्ली |
| | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| शनिवार-२७/०१/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| बुधवार ३१/०१/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या – साईसंगम सेवाभावी संस्था, शिर्डी | साईनगर मैदान |

**माहे फेब्रुवारी- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| गुरुवार, दि.०१/०२/२०१८ ते रविवार, दि.०४/०२/२०१८ | | **पादुका दर्शन सोहळा-** श्री सदगुरु साई चॅरीटेबल ट्रस्ट, नागपूर (महाराष्ट्र) विदर्भ | |
| गुरुवार,०१/०२/२०१८ते शनिवार,०३/०२/२०१८ ०३ दिवस | रा.७ ते १० | **धार्मिक-** प्रवचन – विद्यावाचस्पती श्री. शंकर अभ्यंकर (विषय- संत/महंत, स्वामी विवेकानंद, महापुरुष/राष्ट्रपुरुष यावर आधारीत) | साईआश्रम -०१ |
| शनिवार-१०/०२/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |
| शनिवार-२४/०२/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |

**माहे मार्च -२०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| शनिवार,१०/०३/२०१८ | रा.०७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| गुरुवार, १५/०३/२०१८ | स.१० ते रा.१० | **सामाजिक -** शिर्डी येथे अन्नदान कार्यक्रम व जागतिक स्तरावर अन्नदान कार्यक्रम आयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईप्रसादालय |
| शनिवार,२४/०३/२०१८ - रामनवमी उत्सव प्रथम दिवस | रा.०७ ते १० | **सांस्कृतिक -** गीत रामायण- श्रीधर फडके | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| रविवार, २५/०३/२०१८- रामनवमी उत्सव मुख्य दिवस | स. ०६ वा. | **धार्मिक-** कावडी कार्यक्रम- गंगा, गोदावरी, सिंधू,कावेरी आदि नद्यांचे पाण्याने श्रींना स्नान | समाधी मंदिर |
| | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| सोमवार २६/०३/२०१८- श्री रामनवमी उत्सव सांगता दिवस | रा.०७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |

**माहे एप्रिल- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| गुरुवार, ०५/०४/२०१८ ते रविवार, ०७/०४/२०१८ - ०३ दिवस | स.०७ ते ११ | **धार्मिक -** प्रवचन – श्री अवधूत शिवानंद महाराज – शिवयोग सत्संग (ऋषी ते कृषी) | साई आश्रम-१ |
| शनिवार, १४/०४/२०१८ | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| शनिवार,२८/०४/२०१८ | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| **ठिकाण व दिनांक निश्चित करणे** | | **पादुका दर्शन सोहळा-** | |

**माहे मे- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| मंगळवार, ०८/०५/२०१८- जागतिक रेडक्रॉस दिन | स.१० ते ०५ | **सामाजिक –** शिर्डी येथे नेत्रदान व अवयवदान संकल्प राबविणेसाठी नाव नोंदणी. (उपस्थिती डॉ तात्याराव लहाने, डीन, ग्रॅण्ट मेडीकल कॉलेज / जे.जे हॉस्पीटल मुंबई) - जगातील सर्व साई मंदिरांमार्फत नेत्रदान व अवयवदान संकल्प कार्यक्रम नाव नोंदणी करणेसाठी आवाहन करणे. | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर/ श्री साईबाबा हॉस्पिटल |
| शनिवार,१२/०५/२०१८ | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| गुरुवार,१७/०५/२०१८ ते शनिवार, १९/०५/२०१८ -०३ दिवस | -- | **धार्मिक -** आधिकमासा निमित्त विष्णुयाग यज्ञ | लेंडीबाग दत्त मंदिरासमोर |
| **ठिकाण व दिनांक निश्चित करणे** | | **पादुका दर्शन सोहळा-** | |

**माहे जून- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| बुधवार ,०६/०६/२०१८ ते मंगळवार,१२/०६/२०१८-०७ दिवस | रा. ७ ते १० | **धार्मिक -** प्रवचन – रामायण - ह.भ.प. श्री. रामराव महाराज ढोक | साईनगर मैदान |
| शनिवार,२३/०६/२०१८- | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| **ठिकाण व दिनांक निश्चित करणे** | | **पादुका दर्शन सोहळा-** | |

**माहे जूलै- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| रविवार,१/०७/२०१८(वनदिन) ते शनिवार, ७/०७/२०१८ - एकूण ०७ दिवस वनसप्ताह | स. १० ते ०५ | **सामाजिक -** वृक्षारोपण कार्यक्रम व जगभरातील सर्व साई मंदिरांद्वारे वृक्षारोपण अभियान राबविण्यासाठी आवाहन | शिर्डी परिसर |
| शनिवार, १४/०७/२०१८- | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| गुरुवार,२६/०७/२०१८- गुरुपौर्णिमा उत्सव प्रारंभ दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| शुक्रवार,२७/०७/२०१८ - गुरुपौर्णिमा उत्सव मुख्य दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** पंडीत हरीप्रसाद चौरासिया | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| शनिवार, २८/०७/२०१८- गुरुपौर्णिमा उत्सव सांगता दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| **ठिकाण व दिनांक निश्चित करणे** | | **पादुका दर्शन सोहळा-** | |

**माहे ऑगष्ट- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| शनिवार, ११/०८/२०१८ | रा. ०७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| शनिवार, २५/०८/२०१८ | रा. ०७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| सोमवार, २७/०८/२०१८ ते सोमवार, ०३/०९/२०१८ – एकूण ०८ दिवस | | **धार्मिक-** श्री साईचरित्र पारायण- शिर्डी (ग्रामस्थांचे सहभागाने) व जगभरातील सर्व साई मंदिरा मध्ये त्या- त्या भाषेतील साईचरीत्र पारायण सोहळा आयोजित करणेसाठी आवाहन | शेती महामंडळ जमीन/ साईनगर मैदान |
| गुरुवार,३०/०८/२०१८ | स. १० ते ०५ | **सामाजिक -** हृदयरोग निदान शिबिर व जगभरातील सर्व साईमंदिरामार्फत शिबीर आयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| **ठिकाण व दिनांक निश्चित करणे** | | **पादुका दर्शन सोहळा-** | |

**माहे सप्टेंबर- २०१८**

| वार/ दिनांक/दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| सोमवार,०३/०९/२०१८ ते गुरुवार,०६/०९/२०१८- ०४ दिवस | -- | **धार्मिक-** श्रावण मासात रूद्र स्वाहःकार यज्ञ. | लेंडीबाग दत्त मंदिर |
| शनिवार, ०८/०९/२०१८ | रा. ०७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| गुरुवार, १३/०९/२०१८- श्री गणेश चतुर्थी (श्रीसाईनाथ स्तवन मंजरी शतकपूर्ती दिन) | स.७.३० | **धार्मिक-** सामुहिक स्तवनमंजरी पठण- जगभरातील सर्व साई मंदिरांमध्येएकाच दिवशी स्तवनमंजरी पठणाचा कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोरील १६ गुंठे परिसर |
| गुरुवार, १३/०९/२०१८- श्री गणेश चतुर्थी (श्रीसाईनाथ स्तवन मंजरी शतकपूर्ती दिन) | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| मंगळवार, दि.१८.०९.२०१८ ते मंगळवार, दि.२५.०९.२०१८ | रा.७ ते १० | **धार्मिक- प्रवचन-** श्री शिवकृपानंद स्वामीजी (आत्मज्ञान व मानवधर्म) | साई आश्रम-१ |
| शनिवार, २२/०९/२०१८ | रा. ०७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर/ साई आश्रम-१ |
| **ठिकाण व दिनांक निश्चित करणे** | | **पादुका दर्शन सोहळा-** | |

**माहे ऑक्टोबर- २०१८**

| वार/ दिनांक/ दिनविशेष | वेळ | कार्यक्रमाचे स्वरुप | कार्यक्रम ठिकाण |
|---|---|---|---|
| बुधवार, १०/१०/२०१८ | रा. ७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |
| गुरूवार, ११/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |
| शुक्रवार, १२/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या/ इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर- १६ गुंठे परिसर |

| | | | |
|---|---|---|---|
| शनिवार, १३/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| रविवार, १४/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| सोमवार १५/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| मंगळवार, १६/१०/२०१८ | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| बुधवार, १७/१०/२०१८ - पुण्यतिथी पहिला दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| गुरूवार, १८/१०/२०१८- पुण्यतिथी मुख्य दिवस | --- | श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव २०१७-१८ समारोप कार्यक्रम- | शेतीमहामंडळ मैदान/ साईनगर |
| | | १) मान्यवरांच्या हस्ते नियोजित टपाल तिकीट प्रकाशन, | |
| | | २) रु.१००/- मात्रचे नाणे चलनात आणणेबाबतचा कार्यक्रम | |
| | | ३) आय.ए.एस. ॲकॅडमी उदघाटन | |
| | रा.७ ते १० | **सांस्कृतिक -** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |
| शुक्रवार,१९/१०/२०१८- पुण्यतिथी सांगता दिवस | रा.७ ते १० | **सांस्कृतिक-** साई भजन संध्या / इतर सांस्कृतिक कार्यक्रम | साई कॉम्प्लेक्स समोर-१६ गुंठे परिसर |

**प्रस्तावित कार्यक्रम**

| **वार/ दिनांक/ दिनविशेष** | **वेळ** | **कार्यक्रमाचे स्वरुप** | **कार्यक्रम ठिकाण** |
|---|---|---|---|
| | | **प्रवचन- श्री श्री रविशंकर** | |
| | | **प्रवचन- श्री मोरारी बापू** | |
| | | **प्रवचन- श्री चारुदत्त आफळे** | |
| | | **योगगुरु रामदेव बाबा** | |
| रविवार,०३/१२/२०१७ - जागतिक अपंग दिन | स.१० ते ६ | **सामाजिक-** १) जयपूर फुट शिबिर आयोजन<br>२) दिव्यांगाना सायकल वाटप<br>३) कर्णबधिर यांना यंत्रवाटप | श्री साईनाथ रुग्णालय / श्री साईबाबा हॉस्पिटल |
| शनिवार, २४/०२/२०१८ | स.१० ते ६ | सामाजिक- कॅन्सर निदान शिबिर व जगभरातील सर्व साई मंदिरामार्फत शिबीर आयोजित करणेसाठी आवाहन | श्री साईबाबा हॉस्पिटल |
| मार्च-२०१८ | स. ७ ते १०<br>दु. ३ ते ६<br>रा. ७ ते १० | **धार्मिक-** प्रवचन- जीवन विद्या - श्री. प्रल्हाद दादा पै. (विद्यार्थी, महिला, कौटुंबिक या विषयांवर आधारीत) | साईआश्रम-०१ |
| रविवार, २५/०३/२०१८- रामनवमी उत्सव मुख्य दिवस | स. ०६ वा.<br>रा.०७ ते १० | सांस्कृतिक- रामलीला कार्यक्रम | साईआश्रम -०१ |
| सोमवार, २६/०३/२०१८ ते बुधवार, २८/०३/२०१८-०३ दिवस | | कुस्ती स्पर्धा – राष्ट्रीय स्तरावरील हिंद केसरी / महाराष्ट्र केसरी स्पर्धा | शेती महामंडळ जमीन |
| गुरुवार, १६/०८/२०१८ ते गुरुवार, २३/०८/२०१८-०८ दिवस | -- | धार्मिक - श्रावण मास – पं.पु.गंगागीर महाराज -अखंड हरीनाम सप्ताह- (आयोजक ग्रामस्थ ) | शेती महामंडळ जमीन |

**माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये आयोजित करावयाच्या सद्गुरुश्री गंगागिरीजी महाराज सप्ताहासाठी आवश्यक असलेल्या जागेची निश्चिती शिर्डी ग्रामस्थांनी करावी व त्या जागेची लेव्हल करुन मंडप उभारणी, प्रसादाची आमटी तयार करणे, उपवासाच्या दिवशी खिचडीची व्यवस्था करणे ही कामे संस्थानमार्फत करणेत यावी अथवा या सप्ताहासाठी संस्थानमार्फत ठराविक रक्कम देण्यात यावी. यासाठी समिती सदस्य मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिर्डी ग्रामस्थांशी चर्चा करुन, यासाठीचा खर्च व संस्थानचा सहयोग याबाबत समितीस अवगत करावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्ष)

---

**विषय नं.०२** **साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता विविध पायाभूत सोई-सुविधा निर्माण करणेविषयी चर्चा व धोरणात्मक निर्णय घेणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम,२००४ मधिल तरतूदः-** अधिनियमाच्या कलम २१ मधील पोट-कलम (१) च्या खंड (ख) अन्वये "रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पुजा- अर्चा,समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये "भक्तांना मंदिरात देवेतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी सुविधा पुरविणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

**प्रस्तावनाः-** श्री साईबाबा यांच्या समाधीस सन -२०१८ मध्ये १००वर्षे पूर्ण होत असल्याने त्याचे औचित्य साधून श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि. ०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करणेत येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक तसेच सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. समाधी शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांच्या दर्शनासाठी येणा-या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्धकरुन देता याव्यात यासाठी टाटा कन्सल्टींग इंजिनिअर्स, मुंबई यांचेमार्फत कृती आराखडा तयार करणेत आला आहे यासाठी विधी व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२२/१०/२०१३ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली संयुक्त कृती आराखडा समिती गठीत करणेत आली आहे. दि.३१/०३/२०१७ रोजी मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली विधान भवन, मुंबई येथे झालेल्या कृती आराखडा समितीच्या बैठकीत रु.३,०२३.१७ कोटी मात्र खर्चाचे कृती आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. सदरहू कृती आराखडयामध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे मार्फत खालीलप्रमाणे पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करणे विषयी कामे प्रस्तावीत करणेत आले आहेत .

- **प्रथम प्राधान्य गटातील कामे**

| अ.नं | कामाचा तपशिल | अंदाजित खर्च (रू.कोटी) |
|---|---|---|
| ०१ | नियोजित दर्शन रांग प्रकल्प उभारणे | १५७.०० |
| ०२ | साईसृष्टी, प्लॅनेटोरीअमव व्हॅक्स म्युझियम (Sai knowledge) प्रकल्पाचे बांधकाम करणे | १४१.०० |
| ०३ | श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क अंतर्गत लेजर शो आणि सिव्हील वर्क करणे. | ७२.०० |
| ०४ | साई भक्तांकरीता अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था उपलब्ध करून देणे. | १.०० |
| ०५ | नविन भांडार इमारतीचे बांधकाम करणे. | १३.७१ |
| ०६ | भक्तनिवासस्थान इमारतीच्या खोल्यांचे नुतनीकरण करणे. | १४.१० |
| ०७ | संस्थान परिसरातील विदयुत रोहित्रे, विदयुत जनित्र व इलेक्ट्रीकल पॅनेल बोर्ड व केबल इत्यादी बाबीसह विदयुत पुरवठा क्षमता वाढविणे | १४.०० |
| ०८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी, वाढीव पाणीपुरवठा योजना, नविन साठवण तलाव निर्मिती करणे तसेच जलशुध्दीकरण केंद्र उभारणे व नविन जलवाहीन्या टाकणे. | ५८.१४ |
| ०९ | माहिती तथा सुविधा केंद्र उभारणे | १.२८ |
| १० | घनकचरा व्यवस्थापन | ५.०० |
| ११ | स्वागत कमान उभारणे | १.०५ |
| १२ | संस्थानचे रूग्णालयातील आयसीयु सुविधांसाठी बेडची संख्य वाढविणे. | ५.०० |
| १३ | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. मुंबई यांना शिर्डी विमानतळ उभारणेसाठी अर्थसहाय्य करणे. | ५.०० |
| १४ | सुरक्षा तथा निगराणी यंत्रणा बसविणे.<br>कायमस्वरुपी कॅमेरेः-संस्थान परिसर १२० नग- ६ कोटी, शिर्डी शहर १४७ नग- १३ कोटी, वाहनतळ व भक्त कॅम्प तात्पुरते, कॅमेरे ८६४ नग-१ कोटी | २०.०० |
| १५ | विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करणे | २५.०० |
| १६ | जमिन अधिग्रहण भाडे | ३.०० |
| १७ | साईभक्त कॅम्प व तात्पुरत्या स्वरुपाचे निवास व्यवस्थेकरीता मैदान तयार करणे, मंडप उभारणे तसेच इतर अनुषंगीक सुविधा पुरविणे, | २५.६८ |
| १८ | पोलिस व इतर विभागांचे अधिकारी/कर्मचारी , मेटेंनन्स स्टाफ यांचेकरीता तात्पुरती निवास व्यवस्था | १.५० |
| १९ | तात्पुरते वाहनतळ, शौचालय व पाणीपूरवठा व्यवस्था<br>एकूण मैदानः- १६२.७६ एकर, बसेस -४०४१, कार- २०६२४ , संडासः- ७१, मुतारीः- १०० | १२.०० |
| | **एकूण -** | **५७५.४६** |

- **द्वितीय प्राधान्य गटातील कामे**

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजितखर्च (रु. कोटी) |
|---|---|---|
| ०१ | बहुउद्देशीय हॉलचे बांधकाम करणे | ४३.३४ |
| ०२ | साईनिवास अतिथीगृहाचे तळमजल्यावर VVIP सूटचे बांधकाम करणे | ०७.०० |
| ०३ | साई शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणीकरणे. | १००.०० |
| ०४ | साईसिटी प्रकल्पाची निमिर्ती करणे | १८०.०० |
| ०५ | संस्थान करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन प्रस्तावित योजनाबाबत | १३९.६० |
| ०६ | निळवंडे धरणातील पाणी आरक्षणाचे रक्कमेबाबत | १८३.९३ |
| ०७ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळांच्या शिर्डी परिसरातील जमिनी संस्थानला विविध विकास प्रकल्प राबविणेकरीता उचित किंमतीत उपलब्ध होणेबाबत | ३६९.०० |
| ०८ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांसाठी भूसंपादन व रस्ते विकसीत करणे. | २२९.९८ |
| | **एकूण -** | **१२५२.८५** |

**अ) श्री साईबाबा समाधी शताब्दी कृती आराखडयात समाविष्ट कामांपैकी मा. व्यवस्थापन समितीचे प्रशासकीय मान्यतेने पुढील कार्यवाही सुरू असलेले प्रकल्प**

| अ.नं | कामाचा तपशिल | अंदाजित खर्च (रू.कोटी) | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | नियोजित दर्शन रांग प्रकल्प उभारणे. | १०३.८८ | मा.व्यवस्थापन समितीचे दि.२७/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयान्वये याकामी सदर परिसरातील अस्तित्वातील साईप्रसाद नं.०१ व ०२ या जुन्या इमारती पाडणेकरीता ठेकेदार जेनेसिस इंजिनिअरींग, मुंबई यांना दि०३/०८/२०१७ रोजी कार्यादेश देण्यात आलेला असून, त्यांचेमार्फत कामास सुरुवात करणेत येत आहे. तसेच दि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६६२ अन्वये सुधारीत बांधकाम नकाशे व अंदाजपत्रकानुसार येणारे रु१०३.८८ कोटी मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी दि.३१/०७/२०१७ रोजी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच बांधकाम परवानगीसाठी शिर्डी नगरपंचायतीकडे दि.३१/०७/२०१७ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. तसेच सदर प्रकल्पाचे बांधकामासाठी ई-निविदा मागविणेकरीता निविदा सूचना प्रसिध्द करणेची कार्यवाही प्रगतीत आहे. |
| ०२ | साईसृष्टी, प्लॅनेटोरीअमव व्हॅक्स म्युझियम (Sai knowledge) प्रकल्पाचे बांधकाम करणे. | १४१.०० | साईसृष्टी, तारांगण, वॅक्स म्युझियम असा एकत्रित प्रकल्प राबविणेसाठी संकल्पना, संरचना आणि बांधणी (Concept, Design & Build) या तत्वावर उभारण्यात येत आहे याकरीता सल्लागार नेमणूकीसाठी दि.२८/०८/२०१७ अखेरप्राप्त ०६ प्रस्तावांचे तांत्रिक लिफाफे उघडणेत आले आहेत. |
| ०३ | श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क अंतर्गत लेजर शो आणि सिव्हील वर्क करणे. | ७२.०० | मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानसुार मे.लेजर व्हिजन लि., हॉगकॉंग यांचेशी केलेला करारनामा रद्द करुन आर्बीट्रेशन करणेकामी मार्गदर्शन मिळणेकरीता मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. सदर कामाबाबत मा. उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका प्रलंबीत आहे. तसेच सिव्हील कामाचे ठेकेदार मे. के.आर. आर. इन्फ्रा प्रोजेक्ट प्रा. लि., यांचे विरुध्द दावा दाखल करणे बाबत विधी विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. |
| ०४ | श्री साईबाबा भक्तनिवास स्थान इमारतीच्या खोल्यांचे नूतनीकरण करणे. | १४.१० | श्री साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीतील ३८६ खोल्यांसह इमारतीचे नूतनीकरण करणेसाठी ई-निविदा प्राप्त झाल्या असून, पात्र ठेकेदारांचे वाणिज्यीक लिफाफे खरेदी समिती सभेपुढे दि.२०/०८/२०१७ रोजी उघडणेत आले आहेत. |
| ०५ | स्वागत कमान उभारणे. | १.०५ | शिर्डी शहराचे उत्तर व दक्षिणेस नगर-मनमाड रस्त्यालगत स्वागत कमानी उभारणेसाठी कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प, सा. बां. विभाग, अहमदनगर यांना दि.०४/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये सदर प्रकल्पाचे तांत्रिक मान्यता व निविदा निश्चिती करणेस कळविणेत आले आहे. तसेच याकामी जागतिक बॅंक प्रकल्प सा.बा. विभाग, अहमदनगर यांचेकडे निधी वर्ग करणेकामी मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचेकडे दि.०४/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये प्रस्ताव सादर करणेत आला आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ०६ | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. मुंबई यांना शिर्डी विमानतळ उभारणे साठी अर्थसहाय्य करणे. | ५.०० | महाराष्ट्र विमानतळ विकास कं. यांना उर्वरीत रु.५.०० कोटी सहाय्यक अनुदान देणेत आले असून ते त्यांचेकडून २००० चौ.फुट जागा कायमस्वरुपी घेणे तसेच काकडी विमानतळाला श्री साईबाबा आंतरराष्ट्रीय विमानतळ हे नाव देण्यात यावे. याबाबत महाराष्ट्र विमानतळ कंपनी यांना कळविणेत आले आहे. |
| ०७ | घनकचरा व्यवस्थापन | ५.०० | श्री साईबाबा संस्थान व शिर्डी नगरपंचायत यांचे सयुक्त वापराकरीता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारणेसाठी ई- निविदा प्रक्रिया सुरु आहे. |

**ब) श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडयामध्ये समाविष्ट कामांपैकी मा. व्यवस्थापन समिती व आवश्यक तेथे राज्य शासनाची पूर्व मान्यता घेऊन पुढील कार्यवाही सुरू करावयाची कामे.**

| **अ.नं** | **कामाचा तपशिल** | **अंदाजित खर्च (रु.कोटी)** | **सद्यस्थिती** | **संस्थानचा कार्यकारी विभाग** |
|---|---|---|---|---|
| ०१ | नविन भांडार इमारतीचे बांधकाम करणे. | १३.७१ | नविन भांडार इमारतीचे बांधकामासाठी आर्किटेक्ट नेमणूकीबाबत कार्यवाही करणेत येत आहे. | बांधकाम विभाग |
| ०२ | संस्थान परिसरातील विदयुत रोहित्रे, जनित्र, इलेक्ट्रीकल पॅनेल बोर्ड व केबल इत्यादी बाबींसह विदयुत पुरवठा क्षमता वाढविणे. | १४.०० | मंदिर परिसराचे नविन दर्शन कॉम्पलेक्समध्ये उभारण्यात येणा-या सबस्टेशन व जनसेटबाबत मे. माथुर कापरे ॲण्ड असोसिएटस, दिल्ली यांचेमार्फत टेंडर तयार करण्याची प्रक्रिया चालू असून मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णयानूसार बांधकाम व विद्युत कामाचे एकत्रित टेंडर काढावयाचे आहे. भक्तनिवास व प्रसादालयाबाबत पुढील टेंडर प्रक्रिया (कोरे टेंडर ई-निविदेसाठी तयार करुन देणे वगैरे) मे. टाटा कन्सल्टंसी यांचेकडून करुन घ्यावयाची किंवा कसे? तसेच या ई-निविदेसाठी त्यांचे करारनाम्यात “Scope of work” अंतर्गत समावेश आहे किंवा कसे? किंवा या कामासाठी नविन कल्सल्टंट नेमून पुढील प्रक्रिया करावी किंवा कसे याबाबत मार्गदर्शन आवश्यक आहे. | विद्युत विभाग |
| ०३ | संस्थानकरीता वाढीव पाणीपुरवठा योजना, नविन साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र उभारणे व नविन जलवाहीन्या टाकणे. | ५८.१४ | सदर योजना संस्थानमार्फत राबविणे व तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नेमणूक करणेबाबत दि०३/०४/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून नियुक्तीसंदर्भात ना हरकत प्रमाणपत्राची मागणी करणेचा प्रस्ताव दि.१७/०५/२०१७ रोजी सादर करणेत आलेला आहे. याबाबत म.जी. प्रा. यांनी दि.१५/०७/२०१७ रोजीचे पत्राव्दारे ५ % आकारणी करुन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून मान्यता दिलेली आहे. याबाबत दि.२५/०७/२०१७ रोजीचे मा.व्य.स. सभेतील निर्णय क्र.७३९ अन्वये सदर काम दोन टप्प्यात करणे व ५% फी अदा करणेकामी मान्यता मिळणेकरीता दि.०५/०८/२०१७ रोजीचे पत्राव्दारे विधी व न्याय विभाग यांचेकडे प्रस्ताव सादर करणेत आला आहे. | पाणी पुरवठा विभाग / बांधकाम विभाग |
| ०४ | संस्थानचे रूग्णालयातील आयसीयु सुविधांसाठी बेडची संख्या वाढविणे. | ५.०० | प्रथम टप्प्यात १० बेडचे आयसीयु युनिट उभारणेचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे व दुस-या टप्प्यातील १० बेडचे आयसीयु युनिटचे काम सुरु करणेत येत आहे. | श्री साईबाबा हॉस्पिटल/ बांधकाम विभाग |
| ०५ | सुरक्षा तथा निगराणी यंत्रणा बसविणे. कायम स्वरुपी कॅमेरेः-संस्थान परिसर १२० नग- ६ कोटी, शिर्डी शहर १४७ नग- १३ कोटी, वाहनतळ व भक्त कॅम्प तात्पुरते, कॅमेरे ८६४ नग-१ कोटी | २०.०० | श्री साईबाबा मंदिर परीसर, भक्तनिवास, प्रसादालय, हॉस्पीटल, शैक्षणिक संकुल इत्यादी ठिकाणी कायमस्वरुपी CCTV यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. तसेच गर्दीचे नियंत्रणासाठी शहरात महत्वाच्या ठिकाणी व वाहनतळ, निवारा शेड आदि ठिकाणी अद्यावत CCTV यंत्रणेसह सेंट्रल कंट्रोल रुम उभारणेकामी महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे. | सीसीटीव्ही विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०६ | विविध धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणे. | २५.०० | • शताब्दी कालावधीमध्ये संस्थानचे तिनही उत्सवांना आकर्षक सजावट करणे. मंदिरास विद्युत रोषनाई करणे.<br>• विविध धार्मिक ग्रथांचे पारायणाचे आयोजन करणे, भजन संध्याचे आयोजन करणे यासाठी नामवंत कलाकार, संत मंहत यांना आमंत्रित करणे व याकरीता विविध देखावे, भव्य स्टेज व आसन व्यवस्था तयार करणे.<br>• साई चरित्र पारायणाचे एकाच वेळी ५० हजार साईभक्त सामावू शकतील असे मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था उभारणे.<br>• कार्यक्रमासाठी साईआश्रम येथे Tensile Fabric शेड उभारणेकरीता निविदा मागविणेत येत आहेत.<br>• समाधी मंदिराचे पुर्वीकडील १६ आर जागेमध्ये शेड उभारणेची कार्यवाही सुरु आहे. या शेड मध्ये शताब्दी कालावधीतील काही कार्यक्रम घेणे प्रस्तावीत आहे.<br>• मोठे स्वरुपाचे कार्यक्रम महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ यांचे मालकीचे मौजे निमगांव को-हाळे येथील गट नं.८९,९० मध्ये आयोजित करता येतील. | शताब्दी कक्ष / सामान्य प्रशासन-वशी-०५/ बांधकाम विभाग |
| ०७ | जमिन अधिग्रहण भाडे, | ३.०० | वहानतळे व साईभक्त कॅम्प, रिफ्युज एरियासाठी महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ व इतर खाजगी मालकीच्या जमिनी अधिग्रहीत करणेसाठी सदरचा खर्च अपेक्षित आहे. आवश्यकतेनुसार जमिनी अधिग्रहीत कराव्या लागणार आहेत. | मालमत्ता विभाग |
| ०८ | साईभक्त कॅम्प व तात्पुरत्या स्वरुपाचे निवास व्यवस्थेकरीता मैदान तयार करणे, मंडप उभारणे तसेच इतर अनुषंगीक सुविधा पुरविणे. | ३९.१८ | • तात्पुरत्या स्वरुपातील निवासस्थानांसाठी मंडप उभारणे, साईट लेव्हलींग करणे, पाणी पुरवठा, शौचालय व मुता-यांची व्यवस्था करणे इ. व्यवस्थेसाठी ई – निविदा मागविणे व काम पूर्ण करुन घेणे.<br>• वर्षाभरातून गर्दीच्या ५० दिवसांकरीता ४००० व्यक्तींची निवास व्यवस्थेसाठी निविदा मागविणेकरीता स्वतंत्र प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.<br>• मोठे गर्दीचे कालावधीत तसेच ऑक्टोबर -२०१८ मध्ये निवास व्यवस्था करणेसाठी धोराणात्मक निर्णय घेऊन, त्यानुसार रेट कॉन्ट्रॅक्ट करणेकरीता ई-निविदा मागविणेत येतील. | बांधकाम विभाग / विद्युत विभाग/ पाणी पुरवठा विभाग / आरोग्य विभाग/ संरक्षण विभाग/ फायर ॲण्ड सेफ्टी विभाग |
| ०९ | साईभक्तांकरीता अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था उपलब्ध करुन देणे. | १.०० | अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्थेसाठी तात्पुरते वाहनतळे व निवारा शेड याठिकाणी शेड उभारुन प्रसाद भोजनाची व्यवस्था व संस्थानमार्फत फुड पॅकेट तयार करणे व वितरण करण्याची व्यवस्था करणे. | श्री साई प्रसादालय विभाग/ पाणी पुरवठा विभाग / बांधकाम विभाग |
| १० | माहिती तथा सुविधा केंद्र उभारणे. | १.२८ | शताब्दी काळामध्ये साईभक्तांकरीता उपलब्ध करुन देत असलेल्या सर्व सोयी सुविधा यांची माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याकरीता वाहनतळ, भक्तनिवास, निवारा शेड व महत्वाच्या ठिकाणी साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी माहीती तथा सुविधा केंद्राची व्यवस्था करणेसाठी तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप उभारणे. | माहिती तंत्रज्ञान विभाग/ बांधकाम विभाग/ जनसंपर्क विभाग/ ध्वनीक्षेपण विभाग |
| ११ | बहुउद्देशीय हॉलचे बांधकाम करणे. | ४३.३४ | मौजे निमगांव-को-हाळे, ता. राहाता येथील गट क्र.१७२मध्ये बहुउद्देशिय हॉलचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे. सदरहू क्षेत्र हरित पट्यात आहेत. संस्थान मालकीच्या गट नं.१७२,१८३व १८६ एकुण क्षेत्र १४ हेक्टर ६० आर रहिवाशी पट्यात समाविष्ट करणेसाठी | बांधकाम विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | शासनामार्फत अंतिम आदेश / अधिसूचना निर्गमित व्हावी असे निर्देश मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दि.३१/०३/२०१७ रोजी झालेल्या श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडा बैठकीमध्ये दिलेले आहेत. त्यानुसार संस्थानमार्फत दि.२५/०४/२०१७ रोजीचे पत्राव्दारे नगर विकास विभाग यांना विनंती पत्र देणेत आले आहे. | |
| १२ | साईनिवास अतिथी गृहाचे तळमजल्यावर VVIP सूटचे बांधकाम करणे. | ०७.०० | साईनिवास अतिथीगृहाचे तळमजल्यावरील भांडार स्थालांतरीत झालेनंतर VVIP अतिथीगृहाचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे. | बांधकाम विभाग |
| १३ | साई शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणे. | १००.०० | शिर्डी येथे टाटा ट्रस्ट, मुंबई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त उपक्रमातून १०० बेडचे सुसज्ज कॅन्सर निदान व उपचार रुग्णालय शताब्दी वर्षात उभारणेचे नियोजित आहे. याबाबत टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे समवेत प्राथमिक चर्चा पूर्ण झालेली आहे. टाटा ट्रस्ट यांचेकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही सुरु करता येईल. | श्री साईबाबा हॉस्पिटल / बांधकाम विभाग |
| १४ | साईसिटी प्रकल्पाची निमिर्ती करणे. | १८०.०० | या प्रकल्पाची संकल्पना वआराखडा तयार करणेत आलेला आहे. महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे एकत्र उपक्रमातून सदर प्रकल्प करणे उचित होईल असे मत आहे. | बांधकाम विभाग |
| १५ | संस्थान करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन प्रस्तावित योजनाबाबत. | १३९.६० | या कामांकरीता तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नियुक्ती करणे व योजना संस्थानमार्फत राबविणेबाबत मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे दि.०३/०४/२०१७ रोजी प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. | पाणी पुरवठा विभाग |
| १६ | निळवंडे धरणातील पाणी आरक्षणाचे रक्कमेबाबत. | १८३.९३ | मा. प्रधान सचिव, जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे दि.३०/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये व मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे दि.१४/०१/२०१६ व दि.३०/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये सदर रु. १८३.९३ कोटी मात्र इतकी रक्कम माफ होणेबाबत विनंती करण्यात आली आहे. | पाणी पुरवठा विभाग |
| १७ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळांच्या शिर्डी परिसरातील जमिनी संस्थानला विविध विकास प्रकल्प राबविणेकरीता उचित किंमतीत उपलब्ध होणेबाबत. | ३६९.०० | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या., पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील जमिनी संस्थानकरीता कायमस्वरुपी खरेदीने मिळणेबाबत मा.व्यवस्थापकीय संचालक, म.रा.शे.म.मर्या., पुणे यांना दि.२४/१०/२०१६ तसेच दि.०९/०५/२०१७ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे. पहिल्या टप्प्यात ५२ हेक्टर जमीन मिळणेस विनंती केली आहे. मा. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.शे.म.मर्या., पुणे यांनी दि.०३/०५/२०१७ रोजीचेपत्रान्वये मौजे निमगांव को-हाळे व सावळीविहीर येथील जमिनींबाबत काही खंडक-यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल करुन जमीन वाटपास अंतरीम स्थगिती आदेश मिळविला आहे. सदर जमिन तात्पुरत्या स्वरुपात अधिग्रहण करावयाच्या आहेत. | मालमत्ता विभाग |
| १८ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांसाठी भूसंपादन व रस्ते विकसीत करणे. | २२९.९८ | श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ नुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत येत आहे. शिर्डी शहरातील ०६ रस्ते भूसंपादन करणे - रु.१६३.५५ कोटी ०६ रस्ते भूसंपादन करणेसाठी आवश्यक निधी उपलब्ध करणेस तसेच अस्तिवातील ०८ पैकी ०४ रस्ते विकासीत करणेसाठी मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शासन मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत कार्यवाही करणेत येत आहे. | बांधकाम विभाग |

**प्रस्ताव–** तरी वरील ब मध्ये नमूद केलेल्या श्री साईबाबा शताब्दी महोत्सव कृती आराखडयामध्ये समाविष्ट कामांपैकी मा.व्यवस्थापन समिती व आवश्यक तेथे राज्य शासनाची पूर्व मान्यता घेणे, आराखडे व अंदाजपत्रक तयार करणे इ.अनुषंगिक कामे करणेत येत असून त्याबाबतची सद्यस्थिती वरीलप्रमाणे आहे. तरी सदरहू प्रस्ताव चर्चेसाठी व आवश्यक धोरणात्मक निर्णय होणेसाठी सादर.

**निर्णय क्र.७५१** **साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाकरीता विविध पायाभूत सोई-सुविधा निर्माण करणेविषयी सविस्तर चर्चा होऊन, खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**अ) श्री साईबाबा समाधी शताब्दी कृती आराखडयात समाविष्ट कामांपैकी मा. व्यवस्थापन समितीचे प्रशासकीय मान्यतेने पुढील कार्यवाही सुरू असलेल्या प्रकल्पांवर खालीलप्रमाणे चर्चा करणेत आली.**

| अ.नं | कामाचा तपशिल | अंदाजित खर्च (रू.कोटी) | सद्यस्थिती |
|---|---|---|---|
| ०१ | नियोजित दर्शन रांग प्रकल्प उभारणे. | १०३.८८ | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, त्यास मान्यता देण्यात आली. |
| ०२ | साईसृष्टी, प्लॅनेटोरीअम व व्हॅक्स म्युझियम (Sai knowledge) प्रकल्पाचे बांधकाम करणे. | १४१.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत आले व यासाठी प्रकल्प सल्लागाराची नेमणूक केल्यानंतर सदरहू प्रकल्प बीओटी तत्वावर उभारणेकामी निविदा प्रक्रिया राबविणेत यावी. |
| ०३ | श्री साईबाबा मल्टीमिडीया थिमपार्क अंतर्गत लेजर शो आणि सिव्हील वर्क करणे. | ७२.०० | सदर कामाबाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे याचिका प्रलंबीत असून, त्यामुळे प्रकल्पाचे काम थांबविणेऐवजी हा प्रकल्प उभारणीकामी विहीत पध्दतीने नव्याने बीओटी तत्वावर उभारणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली. त्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करुन व्यवस्थापन समितीसमोर सादर करावा. |
| ०४ | श्री साईबाबा भक्तनिवास स्थान इमारतीच्या खोल्यांचे नूतनीकरण करणे. | १४.१० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. |
| ०५ | स्वागत कमान उभारणे. | १.०५ | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. |
| ०६ | महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मर्या. मुंबई यांना शिर्डी विमानतळ उभारणेसाठी अर्थसहाय्य करणे. | ५.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. |
| ०७ | घनकचरा व्यवस्थापन | ५.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. |

**ब) श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कृती आराखडयामध्ये समाविष्ट कामांपैकी मा. व्यवस्थापन समिती व आवश्यक तेथे राज्य शासनाची पूर्व मान्यता घेऊन पुढील कार्यवाही सुरू करावयाची कामे.**

| अ. नं | कामाचा तपशिल | अंदाजित खर्च (रू.कोटी) | सद्यस्थिती | संस्थानचा कार्यकारी विभाग |
|---|---|---|---|---|
| ०१ | नविन भांडार इमारतीचे बांधकाम करणे. | १३.७१ | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. | बांधकाम विभाग |
| ०२ | संस्थान परिसरातील विदयुत रोहित्रे, जनित्र, इलेक्ट्रीकल पॅनेल बोर्ड व केबल इत्यादी बाबींसह विदयुत पुरवठा क्षमता वाढविणे. | १४.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. | विद्युत विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | संस्थानकरीता वाढीव पाणीपुरवठा योजना, नविन साठवण तलाव व जलशुध्दीकरण केंद्र उभारणे व नविन जलवाहीन्या टाकणे. | ५८.१४ | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. | पाणी पुरवठा विभाग / बांधकाम विभाग |
| ०४ | संस्थानचे रूग्णालयातील आयसीयु सुविधांसाठी बेडची संख्या वाढविणे. | ५.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. | श्री साईबाबा हॉस्पिटल/ बांधकाम विभाग |
| ०५ | सुरक्षा तथा निगराणी यंत्रणा बसविणे. कायम स्वरुपी कॅमेरेः- संस्थान परिसर १२० नग- ६ कोटी, शिर्डी शहर १४७ नग- १३ कोटी, वाहनतळ व भक्त कॅम्प तात्पुरते, कॅमेरे ८६४ नग-१ कोटी | २०.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, नोंद घेण्यात आली. | सीसीटीव्ही विभाग |
| ०६ | विविध धार्मिक व सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणे. | २५.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. | शताब्दी कक्ष/ सामान्य प्रशासन, वशी-०५/ बांधकाम विभाग |
| ०७ | जमिन अधिग्रहण भाडे, | ३.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. | मालमत्ता विभाग |
| ०८ | साईभक्त कॅम्प व तात्पुरत्या स्वरुपाचे निवास व्यवस्थेकरीता मैदान तयार करणे, मंडप उभारणे तसेच इतर अनुषंगीक सुविधा पुरविणे. | ३९.१८ | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत आले व तात्पुरत्या स्वरुपाचे निवास व्यवस्थेकरीता मैदान तयार करणे, मंडप उभारणे तसेच इतर अनुषंगीक सुविधा पुरविणे याची शताब्दी महोत्सवाच्या शेवटी ऑक्टोबर-२०१८ मध्ये आवश्यकता भासेल, असे समितीचे मत झाले.<br>गुरुपौर्णिमा उत्सव- २०१७ मधील गर्दीचा अनुभव विचारात घेता, तात्पुरता निवारा शेड व अनुषंगिक सोयी- सुविधा विहीत कार्यपध्दती अवलंबुन उपलब्ध करुन द्याव्यात, असे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सांगितले त्यास मान्यता देण्यात आली.<br>तसेच काही शिर्डी ग्रामस्थ शताब्दी महोत्सवामध्ये साईभक्तांसाठी सोयी-सुविधा पुरविणेकामी संस्थानला, त्या कालावधीत विनामुल्य जागा/ जमिनी देण्यास इच्छुक आहेत. या जमिनींचा स्थानिक समिती सदस्यांसमवेत पहाणी करुन, ज्या जागा/ जमिनी साईभक्तांना सोयी-सुविधा पुरविणेस उपयोगी पडतील, अशा जमिनी अधिग्रहीत करणेत याव्यात, असे ठरले. | बांधकाम विभाग / विद्युत विभाग/ पाणी पुरवठा विभाग / आरोग्य विभाग/ संरक्षण विभाग/ फायर ॲण्ड सेफ्टी विभाग |
| ०९ | साईभक्तांकरीता अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था उपलब्ध करुन देणे. | १.०० | यावेळी समिती सदस्यांनी सुचविले की, ज्या स्वयंसेवी संस्था/ मंडळे साईभक्तांसाठी तयार करणेत येणाऱ्या तात्पुरत्या निवासाचे ठिकाणी प्रसाद भोजन देणेस इच्छुक असतील, अशा संस्था/ मंडळांना परवानगी देण्यात यावी. परंतु साईभक्तांच्या सुरक्षिततेच्या कारणास्तव परवानगी देण्यात येऊ नये, असे मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी नमुद केले व साईभक्तांकरीता अतिरिक्त प्रसाद भोजन व्यवस्था संस्थानमार्फत उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले. | श्री साई प्रसादालय विभाग/ पाणी पुरवठा विभाग / बांधकाम विभाग |
| १० | माहिती तथा सुविधा केंद्र उभारणे. | १.२८ | शताब्दी काळामध्ये साईभक्तांकरीता उपलब्ध करुन देत असलेल्या सर्व सोयी सुविधा यांची माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्याकरीता | माहिती तंत्रज्ञान विभाग/ बांधकाम विभाग/ जनसंपर्क |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | वाहनतळ, भक्तनिवास, निवारा शेड व महत्वाच्या ठिकाणी साईभक्तांचे मार्गदर्शनासाठी माहीती तथा सुविधा केंद्राची व्यवस्था करणेसाठी आवश्यकतेनुसार गर्दीचे दिवसांसाठीच तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप उभारणेत यावे. | विभाग/ध्वनीक्षेपण विभाग |
| ११ | बहुउद्देशीय हॉलचे बांधकाम करणे. | ४३.३४ | बहुउद्देशीय हॉलचे बांधकामाबाबतच्या सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, यावेळी अशी चर्चा झाली की, संस्थानचे शैक्षणिक संकुलाच्या इमारती विखुरलेले असून सर्व शैक्षणिक संकुल एकाच ठिकाणी असावे, याकरीता प्रस्तावित शैक्षणिक संकुलाचे सादरीकरण पुढील सभेमध्ये सादर करावे व सदरहू बहुउद्देशीय हॉलचा शैक्षणिक संकुलामध्ये समावेश करणेत यावा. | बांधकाम विभाग |
| १२ | साईनिवास अतिथी गृहाचे तळमजल्यावर VVIP सूटचे बांधकाम करणे. | ०७.०० | साईनिवास अतिथीगृहाचे तळमजल्यावरील भांडार स्थालांतरीत झालेनंतर VVIP अतिथीगृहाचे बांधकाम करणे प्रस्तावित आहे.<br>यास मान्यता देण्यात आली. | बांधकाम विभाग |
| १३ | साई शताब्दी कॅन्सर हॉस्पिटलची उभारणी करणे. | १००.०० | शिर्डी येथे टाटा ट्रस्ट, मुंबई व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे संयुक्त उपक्रमातून १०० बेडचे सुसज्ज कॅन्सर निदान व उपचार रुग्णालय शताब्दी वर्षात उभारणेचे नियोजित आहे. याबाबत टाटा ट्रस्ट, मुंबई यांचे समवेत प्राथमिक चर्चा पूर्ण झालेली आहे टाटा ट्रस्ट यांचेकडून सविस्तर प्रस्ताव प्राप्त झालेनंतर पुढील कार्यवाही सुरु करता येईल. सध्याचे रुग्णालयासाठी जागा कमी पडत असुन त्यामुळे रुग्णांना सेवा देण्यास अडचणीचे होते. त्यासाठी स्वतंत्र सर्वांगीन अभ्यास करुन प्रस्ताव सभेसमोर सादर करावा.<br>उपरोक्त सद्यस्थितीचे अवलोकन करणेत आले व सदरहू कॅन्सर हॉस्पिटलची, यापुर्वी हॉस्पिटलसाठी आरक्षित असलेल्या जागेमध्ये उभारणी करणे व चालविणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. | श्री साईबाबा हॉस्पिटल/ बांधकाम विभाग |
| १४ | साईसिटी प्रकल्पाची निमिर्ती करणे. | १८०.०० | प्रस्तावित केलेप्रमाणे मान्यता देण्यात आली. | बांधकाम विभाग |
| १५ | संस्थान करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन प्रस्तावित योजनाबाबत. | १३९.६० | संस्थान करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन करणेसाठीच्या कामी तज्ञ प्रकल्प सल्लागार म्हणून महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची नियुक्तीझालेली आहे. परंतु त्यामध्ये कोपरगाव व शिर्डी शहर यांचा समावेश नाही, अशी माहिती मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी सभेस दिली.<br>यावर चर्चा होऊन, कोपरगाव व शिर्डी नगरपंचायतींची मागणी विचारात घेऊन, सुधारित प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडून तयार करुन, त्यास तांत्रिक मान्यता घेऊन, तो प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करावा. तसेच सदर मान्यता मिळेपावेतो टप्पा क्र.०१ मधील कामांची ई-निविदा प्रसिध्द करुन, पुढील कार्यवाही सुरु करणेसाठी शासनाची मान्यता घ्यावी, असे ठरले. | पाणी पुरवठा विभाग |
| १६ | निळवंडे धरणातील पाणी आरक्षणाचे रक्कमेबाबत. | १८३.९३ | मा.प्रधान सचिव, जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे दि.३०/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये व मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडे दि.१४/०१/२०१६ व दि.३०/०३/२०१७ रोजीचे पत्रान्वये सदर रु.१८३.९३ कोटी मात्र इतकी रक्कम माफ होणेबाबत विनंती करण्यात आली आहे. | पाणी पुरवठा विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळांच्या शिर्डी परिसरातील जमिनी संस्थानला विविध विकास प्रकल्प राबविणेकरीता उचित किंमतीत उपलब्ध होणेबाबत. | ३६९.०० | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, आवश्यकतेनुसार पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली. | मालमत्ता विभाग |
| १८ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्त्यांसाठी भूसंपादन व रस्ते विकसीत करणे. | २२९.९८ | सद्यस्थितीचे अवलोकन करणेत येऊन, त्याची नोंद घेण्यात आली. | बांधकाम विभाग |

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **विशिष्ट स्वरुपाची देणगी देणाऱ्या साईभक्तांकरीता गोल्डन कार्डसारखी योजना सुरु करणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर.**

**निर्णय क्र.७५२** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

---

**विषय नं.०४** **रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रक्कम रु. १,७१,००,०००/- आर्थिक सहाय्य देणेबाबत.**

**प्रस्ताव-** पंडीत दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था औरंगाबाद ही संस्था शैक्षणीक क्षेत्रात सन १९८० पासून कार्यरत आहे. संस्थेचे कार्यक्षेत्र औरंगाबाद व जालना जिल्हयातील चार तालुके आहेत. तसेच औरंगाबाद महानगरात शिक्षणाची २८ संस्कार केंद्रे संस्था चालवित आहे. एक महाविद्यालय, सहा कनिष्ठ महाविद्यालय, नऊ माध्यमिक विद्यालय, चार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, चार पुर्व प्राथमिक विद्यालय, दोन आश्रमशाळा व दोन वस्तीगृह असून त्यात सात हजार तीनशे एकोनपन्नास विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. असा संस्थेचा कार्यविस्तार असलेबाबत उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये कळविले आहे.

राष्ट्र व समाज भक्तीभावाच्या अधिष्ठानावर समग्र व्यक्तीविकास घडविणेसाठी ध्येय प्रेरित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संस्थेत कार्यरत आहे. एकात्म मानव दर्शन या पंडीत दिनदयाळ उपाध्याय यांनी मांडलेल्या भारतीय जीवन दर्शनाच्या प्रकाशात शिक्षण व्यवस्थेची संरचना संस्थेने केली आहे. सर्वांसाठी गुणात्मक शिक्षण हा संकल्प संस्थेने केला असून समाजातील सामान्य घटकांसाठी दर्जेदार शिक्षण व्यवस्था निर्माण करण्यासाठी संस्था कार्यरत आहे. संस्था सर्व शाळा व महाविद्यालयासाठी अद्यायावत इमारती मैदाने, प्रयोग शाळा, संगणक इ. सुविधा व निसर्गरम्य परिसर निर्माण करीत असून शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना नित्य प्रशिक्षण उद्‌बोधन करून त्यांचा क्रियाशील सहभाग निर्माण करीत आहे. त्यामुळे पालकांना दर्जेदार व संस्कारक्षम शिक्षण मिळण्याची हमी असल्याने सतत वाढत असलेल्या विद्यार्थी संख्येसाठी शैक्षणीक सुविधाही वाढविण्यात संस्था प्रयत्नशील आहे. असे त्यांचे प्रस्तावात नमूद केले आहे.

**संस्थेची मागणी:-**

त्यासाठी सदर संस्थेने इमारत बांधकामासाठी रु. १.२३ कोटी व शालेय साहित्य घेण्यासाठी रु.४८.०० लक्ष असे एकूण रक्कम रु १.७१ कोटीची मागणी केली त्याचे विवरण खालीलप्रमाणे-

**अ. इमारत बांधकाम खर्च:-**

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम खर्च | रु. २,२२,००,०००/- |
| २ | इमारत बांधकाम निधीतून केलेला खर्च | रु. ९९,००,०००/- |
| ३ | **उर्वरीत** बांधकामसाठी लागणारी एकूण रक्कम | **रु. १,२३,००,०००/-** |

**ब. शालेय साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च:-**

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी नवीन ६०० बाके | रु. १५,००,०००/- |
| २ | क्रिडा साहित्य | रु. १०,००,०००/- |
| ३ | ग्रंथालय | रु. ३,००,०००/- |
| ४ | सुसज्ज प्रयोगशाळा | रु. ५,००,०००/- |
| ५ | संगणक, लॅब व फर्निचर | रु. १५,००,०००/- |
| ६ | एकूण | ४८,००,०००/- |
| एकूण | **अ + ब रु. १,२३,००,०००+४८,००,०००/-** | **१,७१,००,०००/-** |

**क. मागणी:-**

| | |
|---|---|
| **एकूण प्रकल्प खर्च अ + ब** | **रु.२,२२,००००० +४८,००,००० = २,७०,००,०००/-** |

वरील प्रमाणे **"क"** मध्ये नमूद एकूण रक्कम रु.१.७१ कोटी मात्र मिळणेबाबत विनंती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना केली आहे.

**अर्थ साहाय्य करणेबाब संस्थान अधिनियमात खालीलप्रमाणे तरतुद आहे:-**

अधिनियम २००४ कलम २१ (२) पोट कलमे (१) आणि (१क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशा तरतुदी केल्यानंतर, विश्वस्तव्यस्थेच्या निधीत शिल्लक राहीली असल्यास अशा शिल्लक रक्कमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्यांपेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरता व खर्च करता येईलः-

(एक) राज्य शासनाच्या पुर्व मंजुरीने, एखाद्या नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून कोणतीही **शैक्षणिक संस्था**, क्रिडा अकादमी वा संस्था, सार्वजनिक वाचनालय, रुग्णालय, दवाखाना, निराश्रित अथवा शारीरिक दृष्टया विकलांग व्यक्तीसांठी आधारगृह किंवा इतर धर्मादाय वा धार्मिक संस्था यांची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अथवा कला वा साहित्य क्षेत्राशी संबंधित असलेली एखादी नोंदणीकृत सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत सोसायटी यांच्याकडून अन्य कोणत्याही बिगर वाणिज्यिक सांस्कृतिक संघटनेची स्थापना व देखभाल करवून घेण्यासाठी अनुदान देण्याची तरतुद आहे."

**संस्थान प्रतिनिधी यांचा पहाणी अहवाल:-**

दि. १२.०६.२०१७ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिर्डी यांचे प्रतिनिधी श्री अशोक औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी व श्री संजय जोरी, उप अभियंता बांधकाम विभाग यांनी रामचंद्र नाईक विद्यालय सिडको एन ४ (दक्षिण) या शाळेची पहाणी केली त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

१) सदरहू इमारतीचे तळघर व तळमजला बांधकाम नव्यानेच पुर्ण करण्यात आलेले आहे.तळघरामध्ये विद्यार्थ्यांच्या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी हॉल व काही वर्ग खोल्या याप्रमाणे तात्पुरता वापर करण्यात येत आहे.

२) तळमजल्यावर पाच वर्ग खोल्या असून एक कार्यालय व एक स्टाफरुम आहे. विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

३) या इमारतीस मुख्य जीना व एक फायर एक्झीट जीना या प्रमाणे दोन स्वतंत्र जीने ठेवण्यात आलेले आहे.

४) इमारतीच्या मध्यवर्ती भागात ओपन टू स्काय कोर्ट यार्ड असून त्यावर पॉलीकार्बोनेटचे छत तयार करण्यात आलेले आहे.

५) इमारतीच्या टेरीसवरील वरील मजल्याचे बांधकामासाठी आर सी सी कॉलमची व गजांची सोय ठेवण्यात आलेली आहे.

६) संपूर्ण इमारतीस आतून व बाहेरून नुकतेच रंगकाम करण्या त आलेले आहे.

७) शाळेच्या इमारतीसमोर भुखंडावर अंदाजे १५ आर क्षेत्रामध्ये क्रिडांगण तयार करण्यात आलेले आहे

८) शाळेमध्ये पुर्व प्राथमिक ते इयत्ता १०वी पर्यंत शिक्षणाची सोय करण्यात आलेली आहे. मागील वर्षीचा १०वी चा निकाल पहिल्या तुकडीचा निकाल १०० टक्के लागल्याचा सांगितले.

९) इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंत शाळेला शासनाचे अनुदान उपलब्ध असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.

१०) शाळेमध्ये शिकत असलेले बहुतांशी विद्यार्थी गरीब कुटूंबातील असल्याचे मुख्याध्यापकांनी सांगितले.

११) शाळेमध्ये शिकविण्याची पद्धत, शाळेची शिस्त, स्वच्छता इ. बाबी उत्कृष्ट असल्याचे दिसून आले.

१२) औरंगाबाद महानगरपालिका यांचेकडील बांधकाम परवाना दि २६.०३.२०१५ अन्वये मंजूर बांधकाम नकाशावर शाळा इमारतीचे तळमजला बांधकाम क्षेत्र ६१८.४० चौरस मीटर इतके दर्शविलेले आहे. तसेच पहिल्या मजल्याचे बांधकाम क्षेत्र ५६६.६४ चौरस मीटर व दुस-या मजल्याचे बांधकाम क्षेत्र १५४.५७ चौरस मीटर दर्शविलेले आहे. यापैकी तळघर व तळमजल्याचे बांधकाम पुर्ण झालेले असून पहिल्या व दुस-या मजल्याचे बांधकाम अद्याप सुरू करण्यात आलेले नाही.

१३) सदर शाळा इमारतीसाठी औरंगाबाद महानगरपालिका यांचे Plinth Level Completion प्रमाणपत्र घेण्यात आलेले नाही, असे सांगण्यात आले. इमारतीचा तळमजला वापर शाळेकरिता करण्यात येत आहे. तथापि त्यासाठी औरंगाबाद महानगरपालिका यांचे भोगवटा प्रमाणपत्र (Occupancy Certificate) घेण्यात आलेले नाही. मंजूर नकाशाप्रमाणे संपूर्ण इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर ते घेण्यात येईल असे सांगण्यात आले.

१४) प्रकल्प अहवालात आर. डी. जैस्वाल आणि कंपनी, चार्टर्ड अकौन्टंट,औरंगाबाद यांनी संपूर्ण इमारतीसाठी लागणारा निधीचे प्रमाणपत्र दिले आहे ते पुढीलप्रमाणे.

| अ.न. | तपशील | | | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | भांडवल खर्च- शाळेचे इमारत बांधकाम (१४४०० चौ. फुट) | | | २,२०,००,०००/- |
| २ | भांडवलाचे स्त्रोत- | | | २,२०,००,०००/- |
| | अ) | इमारत निधी- विश्वस्त व्यवस्थेमधील | रु. ४९,००,०००/- | |
| | आ) | जनता सहकारी बॅंक, औरंगाबाद कर्ज | रु. ५०,००,०००/- | |
| | इ) | भांडवलाची आवश्यकता | रु. १२३,००,०००/- | |

१५) संस्थेला बेसमेंटसह संपूर्ण तीन मजली इमारत बांधणीसाठी उपरोक्तप्रमाणे रु. २.२२ कोटीचा खर्च अपेक्षीत असून त्यामध्ये झालेल्या बांधकामासाठी त्यांनी संस्थेचा इमारत निधी रु.०.४९ कोटी व जनता सहकारी बॅंकेचे कर्ज रु.०.५० कोटी वापरले असल्याचे सांगितले. उर्वरीत रु.१.२३ कोटी निधीची आवश्यकता असल्याचे प्रस्तावात नमूद आहे. सदर शाळेच्या भुखंडाची मालकी हक्काबाबतचे काही कागदपत्रांच्या छायांकित प्रती संस्थेने पाहणे करतेवेळी दिलेले आहेत. मालकी हक्काबाबत शहानिशा संस्थानच्या मालमत्ता विभागाकडून करून घेता येईल.

शिक्षण संस्थेचे ब-याच ठिकाणी शाखा असून त्यामध्ये ग्रामीण, अदिवासी भागातील गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देत असल्याबाबत संस्थेचे सचिव यांनी सांगितले. असा अहवाल दि. १४.०३.२०१७ रोजी सादर केलेला आहे.

**विभागाचा अभिप्राय:-**

१) संस्थेचे एक महाविद्यालय, सहा कनिष्ठ महाविद्यालय, नऊ माध्यमिक विद्यालय, चार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, चार पुर्व प्राथमिक विद्यालय, दोन आश्रम शाळा, दोन वस्तीगृह आहेत. संस्थेच्या अनेक शाखा आहेत. प्रस्तावात नमूद माहितीनुसार सदरची शिक्षणसंस्था मोठी व सक्षम दिसते.

२) अनुदान मागणी ज्या विद्यालयाच्या इमारतीसाठी केली आहे ती शाळा औरंगाबाद शहरात आहे. एकंदरीत शहरात शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणा-या अनेक अनुदानित व विना अनुदानित शैक्षणीक संस्था कार्यरत आहेत.

३) अशाप्रकारे शैक्षणीक क्षेत्रात काम करणा-या अनेक शिक्षण संस्था कार्यरत असून त्याही अशाच प्रकारची मागणी करतील.

उपरोक्त बाबींचा विचार करून अनुदान देणेबाबत निर्णय होणे आवश्यक आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समिती समोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५३** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ आक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर निधी खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर पंडीत दिनदयाळ उपाध्याय**

**यांचे शिक्षण संस्थेस इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रु.१,७१,००,०००/- मात्र आर्थिक सहाय्य करणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०५** **अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना बेंचेस (बाक) देणे.**

**प्रस्ताव-** अहमदनगर जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या एकूण ३५९७ शाळांमध्ये मिळून २,४६,००० विद्यार्थी आज रोजी शिक्षण घेत आहे. आज अहमदनगर जिल्हा शैक्षणीक गुणवत्तेत अग्रेसर आहे. या शैक्षणीक वर्षात प्राप्त झालेल्या प्रगत शैक्षणीक महाराष्ट्र तसेच असर अहवालावरुन जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता सिद्ध झालेली आहे. जिल्हयात, जिल्हा परिषद तंत्रस्नेही व ज्ञानरचनावादी झालेल्या आहेत. शाळांची रंगरंगोटी व परिसर स्वच्छतेच्या माध्यमातून शाळांचा कायापालट होऊन शाळांचे रुप बदललेले आहे. शाळांमध्ये लोकप्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था, पालक, CSR यांच्या माध्यमातून बालआनंद मेळावे, बालसंस्कार शिबीर, स्नेहसंमेलन, वैज्ञानिक सहल या उपक्रमांबरोबरच क्रिडा संस्कृती, वाचन संस्कृती रुजविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

जिल्हा परिषद शाळांनी शैक्षणीक गुणवत्तेत आघाडी घेतली असली तरी सुध्दा आजही काही प्रमाणात भौतीक सुविधांची उणिव भासत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक गुणवत्ता वाढीसाठी आपल्या सहकार्याची आणि मदतीची आम्हांला अपेक्षा आहे यापुर्वीही आपल्या मार्फत जिल्हा परिषद शाळांना बेंचेस पुरवून विद्यार्थ्यांना वर्गात बसण्याचा प्रश्न सोडविला आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांची वर्गात बेंचवर बसण्याची सुविधा झाली आहे. असे त्यांनी संदर्भ क्र. १ चे पत्रान्वये कळविले आहे.

**<u>मागणी</u>**:-जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी सुमारे १३,००० विद्यार्थ्यांना ६२३७ बेंचेस मिळावेत म्हणून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना विनंती केलेली आहे. मात्र त्यासाठी किती रक्कम अपेक्षित आहे, याबाबत काहीही उल्लेख केलेला नाही. तसेच जिल्हापरिषद अध्यक्षा, सौ.शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील यांनीही जिल्हा परिषद शाळांना बेंचेस मिळावेत म्हणून शिफारस केली आहे.

**<u>आर्थिक मदत करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-</u>**

१) अधिनियम कलम १७ (२) (ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील,अशी तरतुद आहे.

२) २१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल. (ट) कलम १७ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्य पार पाडणे, अशी तरतुद आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय:-</u>** शासन निर्णय क्रमांक सासंवि २००५/८०३/(१२०)- का.सोळा.दि. ३१.ऑगस्ट २००९ चे निर्णयान्वये व श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे दि. १४.१०.२००६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८६४ अन्वये, जिल्हा परिषद, अ. नगर यांना बेंचेससाठी रक्कम रु.१०,००,००,०००/- (रु. दहा कोटी फक्त) मंजूर करण्यात आले होते. त्याचा कार्यादेश मे. गोदरेज अॅण्ड बॉईज मॅन्यु. कं. मुंबई यांना देण्यात आला होता. मात्र प्रत्यक्ष कार्यवाही करतांना ३२,५९५ बेंचेस व रु. ९,२३,४३,२४१/- मात्र इतकी रक्कम प्रत्यक्ष खर्च करण्यात आलेली आहे.

जिल्हा परिषद, अहमदनगर यांनी नव्याने प्रस्तावीत केलेली मागणी मान्य करावयाची असल्यास तत्कालीन कार्य पद्धतीप्रमाणे कार्यवाही करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५४** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना बेंचेस (बाक) देणेकामी अंदाजे रु.९,२३,४३,२४१/- मात्र आर्थिक निधी देणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०६** **अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना नविन वर्ग खोल्या इमारती बांधकामासाठी रक्कम रु.३६ कोटी अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अहमदनगर जिल्हा परिषदेच्या ३५९९ शाळांमधून सुमारे २,४२,००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणीक वाढी बरोबर त्यांच्या शारीरीक, मानसिक व भावनिक विकास होण्याकरिता विविध उपक्रम जिल्हा परिषद शाळांमधून राबविले जातात. विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व घडविण्यासाठी शाळांना पायाभुत सुविधा पुरविणे आवश्यक असते. त्यादृष्टीने आमचे प्रयत्न सूरू आहेत. या गरजा जिल्हा परिषद सेस व जिल्हा वार्षिक योजनेच्या उपलब्ध निधीमधून पुर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि शाळांची व वर्ग खोल्यांची संख्या विचारात घेता सदरचा निधी अपुरा पडत आहे. जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा, समाज मंदीर किंवा सामाजिक संस्थानी देऊ केलेल्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात भरत आहेत. दरवर्षी वादळासारख्या नैसर्गीक आपत्तीमुळेही शाळेचे खूप आर्थिक नुकसान होत असते. तेथेही उपलब्ध निधीतून खर्च करावा लागतो. परिणामी नविन वर्ग खोल्या बांधकामासाठी निधी कमी पडतो असे कळविले आहे.

**मागणी:-** आज रोजी जिल्हा परिषद शाळांना ५०० वर्ग खोल्यांची आवश्यकता असून सन २०१६-१७ च्या डीएसआर नुसार एका खोलीला रक्कम रु.७,२०,०००/- मात्र एवढा, अशी एकूण रु.३६ कोटीची मागणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांचेकडे केलेली आहे.

**आर्थिक मदत करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद:-**

१. अधिनियम कलम १७ (२) (ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील,अशी तरतुद आहे.

२. २१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल. (ट) कलम १७ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्य पार पाडणे, अशी तरतुद आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा, समाज मंदीर किंवा सामाजिक संस्थानी देऊ केलेल्या इमारतीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात भरत आहेत. दरवर्षी वादळासारख्या नैसर्गीक आपत्तीमुळेही शाळेचे खूप आर्थिक नुकसान होत असते. जिल्हा परिषद सेस व जिल्हा वार्षिक योजनेच्या उपलब्ध निधीमधून पुर्ण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि शाळांची व वर्ग खोल्यांची संख्या विचारात घेता सदरचा निधी अपुरा पडत आहे. याबाबत जिल्हा परिषद अध्यक्षा मा. ना. सौ शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील व शिक्षणाधिकारी अहमदनगर यांनी नविन ५०० वर्ग, खोल्यांसाठी रक्कम रु.३६ कोटी मागणी केलेली आहे. तरी सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठ्या प्रमाणावर खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना नविन वर्ग खोल्या इमारती बांधकामांसाठी रक्कम रु.३६ कोटी मात्र आर्थिक अनुदान देणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०७** **अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना संरक्षण भिंती बांधकाम करणेसाठी रक्कम रु.४२.७८ कोटी अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अहमदनगर जिल्हा शैक्षणीक गुणवत्तेत अग्रेसर आहे. जिल्हयात तंत्रस्नेही चळवळ जोमाने सुरू असून अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत अधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत आहे. जिल्हयातील शाळांमध्ये एलईडी, टॅबलेट, ईन्टरॲक्टीव्ह बोर्ड या साधनांचा वापर होत आहे. शाळांची रंगरंगोटी होऊन परिसर आकर्षक व डिजीटल होत आहे. याबाबी विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी पोषक ठरत आहेत. म्हणूनच राज्यात जिल्हयाने शैक्षणीक गरुडझेप घेतली आहे. विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढून स्थलांतरीत व शाळाबाहय मुलांची समस्या सोडविण्यासाठी मदत व्हावी म्हणून शालेय पोषण आहार योजना राबविली जाते.

जिल्हा परिषदेच्या अनेक शाळा महामार्ग, राज्यमार्ग, तळे, नदी भोवताली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेचा प्रश्न निर्माण होत आहे. ही बाब राजीवगांधी विद्यार्थी सानुग्रह अनुदान योजनेच्या आकडेवारी वरून ध्यानात येते. जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या ७३३ शाळांना पक्क्या स्वरुपाची संरक्षक भिंत नाही. त्यापैकी ४५९ शाळा या महामार्ग,तळे, नदी, हमरस्ता यांच्या लगत आहेत. संरक्षक भिंती नसल्यानेलोकांच्या रहदारीचा तसेच मोकाट प्राण्यांचा उपद्रव विद्यार्थ्यांना होत असतो. शालेय पोषण आहारातही संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. विद्यार्थ्यांच्या उपस्थिती वाढविण्याच्या प्रयत्नांना खीळ बसते. तसेच उपद्रवी लोकांकडून शाळेचे स्वरूप विद्रुप करणे, अन्न शिजविण्यासाठी असलेल्या गॅस टाक्या, तसेच शाळेचे संगणक व इतर साहित्य चोरी जाण्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्ट्रीने व शैक्षणीक वातावरण निर्मितीसाठी संरक्षक भिंतीची आवश्यकता निर्माण झालेली आहे. यासाठी जि. प. अध्यक्षा सौ. शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील व शिक्षणाधिकारी यांनी विनंती केलेली आहे

**मागणी:-** सन २०१७-१८ आर्थिक वर्षाकरता आर्थिक कार्ययोजना व अंदाजपत्रकानुसार ४५९ शाळांकरिता ६२००० Running Meter साठी, रुपये ६९००/- Per Running Meter प्रमाणे एकूण रक्कम रुपये ४२,७८,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये बेचाळीस कोटी अठ्ठयाहत्तर लाख मात्र) एवढया रकमेची मागणी, अहमदनगर जिल्हा परिषद शिक्षण विभाग यांनी केलेली आहे. संरक्षक भिंती बांधकामासाठी जिल्हापरिषदेस कामाचे ड्रॉईंग व अंदाजपत्रक पाठविणेबाबत कळविले आहे, मात्र अद्याप पावेतो त्यांनी ड्रॉईंग व अंदाजपत्रक सादर केलेले नाही.

**आर्थिक मदत करणेबाबत संस्थान अधिनियमातील तरतुद :-**

१) अधिनियम कलम १७ (२) (ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी शैक्षणीक संस्था स्थापन करील,अशी तरतुद आहे.

२) २१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल. (ट) कलम १७ च्या पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्य पार पाडणे, अशी तरतुद आहे.

**विभागाचा अभिप्राय:-** जिल्हा परिषदेच्या ब-याचशा शाळा हया महामार्ग,तळे, नदी, हमरस्ता यांच्या लगत आहेत. संरक्षक भिंती नसल्याने लोकांच्या रहदारीचा तसेच मोकाट प्राण्यांचा उपद्रव विद्यार्थ्यांना होत असतो. शालेय पोषण आहारातही संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. तसेच उपद्रवी लोकांकडून शाळेचे स्वरूप विद्रुप करणे, तसेच अन्न शिजविण्यासाठी असलेल्या गॅस टाक्या, शाळेचे संगणक व इतर साहित्य चोरी जाण्याच्या प्रमाणात वाढ झालेली आहे. जिल्हापरिषद अध्यक्षा मा. ना. सौ शालिनीताई राधाकृष्ण विखे पाटील व शिक्षणाधिकारी अहमदनगर यांनी अनुदानाची मागणी केली आहे.

तरी जिल्हापरिषदेस शाळांच्या संरक्षक भिंतीसाठी रक्कम रु. ४२.४८ कोटी, देणेबाबतचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५६** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि.०१ ऑक्टोबर पासून प्रारंभ होत आहे. मा.मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि.३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु.३०२३ कोटी मात्रच्या कृती आरखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमांचे आयोजन करणे व साईभक्तांना पायुभूत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणावर खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते अशा पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा परिषद, प्राथमिक शाळांना संरक्षण भिंतींचे बांधकाम करणेसाठी रक्कम रु.४२.७८ कोटी मात्र आर्थिक अनुदान देणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा.** (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**विषय नं.०८** **शिर्डी पाणीपुरवठा योजनेचे साहित्य संकलीत करणेसाठी श्री साईबाबा संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील स.नं.१२५ मध्ये आरक्षण क्र.३४ ची (१२ चारी रस्त्यालगत) अंदाजे ०.४० आर जागा उपलब्ध होणेबाबत मा.मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.१९.०५.२०१७ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद**-श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण

टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव –** शिर्डी पाणीपुरवठा योजनेचे साहित्य संकलित करणेसाठी श्री साईबाबा संस्थान मालकीची मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५ मध्ये आरक्षण क्रं.३४ ची (१२ चारी रस्त्यालगत) अंदाजे ०.४० आर जागा शिर्डी नगरपंचायतीस उपलब्ध करुन देणेबाबत..

**प्रस्तावना –** मा.मुख्याधिकारी,शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र क्रं..नं.न.प./टि.क्रं.८/ १२०७/ २०१७ दि.१९/०५/२०१७ अन्वये, शासनाच्या अमृत योजने अंतर्गत शिर्डी शहरासाठी वाढीव पाणीपुरवठा योजनेचे काम लवकरच सुरु होत आहे. याकामी मे.रविराज इंजिनिअर्स,कोल्हापूर यांना कामाचे आदेश देण्यात आलेले आहे. सदर योजने अंतर्गत अंदाजित ८५ किमी.लांबीचे वितरण व्यवस्थेमधील सी.आय./ डी.आय.व एचडीपीई पाईप्स,व्हॉल्व, सीआय/डीआय स्पेशल्स इ.महत्वाचे साहित्य कामासाठी लागणार आहे. सदर साहित्य साठवण करणेसाठी नगरपंचायतीकडे पुरेशी जागा उपलब्ध नाही. करीता श्री साईबाबा संस्थानची सर्वे नं.१२५ मध्ये आरक्षण क्रं.३४ ची (१२ चारी रस्त्यालगत) मोठी जागा सध्या रिकामी पडलेली आहे. सदर जागेवर मातीचे ढिगारे असून काटेरी झुडपे वाढलेली आहे. सदर ठिकाणी अंदाजित ४० गुंठे जागा एक वर्षासाठी विनामोबदला उपलब्ध करुन दिल्यास नगरपंचायत मार्फत सदर जागेची स्वच्छता/लेव्हलिंग करुन तेथे पाणीपुरवठा योजनेचे साहित्य संकलनासाठी वापर करता येईल. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे पक्के बांधकाम करण्यात येणार नाही. योजनेचे काम पूर्ण झालेनंतर सदर जागा रिकामी करुन देण्यात येईल. सदर जागा नगरपंचायतीस १ वर्षासाठी देण्याबाबतचे परवानगी पत्र मिळणेबाबत विनंती केली आहे.

नगरपंचायतीने वापरासाठी मागणी केलेल्या जागेवर सध्यस्थितीत संस्थानचा प्रकल्प प्रस्तावित आहे किंवा कसे याबाबतचे अभिप्राय संस्थानचे बांधकाम विभागाकडून मागविणेत आला आहे.

**विभागाचा अभिप्राय-** नगरपंचायत, शिर्डी यांनी वापरासाठी मागणी केलेली जागा ही संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील सर्वे नं.१२५/८ क्षेत्र १.२१ हेक्टर पैकी आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम २१(२)(दोन) मध्ये स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानाच्या सोयींमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला आर्थिक सहाय्य करण्याची तरतूद आहे. तथापि प्रस्तुत प्रकरणी शिर्डी नगरपंचायतने संस्थान मालकीचे उक्त सर्वे नं.१२५/८ पैकी ०.४० आर इतकी जागा एक वर्षासाठी शिर्डी पाणीपुरवठा योजनेचे साहित्य ठेवणेकामी विनामोबदला वापरासाठी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. तेंव्हा उक्त अधिनियमातील कलम १७(३) मधील तरतूदीप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीस संस्थान मालकीचे सर्वे नं.१२५/८ पैकी ०.४० आर इतकी जागा ११ महीन्यांचे कालावधीसाठी विनामोबदला काही अटी व शर्तीवर कराराने देता येईल.

सदरचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७५७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी पाणीपुरवठा योजनेचे साहित्य संकलीत करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीस संस्थान मालकीचे सर्वे नं.१२५/८ पैकी ०.४० आर इतकी जागा ११ महीन्यांचे कालावधीसाठी विनामोबदला वापरास देणेस मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मुख्यकार्यकारी अधिकारी यांनी अटी/ शर्ती निश्चित कराव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.०९** **श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर, रा.शिर्डी यांचे मालकीची मौजे कनकुरी, ता.राहाता येथील गट नं.१४३/अ/१ (जुना गट नं.१४३/५) शेत जमीन क्षेत्र १.५१.५० आर खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद–** संस्थान अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) मधील तरतुदीनुसार विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील.

**प्रस्ताव –** श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी यांचे मालकीची मौजे कनकुरी, ता.राहाता येथील गट नं.१४३/अ/१ (जूना गट नं.१४३/५) शेतजमीन क्षेत्र १.५१.५० आर खरेदी करणेबाबत..

**प्रस्तावना-** श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर,रा.शिर्डी यांनी त्यांचे मालकीची मौजे कनकुरी येथील जमीन गट नं. १४३/अ/१ (जूना गट नं.१४३/५) क्षेत्र १.५१.५० आर आकार रु.५=२५ ही जमीन श्री साईबाबा संस्थानला कायमस्वरुपी खरेदी देणेकामी यापूर्वी दि.२९/०५/२०१४ रोजी प्रस्ताव सादर केलेला आहे.

सदर प्रस्तावावर दि.०३/०८/२०१४ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन सभेतील निर्णय क्रं.६३० खालीलप्रमाणे झालेला आहे.

"श्रीं च्या महाशताब्दी वर्षामध्ये साईभक्तांकरीता सोयी-सुविधा निर्माण करणेसाठी प्रस्तावित जमीनीची संस्थानला आवश्यकता असून याकामी सदर जमीन संस्थानला घेणेसाठी त्याजमीनीची अंतिम बाजारभावाप्रमाणे दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडून निश्चित करावी व मा.मुंबई उच्चन्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाकडे अर्ज करावा व त्यातील आदेश/परवानगीने खरेदीबाबत कार्यवाही करावी."

त्यानुसार मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लिकेशन क्रं.१२३१५/२०१४ दाखल करण्यात आले. त्याचा निर्णय दि.१३/०३/२०१५ रोजी झाला असून सिव्हील ॲप्लिकेशन मान्य करण्यात आले व त्यामधील Clause B मधील विनंतीप्रमाणे मौजे कनकुरी येथील गट नं.१४३/५ क्षेत्र १.५१.५० आर हे संबंधीत दुय्यम निबंधक यांचेकडून बाजारमुल्यठरवून घेवून त्याप्रमाणे उक्त क्षेत्र खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

दि.०८/१०/२०१५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं.३६१ अन्वये मौजे शिर्डी व कनकुरी येथील जमीनी खरेदी करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावावर मा.उच्च न्यायालयाचे आदेशाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

उपरोक्त मिळकतीची दि.२०/११/२०१५ रोजी दि.१९/०८/२०१३ रोजीच्या मोजणी नकाशाप्रमाणे क्षेत्राची खात्री करणेकामी संस्थानचे बांधकाम व मालमत्ता विभागाचे प्रतिनिधी यांनी समक्ष पाहाणी केली असता मोजणी नकाशामध्ये सर्वे नं.१४३ चा हिस्सा क्रं.५ हा क्षेत्राचे दक्षिण बाजूस दर्शविलेला असून प्रत्यक्ष खरेदी घ्यावयाचे क्षेत्र हे पश्चिम बाजूकडील असून ते सर्वे नं.१४३ चा हिस्सा क्रं.१ असल्याचे निष्पण्ण झालेले आहे. त्यामुळे खरेदी घ्यावयाच्या क्षेत्राच्या चतु:सिंमा निश्चित समजून येत नाहीत. तेंव्हा सर्वे नं.१४३ च्या ७/१२ चे पोटहिस्से व मोजणी नकाशा यांचा प्रत्यक्ष ताळमेळ घेवून दुरुस्ती करुन घेवून दुरुस्त मोजणी नकाशा व ७/१२ उतारे इकडेस सादर करावेत. तद्नंतर उक्त जमीन खरेदी करणेची कार्यवाही करणेत येईल, असे बाबत अर्जदार यांना कळविणेत आले.

दरम्यानचे कालावधीमध्ये दि.२८/१०/२०१५ रोजीच्या टिपणीत नमूद केलेप्रमाणे उक्त मिळकतीबाबत दि.२७/११/२०१५ रोजीच्या दै.सार्वमत वृत्तपत्रात टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. त्यास अनुसरुन ॲड.विलास जी.आसने यांनी त्यांचे अशिल श्री.अशोक जगन्नाथ गोंदकर,श्री.राजेंद्र जगन्नाथ गोंदकर, श्री.रंगनाथ सुर्यभान गोंदकर,श्री.विलास सुर्यभान गोंदकर,श्री.आण्णासाहेब सुर्यभान गोंदकर यांचे वतीने उक्त क्षेत्रातील दोन सामाईक चालू पाण्याच्या विहीरीबाबत हरकत घेवून सदर विहीरीत श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचा कोणताही हक्क,अधिकार,हितसंबंध नाही,असे बाबत दि.०५/१२/२०१५ रोजीच्या दै.सार्वमतमध्ये जाहीर नोटीसीस खुलासा व हरकत घेतलेली आहे. शिवाय हरकतदार यांनी दि.०२/१२/२०१५ रोजी संस्थानकडे देखील हरकत अर्ज सादर केलेला आहे.

याबाबत इकडील जा.नं.एसएसएस/मालमत्ता/५२९६/२०१५ दि.२४/१२/२०१५ अन्वये अर्जदार श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचेकडून खुलासा मागविणेत आलेला आहे

अर्जदार यांनी उपरोक्त विषयांकित दि.२१/०५/२०१६ व दि.२६/०५/२०१६ रोजीचे अर्ज सादर करुन खुलासा केला की,

१) मौजे कनकुरी येथील गट नं.१४३ ही मिळकत कुळ कायदा कलम ६३/६४ व कलम ४३/अ/३ प्रमाणेही श्री.आण्णासाहेब सुर्यभान गोंदकर,श्री.जगन्नाथ सुर्यभान गोंदकर,श्री.जनार्दन सुर्यभान गोंदकर, श्री.रंगनाथ सुर्यभान गोंदकर यांना तहसिलदार,कोपरगाव यांचेकडून वाटपपत्र झालेली आहे. वाटपपत्राची नक्कल दि.१५/०१/२०१६ च्या अर्जासोबत दिलेली आहे. तसेच

२) उपरोक्त मिळकत १४३/५ ही मिळकत श्री.आण्णासाहेब सुर्यभान गोंदकर यांनी दि.२१/०६/२०१२ रोजी दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडेस दस्त नं.३०७७/२०१२ अन्वये कायम खरेदी दिलेली आहे. त्याचे खरेदीखताची प्रत दि.१५/०१/२०१६ रोजीचे अर्जासोबत दिलेली आहे. तसेच

३) उपरोक्त जमीन खरेदी-विक्री बाबत दि.२७/११/२०१५ रोजीच्या दै.सार्वमत या वृत्तपत्रातील जाहीर नोटीसच्या अनुषंगाने दि.०१/१२/२०१५ रोजीचे अर्जान्वये हरकत दाखल झाली होती. हरकतदार यांनी त्यांचे हिश्श्याचे एक नंबर हिश्श्यात विहीरी व जाणे-येणेस रस्ता यासाठी २१ आर क्षेत्र सोडलेले आहे व श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांना १ नंबर हिश्श्यात क्षेत्र १.५१.५० आर शेतजमीन कायम खरेदी दिलेली आहे. विहीरी व रस्ता यांच्यामध्ये खरेदी देणार अर्जदार यांचा कोणताही संबंध नाही.
अर्जदार यांनी फक्त १.५१.५० आर शेतजमीन खरेदीखताने (३०७७/२०१२) अन्वये घेतलेली आहे.

तथापि माझे सदर जमीनीची संस्थानचे अधिकारी यांनी दि.२०/११/२०१५ रोजी समक्ष पाहाणी केली असता सदर गट नं.१४३ चा पोटहिस्सा मोजणी नकाशा क्रं.मोरनं.३५३ दि.२०/०७/२०१३ नुसार माझे क्षेत्राचा हिस्सा क्रं.५ हा मोजणी नकाशामध्ये चतुर्सिमा नुसार व वहीवाटीनुसार चूकीच्या ठिकाणी दर्शविणेत आलेचे निदर्शनास आले. परिणामी खरेदी द्यावयाच्या क्षेत्राच्या चतुर्सिमा जूळत नसलेने गट नं.१४३ च्या ७/१२ चे पोटहिस्से व मोजणी नकाशा यांचा प्रत्यक्ष ताळमेळ घेवून दुरुस्ती करुन दुरुस्त मोजणी नकाशा व दुरुस्त ७/१२ उतारे सादर करणेबाबत आपलेकडील पत्र क्रं.एसएसएस/मालमत्ता/४७२२/२०१५ दि.२३/११/२०१५ अन्वये आपण मला कळविलेले आहे. त्याप्रमाणे मी मा.उपअधिक्षक,भूमी अभिलेख,राहाता यांचेकडेस प्रकरण करुन दुरुस्त मोजणी नकाशा तयार करुन घेतला असून त्याप्रमाणे तहसिलदार साहेब,राहाता यांचेकडील आदेशाप्रमाणे ७/१२ उतारा दुरुस्त करुन घेवून दुरुस्त ७/१२ उतारा व मोजणी नकाशा व फेरफार उतारा अर्जासोबत सादर केला आहे.

त्याप्रमाणे आता माझी जमीन गट नं.१४३/५ ला नवीन गट नं.१४३/अ/१ असा झालेला आहे. क्षेत्रात मात्र कोणताही बदल झालेला नाही. त्याप्रमाणे सोबत उतारा सादर केलेला आहे. तसेच सदर जमीन खरेदी-विक्री करणेकामी आपण दै.सार्वमत दि.२७/११/२०१५ रोजीच्या वृत्तपत्रात दिलेल्या जाहीर नोटीसच्या अनुषंगाने श्री.अशोक जगन्नाथ गोंदकर,श्री.राजेंद्र जगन्नाथ गोंदकर,श्री.रंगनाथ सुर्यभान गोंदकर,श्री.विलास जनार्दन गोंदकर व आण्णासाहेब सुर्यभान गोंदकर यांनी आपणाकडे दि.०१/१२/२०१५ रोजीच्या तक्रारी अर्जान्वये हरकत घेवून गट नं.१४३ मध्ये असलेल्या दोन सामाईक विहीरीमध्ये श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचा कोणताही हक्क, अधिकार,हितसंबंध नसलेबाबत तक्रार अर्जात नमूद केलेले आहे. ही बाब मला मान्य असून आपलेकडील पत्र जा.क्रं.एसएसएस/मालमत्ता/५९४२/२०१६ दि.२७/०१/२०१६ चे पत्राचे अनुषंगाने खुलासा करतो की, तक्रारी अर्जदार यांच्या दोन विहीरींचे व रस्त्याचे क्षेत्र विभक्त करुन त्याचा ७/१२ उतारा वेगळा करण्यात आलेला असून त्याचा गट नं.१४३/अ/१/१ क्षेत्र ०.२१ आर असा झालेला आहे. म्हणजेच माझे उपरोक्त क्षेत्र हे सदर विहीरींचे व रस्त्याचे क्षेत्र सोडून आहे. त्यामुळे सदर जमीनीबाबत कोणतीही तक्रार राहीलेली नाही. तरी माझी उपरोक्त जमीन गट नं.१४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० आकार ५.२५ पैसे ही जमीन शासनाच्या सन २०१६-१७ च्या प्रचलित रेडी रेकनरच्या दराप्रमाणे संस्थानने लवकरात लवकर कायम खरेदी घ्यावी,ही नम्र विनंती,असे बाबत नमूद केलेले आहे.

**अर्जदार यांचे अर्जाचे व त्यासमवेतच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता**

१) संस्थानला खरेदी करावयाचे क्षेत्रास यापूर्वी गट नं.१४३/५ असे संबोधण्यात आले होते. तथापि ७/१२ उता-यावरील व मोजणी नकाशातील पोटहिश्श्यांचे व जमीनीच्या चतुर्सिमांचा मेळ बसत नसल्याने त्याप्रमाणे दुरुस्ती करुन घेवून संबंधीत कागदपत्रे सादर करणेबाबत अर्जदार यांना कळविणेत आले होते त्यानुसार अर्जदार यांनी दुरुस्ती करुन घेवून दुरुस्त ७/१२ उतारा व मोजणी नकाशा अर्जासोबत सादर केलेला आहे. त्यावरुन संस्थानला खरेदी करावयाचे क्षेत्रास गट नं.१४३/अ/१ असा झालेला आहे. म्हणजेच खरेदी करावयाचे क्षेत्र पूर्वीचेच आहे व तेवढेच आहे व ते क्षेत्र खरेदी करणेकामी यापूर्वी मा.व्यवस्थापन समितीची उपरोक्तप्रमाणे मान्यता मिळालेली आहे. शिवाय मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडून देखील सदर जमीन प्रचलित रेडी रेकनरच्या दरानुसार खरेदी करणेस मान्यता मिळालेली आहे. केवळ तांत्रिक चुकीमूळे ७/१२ उता-याचे क्रमांक बदलणेत आलेले होते. त्यात आता दुरुस्ती झालेली आहे.

२) सदर क्षेत्रातील विहीरींबाबत असलेल्या तक्रारी संबंधात अर्जदार यांनी सदर विहीरींशी जमीन खरेदी देणार अर्जदार यांचा काहीएक संबंध नसल्याचा खुलासा केलेला आहे. तक्रारी अर्जदार यांच्या दोन विहीरींचे व रस्त्याचे क्षेत्र विभक्त करुन त्याचा ७/१२ उतारा वेगळा करण्यात आलेला असून त्याचा गट नं.१४३/अ/१/१ क्षेत्र ०.२१ आर असा झालेला आहे. म्हणजेच खरेदी द्यावयाचे क्षेत्र हे सदर विहीरींचे व रस्त्याचे क्षेत्र सोडून आहे. त्यामुळे सदर जमीनीसंबंधात अथवा विहीरीसंबंधात कोणतीही तक्रार राहीलेली नसलेचे दिसून येते.

३) अर्जदार यांनी अर्जासोबत सादर केलेल्या पोटहिस्सा मोजणी नकाशाचे अवलोकन केले असता गट नं.१४३ चे पोटहिस्से १,२,३,४,५ असे दर्शविलेले आहे. कामगार तलाठी,निमगाव-को-हाळे यांनी हिस्सा फॉर्म नं.१२ नुसार फेरफार नं.२४५३ प्रमाणे नोंद घेतली. त्याचप्रमाणे २४५६,२४६० प्रमाणे देखील फेरफार नोंदी घेतलेल्या आहेत. तथापि सदर गटाच्या गट नं.१४३/१ ते १४३/७ फेरफार नं.२४५६ अन्वये दुरुस्ती न झाल्याने फेरफार नं.२४६० ही नोंद घेतली असलेचे सदर फेरफारात नमूद केलेले आहे. तसेच

सदर गटांच्या गट नं.१४३/१ ते १४३/७ दुरुस्त न झालेने नवीन फेरफार नं.२४६१ हा घेतला असल्याचे त्यात नमूद आहे.सदर फेरफार नं.२४६१ चे अवलोकन केले असता त्यातमोजणी नकाशातील हिस्सा नं.१४३/१ हया हिश्श्यास हिस्सा नं.१४३/अ असा दर्शविलेला आहे.परिणामी अर्जदार श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचा हिस्सा १४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० आकार रु.५=२५ असे दर्शवून १४३/अ/१/१ क्षेत्र ०.२१ आर म्हणजेच रस्ता व दोन विहीरींचे क्षेत्र हे श्री.जनार्दन सुर्यभान गोंदकर,श्री.रंगनाथ सुर्यभान गोंदकर,श्री.अशोक जगन्नाथ गोंदकर,श्री.राजेंद्र जगन्नाथ गोंदकर यांचे सामाईक हिश्श्यात दर्शविलेले आहे. मोजणी नकाशामधील पोटहिस्से व ७/१२ वरील पोटहिस्सा व गट नंबर व ७/१२ वरील गट नंबर व पोटहिस्सा यांचेतील तफावतीबाबत दि.३१/०५/२०१६ रोजी मौजे कनकुरी येथील कामगार तलाठी श्री.झेंडे यांचेशी समक्ष चर्चा केली असता त्यांनी पोटहिस्सा मोजणी नकाशात दर्शविलेल्या गट नंबरप्रमाणे त्याच नंबरची संगणकामध्ये नोंद घेत नसले कारणाने त्यास १४३/अ असा नंबर देणेत आलेला आहे म्हणून फेरफार नोंद २४६१ प्रमाणे नोंद घेवून त्यात सर्वे नं.१४३ ला १४३/अ असे संबोधून त्यात पोटहिस्सा मोजणी नकाशात दर्शविलेले इतर पोटहिस्सेचे १४३/अ/२,१४३/अ/३, १४३/अ/४, १४३/अ/५, १४३/अ/६, १४३/अ/७ असे नंबर दर्शविणेत आलेले असलेचे सांगितलेले आहे

शिवाय सदरकामी मा.उपअधिक्षक,भूमी अभिलेख,राहाता यांनी अर्जदार यांना उद्देशून लिहीलेले त्यांचेकडील पत्र क्रं.भूमा/फाळणी/१२/कनकुरी/गट नं.१४३ दि.०४/०६/२०१६ चे अर्जदार श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांनी दि.०६/०६/२०१६ रोजी या कार्यालयास सादर केले आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यात "मौजे कनकुरी,ता.राहाता येथील गट नं.१४३ ची मोजणी अर्जावरुन अ.ता.पो.हि.मो.र.नं.५६०/२०१६ अन्वये मोजणी करुन १४३/१,२,३,४व ५ याप्रमाणे हिस्से मोजणी नकाशा व फाळणी १२ तयार करुन गाव वहीवाटीस अंमल घेणेकामी मा.तहसिलदार,राहाता यांचेकडे सादर करणेत आला होता. मात्र ई-फेरफार आज्ञावलीत ऑनलाईन म्युटेशनमध्ये १४३/१,२ याप्रमाणे माहीती साठविली जात नाही. त्यामुळे नायब तहसिलदार यांनी दुरुस्ती आदेश केलेप्रमाणे सदर हिश्श्यास १४३अ/१ क्षेत्र १.५१.५० धारक श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर व १४३अ/१/१ क्षेत्र ०.२१ आर धारक श्री.जनार्दन सुर्यभान गोंदकर,श्री.रंगनाथ सुर्यभान गोंदकर,श्री.राजेंद्र जगन्नाथ गोंदकर व उर्वरित हिस्से १४३/२अ, १४३/३अ,१४३/४अ, १४३/५अ,१४३/६अ,१४३/७अ असे मेळात असत. वरीलप्रमाणे १४३/१ हा हिस्सा १४३अ१,१४३अ/१/१ याप्रमाणे मेळात असे, असेबाबत नमूद केलेले आहे. त्यावरुन अर्जदार यांची जमीन १४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० ही असलेचे दिसून येते.

४) कामगार तलाठी यांनी व उपअधिक्षक,भूमी अभिलेख,राहाता यांनी उपरोक्तप्रमाणे केलेला खुलासा विचारात घेतल्यास खरेदी करावयाच्या जमीनीच्या पश्चिम बाजूस श्री.जनार्दन सुर्यभान गोंदकर,श्री.रंगनाथ सुर्यभान गोंदकर, श्री.अशोक जगन्नाथ गोंदकर,श्री.राजेंद्र जगन्नाथ गोंदकर यांचे सामाईक क्षेत्र गट नं.१४३/अ/१/१ क्षेत्र ०.२१ आर दोन विहीरींचे व पड जमीन असलेचे दिसून येते. त्यामुळे खरेदी करावयाची जमीन व सदर जमीनीच्या पश्चिमेकडील संस्थान मालकीची जमीन गट नं.१३४ क्षेत्र ०.७५ आर ही सलग होत नसून त्यामध्ये उक्त सर्वे नं.१४३/अ/१/१ क्षेत्र ०.२१ आर हे अन्य मालकाचे क्षेत्र दिसून येते.

५) प्रस्तुत जमीन खरेदी संदर्भात संस्थानचे पॅनलवरील वकील अॅड.जे.के.गोंदकर यांचा दि.०५/०१/२०१५ रोजी सर्च रिपोर्ट घेतलेला आहे. तथापि तद्नंतर सदर जमीनीचे खरेदी-विक्रीबाबत वृत्तपत्रात जाहीर नोटीस देण्यात आली होती. त्या अनुषंगाने आलेल्या तक्रारी अर्जासंबंधात अभिप्राय देणेकामी अॅड.जे.के.गोंदकर यांनी जमीन मालक श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचेकडून त्यांनी श्री.आण्णासाहेब सुर्यभान गोंदकर यांचेकडून उक्त जमीन दि.२१/०६/२०१२ रोजी मे.दुय्यम निबंधक, राहाता यांचेकडील दस्त नं.३०७७/२०१२ अन्वये जमीन खरेदी केलेल्या खरेदीखताची नक्कल व श्री.आण्णासाहेब सुर्यभान गोंदकर यांनी कुळ कायद्या अंतर्गत श्रीमती लक्ष्मीबाई सबाजी डांगे व सौ.ताराबाई सुधाकर औताडे यांचेकडून जमीन खरेदी घेतलेल्या खरेदीखताच्या नकलेच्या प्रतींची समक्ष मागणी केलेली आहे. त्या अनुषंगाने अर्जदार जमीनमालक यांनी त्यांचेकडील दि.१५/०१/२०१६ रोजीच्या अर्जासोबत कागदपत्रे सादर केलेली आहेत.

तसेच अॅड.श्री.जे.के.गोंदकर यांनी त्यांचेकडील दि.१५/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय सादर केले असून त्यात त्यांनी "आपणास जे क्षेत्र श्री.बाबासाहेब बाबुराव गोंदकर यांचेकडून खरेदी करावयाचे आहे, त्याचा गट नं.१४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० आर असून ते क्षेत्र संस्थानच्या क्षेत्रालगत मोजणी नकाशाप्रमाणे दिसून

येत नाही. म्हणजेच संस्थानचे गट नं.१३४ चे व खरेदी घ्यावयाचे गट नं.१४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० आर यांचे दरम्यान गट नं.१४३/अ/१/१ क्षेत्र ०.२१ आर श्री.जनार्दन सुर्यभान गोंदकर वगैरे ४ यांचे मालकीचे दिसते. मा.उच्च न्यायालयाने संस्थानला लगतचे क्षेत्राची मान्यता दिलेली आहे व संस्थानचे निर्णयही त्याप्रमाणे झालेले आहेत. त्यामुळे सदरकामी नवीन निर्णय घेणे उचित होईल. तसेच गट नं.१४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० आर अशी जमीन ही गट नं.१४३/अ/१/१ क्षेत्र ०.२१ आर चे लगत पूर्वेकडील असल्याने मा.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडून स्पष्टीकरण अगर मान्यता घेवून सदर क्षेत्र संस्थानला खरेदी करता येईल. तत्राप झालेल्या पोटहिस्सा फाळणीप्रमाणे दि.२१/०६/२०१२ रोजीचे खरेदीखतात सुध्दा दुरुस्ती करणे जरुरीचे आहे. " असे बाबत अभिप्राय नमूद केलेले आहेत.

आता दि.२८/०७/२०१६ पासून मा.व्यवस्थापन समितीची नेमणूक करणेत आलेली असलेने मा.उच्च न्यायालयाचे मान्यतेसाठी सिव्हील ॲप्लिकेशन दाखल करणेची आवश्यकता नाही,असे नम्र मत आहे.

तथापि यापूर्वी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लिकेशन क्रं.१२३१५/ २०१४ वर दि.१३/०३/२०१५ रोजी निर्णय झाला असून सिव्हील ॲप्लिकेशन मान्य करण्यात आले व त्यामधील Clause B मधील विनंतीप्रमाणे मौजे कनकुरी येथील गट नं.१४३/५ क्षेत्र १.५१.५० आर हे संबंधीत दुय्यम निबंधक यांचेकडून बाजारमूल्य ठरवून घेवून त्याप्रमाणे उक्त क्षेत्र खरेदी करणेस मान्यता देणेत आलेली आहे.

त्या कालावधीतील उक्त जमीनीचे बाजारमूल्य मा.दुय्यम निबंधकयांनी त्यांचेकडील जा.क्रं.मुल्यांकन/ ६३/२०१५ दि.२४/०३/२०१५ अन्वये इकडेस कळविलेले असून त्याचा संक्षिप्त उतारा खालीलप्रमाणे आहे.

मुल्यांकन पत्र सन २०१५

| अ.नं. | गट नं. | गावाचे नाव | क्षेत्र | सन २०१५ चे बाजारमुल्य रु. |
|---|---|---|---|---|
| ७ | १४३/५ | कनकुरी | १ हे.५१.५० आर | सदर मिळकत वि.क्रं.९ मध्ये आहे. त्यास रु.३४००/- प्रति चौमी दर देण्यात आले आहेत. |

उपरोक्त मुल्यांकन पत्रकातील दराप्रमाणे उक्त जमीनीची किंमत एकूण रक्कम रु.५,१५,१०,०००/- (रु.पाच कोटी पंधरा लाख दहा हजार मात्र) इतकी होते.

तथापि अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणी दि.२६/०५/२०१६ रोजीचा अर्ज सादर केलेला आहे. त्याचे अवलोकन केले असता त्यात त्यांनी त्यांचे मालकीची उपरोक्त जमीन गट नं.१४३/अ/१ क्षेत्र १.५१.५० आर आकार रु.५=२५ ही जमीन शासनाच्या सन २०१६-१७ च्या प्रचलित रेडी रेकनरच्या दराप्रमाणे संस्थानने लवकरात लवकर कायम खरेदी घ्यावी, असे नमूद केलेले आहे.

शासनाचे सन २०१६-१७ चे मौजे कनकुरी येथील प्रचलित रेडी रेकनर पाहता त्यात खालीलप्रमाणे रकाने नमूद आहेत.

प्रभाव क्षेत्रातील माहीती

जिल्हा-नगर ता.राहाता मौजे कनकुरी वर्ष २०१६-१७

| विभाग नं. | विभाग | सर्वे नं./गट नं. | दर रु. | एकक |
|---|---|---|---|---|
| ९ | बिनशेती झालेल्या जमीनी | १५,१६,२१,२४, १२१,१२२, १४०,१४१,**१४३** | ३,६७०/- | चौमी. |

उपरोक्त रेडी रेकनरमध्ये खरेदी करावयाची जमीन सर्वे नं.१४३ चा दर प्रति चौमी ला रु,३,६७०/- इतका दर्शविलेला आहे. तथापि सदर दर बिनशेती झालेल्या जमीनीचे दिसून येतात. मात्र खरेदी करावयाची जमीन सर्वे नं.१४३/अ/१ चा ७/१२ उतारा अवलोकन करता सदर जमीन ही शेतजमीन असलेचे दिसून येते. सदर शेतजमीन गट नं.१४३ संबंधात प्रस्तुत रेडी रेकनरमध्ये वेगळे असे दर दर्शविलेले नाहीत. रेडी रेकनर बिनशेती जमीनीचे दर रु.३,६७०/- प्रति चौमी असे असून अर्जदार यांचे क्षेत्र १.५१.५० आर असून त्याची एकूण किंमत रु.५,५६,००,५००/- (अक्षरी रु.पाच कोटी छप्पन्न लाख पाचशे मात्र) अशी होत आहे.

तथापि अर्जदार यांनी सन २०१६-१७ पूर्वीच सदरचा प्रस्ताव सादर केलेला असल्याने प्रस्तुत जमीनीचे त्यावेळचे म्हणजेच सन २०१५ मधील प्रचलित रेडी रेकनरचे दर त्यांना मान्य आहे किंवा कसे तसेच उक्त क्षेत्र हे त्यांनी सक्षम अधिकारी यांचेकडून बिनशेती वापराबाबत परवानगी घेतली किंवा कसे याबाबत इकडील

जा.नं.एसएसएस/मालमत्ता/२८५६/२०१६ दि.३०/०८/२०१६ अन्वये पत्र देवून सदरचे क्षेत्रास सक्षम अधिकारी यांचेकडून अकृषिक वापरास परवानगी घेतलेली आहे किंवा कसे याबाबत विचारणा करणेत आलेली आहे.

त्यास अनुसरुन त्यांनी त्यांचेकडील दि.१२/०९/२०१६ रोजीच्या पत्रान्वये "प्रस्तुतची शेतजमीन संस्थानला कायम खरेदी देणेकामी दि.२७/०८/२०१४ रोजी अर्ज देवून मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांचेशी सविस्तर चर्चेनुसार ते त्यांची शेतजमीन त्यावेळी झालेल्या चर्चेनुसार जमीन खरेदीच्या वेळेस जो सरकारी बाजारभाव असेल त्याप्रमाणे देण्यास तयार आहे, असेबाबत नमूद करुन सदर जमीन अकृषिक वापरास परवानगी घेतलेली नाही. त्या संदर्भातील कुठलीही कागदपत्रे नाहीत व बिनशेती आदेश नाही" असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

उक्त जमीनीचे उपयोगिते संदर्भात संस्थानचे बांधकाम विभाग,पाणीपुरवठा विभाग व बगीचा विभाग यांचे अभिप्राय मागविणेत आले असून त्यात संस्थानचे बांधकाम विभागाने संस्थानचे गट नं.१३४ चे पूर्वेस क्षेत्र ०.२१ आर हे श्री.अशोक जगन्नाथ गोंदकर, श्री.रंगनाथ सुर्यभान गोंदकर यांचे असून त्याचे पूर्वेकडील गट नं.१४३/अ/१ पैकी क्षेत्र १.५१.५० आर हे आहे. तथापि सदरहू जमीन नाला रस्त्याला लागून असल्याने साठवण तलाव,पाणीपुरवठा संबंधी कामासाठी अथवा तत्सम कामांसाठी संस्थानकरीता भविष्यात उपयुक्त होईल, असेबाबत अभिप्राय दिलेले असून पाणीपुरवठा विभागाने प्रस्तुतचे क्षेत्र हे संस्थान क्षेत्रालगत नसलेने सदरचे क्षेत्र पाणीपुरवठा विभागास उपयुक्त नाही असे अभिप्राय दिलेले आहेत व बगीचा विभागाने उक्त जमीन ही उभी सरळ पट्टी असल्याने तसेच या जमीनीमध्ये कोणत्याही प्रकारचा पाण्याचा स्त्रोत उपलब्ध नसल्याने सदर जमीन बगीचा विभागासाठी उपयुक्त नाही, असेबाबत अभिप्राय दिलेले आहेत.

**विभागाचा अभिप्राय–** १) यापूर्वी त्रिसदस्यीय समिती अस्तित्वात असल्याने उपरोक्त जमीन खरेदी करणेकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लिकेशन क्रं.१२३१५/२०१४ चे दाखल करण्यात आले होते. त्यात मौजे शिर्डी येथील संस्थानसाठी आरक्षित असलेली जमीन स.नं.२०३/१ पै. व २०३/२ पै.आणि स.नं.२१२/२ पै. व २१२/३ या जमीनी खरेदीकामी आणि मौजे कनकुरी येथील सदर गट नं.१४३/५ क्षेत्र १.५१.५ हेक्टर ही जमीन संस्थान मालकीची असलेली जमीन गट नं.१३४ ला सलग असलेचे नमूद केलेले होते. त्यामुळे मे.उच्च न्यायालयाने दि.१३/०३/२०१५ रोजी सदर सिव्हील ॲप्लिकेशन मान्य केले आहे व त्यातील Clause B मधील विनंतीप्रमाणे मौजे कनकुरी येथील गट नं.१४३/५ क्षेत्र १.५१.५० आर हे संबंधीत दुय्यम निबंधक यांचेकडून बाजारमूल्य ठरवून घेवून त्याप्रमाणे उक्त क्षेत्र खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. तथापि चौकशीअंती सदरचे क्षेत्र संस्थानच्या जमीनीलगत नसलेचे निदर्शनास आलेले आहे. निदर्शनास आल्यानंतर अर्जदार यांनी कागदपत्रात दुरुस्ती करुन घेतलेली आहे. त्यात पोटहिस्सा फाळणीमुळे सदर जमीनीचा गट नं.१४३/अ/१ असा झालेला आहे. परिणामी संस्थान मालकीची जमीन गट नं.१३४ ला सदर क्षेत्र सलग येत नाही.

२) उक्त जमीनीच्या लगतच्या चारही बाजूंस असलेल्या जमीनीच्या शासनाचे सन २०१६-१७ चे रेडी रेकनरचे अवलोकन केले असता त्यात प्रस्तुतची जमीन विभाग क्रं.९ बिनशेती झालेल्या जमीनी या झोनमध्ये दर्शविलेली असून इतर जमीनी विभाग क्रं.६ जिरायत जमीनी यात दर्शविलेल्या आहेत. परिणामी उक्त जमीनीचा दर प्रति चौमी रु.३,६७०/- इतका दर्शविला असून आजूबाजूच्या जमीनींचा दर प्रति हेक्टरी रु.२१,६३,३००/- (प्रति चौमी रु.२१६/-) इतका दर्शविलेला आहे. तथापि उक्त जमीन ही शेतजमीन आहे.

सन २०१६-१७ चे रेडी रेकनर दराप्रमाणे सदर जमीनीची एकूण किंमत रक्कम रु.५,५६,००,५००/- (अक्षरी रु.पाच कोटी छप्पन्न लाख पाचशे मात्र) अशी होत आहे.

३) यापूर्वी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना जमीनी कायमस्वरुपी खरेदी देणेकामी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर चर्चा करुन जमीनी खरेदी संबंधात मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीच्या सभेपूढे प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यात निर्णय क्रं.४२ अन्वये प्रस्तावित जमीनीचा वापर कशासाठी होवू शकतो,संस्थान मिळकतीशेजारी यापैकी कोणत्या जमीनी आहेत, (उपयोगिता व सलगता तपासणे), रेडी रेकनरच्या दरापेक्षा कमी दराने जमीनी मिळणार आहे काय याप्रमाणे प्राधान्यक्रम करणेबाबतचा

निर्णय झालेला आहे. तथापि याबाबतची कार्यपध्दती निश्चित झालेली नसलेने सदर निर्णयाप्रमाणे कार्यवाही करणे बाकी आहे.

४) सदर अर्जाप्रमाणे सध्यस्थितीत संस्थानकडे, संस्थानसाठी आरक्षित असलेल्या जमीनी कायमस्वरुपी खरेदी देणेकामीचे १० प्रस्ताव प्राप्त झालेले असून आरक्षणा व्यतिरिक्त इतर जमीनी खरेदी देणेबाबतचे सुमारे ३७ प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.जमीनींच्या खरेदीबाबत वेळोवेळी जमीनी खरेदी करणे हा धोरणात्मक निर्णय आहे. याबाबत जमीन खरेदी करणेस मा.व्यवस्थापन समितीने मान्यता दिलेनंतर प्रत्येक वेळी शासनाचे विधी व न्याय विभागाची परवानगी घ्यावी लागेल, असे मत आहे.

उपरोक्त जमीन खरेदी करणेबाबत चर्चा करुन निर्णय घेणेकामी सादर.

**निर्णय क्र.७५८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावाचा विचार करता, प्रस्तावित जमीन शेतजमीन स्वरुपाची असून तिचा शासनाच्या बाजारमुल्य दरतक्त्यामध्ये बिनशेती गटात समावेश असल्यामुळे तो दर बिनशेती जमीनीचा आहे. तथापि, सदरची जमीन भविष्यामध्ये संस्थानच्या उपयोगाची असल्यामुळे व सद्य:स्थितीत जमिनीचे स्वरुप शेतजमीन असल्याने उपरोक्त जमिनीच्या गट नंबरच्या लगतच्या शेतजमिनीच्या दराप्रमाणे खरेदी करणेस हरकत नाही, असे समिती सदस्यांचे मत झाले. याकरीता सदरहू जमीनीच्या परिसरातील शेतजमिनींच्या बाजारमूल्य दरतक्त्यातील दराप्रमाणे खरेदी करणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**विषय नं.१०** **मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी मान्यवर निश्चितीबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानमार्फत श्री पुण्यतिथी उत्सव २०१७ मध्ये मंदिर विभागामार्फत वीणा, साईसच्चरित पोथीची मिरवणूक, श्रींच्या प्रतिमा (फोटोची) मिरवणूक, अध्याय वाचन,श्रींची पाद्यपुजा, भिक्षाझोळी, आराधना विधी कार्यक्रम, गुरुस्थान येथे रुद्राभिषेक पुजा अशा कार्यक्रमाचे आयोजन मान्यवरांचे हस्ते करणे असल्याने. मान्यवरांची नावे निश्चित झाल्यानंतर वीणा कोणी घ्यावा, पोथी कोणी घ्यावी, श्रींचा फोटो कोणी घ्यावा, अध्यायाचे वाचन कोणी करावे, श्रींची पाद्यपुजा, कोणी करावी, भिक्षाझोळी कोणी घ्यावी, आराधना विधी कार्यक्रम रुद्राभिषेक पुजा कोणी करावी याबाबत रुपरेषा निश्चित करता येईल.

तरी मान्यवरांची नावाची नोंद होऊन निश्चित होणेस मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.७५९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री पुण्यतिथी उत्सव २०१७ मध्ये मंदिर विभागामार्फत होणाऱ्या पाद्यपुजा व इतर कार्यक्रमासाठी खालीलप्रमाणे मान्यवरांची निश्चिती करणेत आली.**

| दिनांक | वेळ | कार्यक्रमात सहभागी होणा-या मान्यवरांची नावे |
|---|---|---|
| २९/०९/२०१७. शुक्रवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा प्रथम दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष<br>**पोथी –** मा.सौ. योगिता शेळकेपाटील<br>**प्रतिमा –** मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले |
| | पहाटे ५.१५ वाजता | **अध्याय वाचन –** १- मा.सौ.सरस्वती वाकचौरे व मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे<br>२- मा.ॲड.मोहन जयकर<br>३- मा.श्री.बिपीनदादा कोल्हे<br>४- मा.श्री.प्रताप भोसले<br>५- मा.सौ. योगिता शेळकेपाटील |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा –** मा.श्री.चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष |
| ३०/०९/२०१७. शनिवार | पहाटे ५.०० वाजता | **उत्सवाचा मुख्य दिवस** |
| | | **वीणा-** मा.श्री.बिपीनदादा कोल्हे<br>**पोथी–** मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे |
| | | **प्रतिमा-** मा.ॲड.मोहन जयकर व मा.डॉ. राजेंद्र सिंह |
| | सकाळी ६.०० वाजता | **श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.सुरेश हावरे, अध्यक्ष |
| | सकाळी ९.०० वाजता | **भिक्षा झोळी कार्यक्रम –** सर्व सदस्यांनी (स्वेच्छेनुसार) सहभागी व्हावे. |
| | सकाळी १०.३० वाजता | **आराधना विधी कार्यक्रम-** मा.श्री.सुरेश हावरे, अध्यक्ष व इच्छुक समिती सदस्य |
| ०१/१०/२०१७ रविवार | सकाळी ६.०० वाजता | **तृतीय दिवस** |
| | | **श्रींची पाद्यपूजा- मुख्यकार्यकारी अधिकारी** |
| ०२.१०.२०१७ सोमवार | सकाळी ६.०० वाजता | **उत्सवाचा सांगता दिवस**<br>**श्रींची पाद्यपूजा-** मा.श्री.बिपीनदादा कोल्हे |
| | सकाळी ६.४५ वाजता | **गुरुस्थान येथे रुद्राभिषेक-** मा.श्री.मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी |

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**विषय नं.११ संस्थानचे दैनंदिन कामासाठी अद्ययावत झेरॉक्स मशिन खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** सामान्य प्रशासन, कार्यासन वशी-१२ कडे दररोज संस्थानचे विविध विभागांकडील कागदपत्रे झेरॉक्स काढणेसाठी येतात. झेरॉक्स कामासाठी खालीलप्रमाणे दोन झेरॉक्स मशीन वापरात आहेत.

| अ. नं. | मशिनचा तपशिल | मशिनची किमंत | मशिन खरेदी केल्याची दिनांक | मशिनचे आयुष्य/कॉपीज मर्यादा | दि.२०.०८.२०१६ अखेर झालेल्या झेरॉक्स प्रती | मशिनची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | झेरॉक्स कंपनीचे झेरॉक्स मशिन Work Center ७५५६ | रु.८,३९,०००/- (देणगी) | दि.२१.०२.२०१२ | १५ लाख प्रती किंवा ०५ वर्ष वापर | ३१,०३,३४६ प्रती | मशिन बंद आहे. (FSMA कॉन्ट्रॅक्ट ऑक्टो.-१७ पर्यंत केलेले आहे.) Life संपलेली आहे. |
| ०२. | रिको कंपनीचे झेरॉक्स मशिन | रु.२,९२,९५०/- | दि.१८.०५.२०१७ | १५ लाख प्रती किंवा ०५ वर्ष वापर | १,६४,७६३ प्रती | मशिन चालु आहे. |

संस्थानच्या सर्व विभागांच्या दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या कागदपत्रांच्या झेरॉक्स, आदेश, परिपत्रके, तसचे माहिती अधिकार कायद्यान्वये मागितलेल्या माहितीच्या झेरॉक्स, कोर्ट कामासाठी लागणारे कागदपत्रांच्या झेरॉक्स, मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढील विषयांच्या टिपण्या, व कार्यवाहीच्या झेरॉक्स, कर्मचाऱ्यांचे वार्षिक १६ नं.फॉर्म, व इतर संस्थान कागदपत्रांच्या झेरॉक्सचे व प्रिंटींगचे काम वरील झेरॉक्स मशीनवर केले जाते. उपरोक्त कामासाठी वरील दोन्ही मशीनचा वापर केला जात आहे.

**अ)** पैकी अ.क्र.१ चे मशिन सद्यस्थितीमध्ये बंद स्वरुपात आाहे. त्याचे वार्षिक सर्व्हीसचे (FSMA) कॉन्ट्रक्ट ऑक्टोबर २०१७ अखेर पर्यंत केलेले आहे. सदर मशिनची प्रती काढण्याची क्षमता/मर्यादा संपलेली आहे. त्यामुळे सदर मशिनचे वार्षिक सर्व्हीस कॉन्ट्रक्ट करण्यास कंपनी अथवा कोणीही वितरक तयार नाही.

**ब)** अ.क्र.२ चे मशिन हे मे-२०१७ मध्ये नुकतेच खरेदी केलेली आहे. सध्या सदर मशिनवरच सर्व झेरॉक्स काढण्यात येत आहे. तीन महिन्याचे कालावधीत सदर मशिनवर सुमारे १,६५,००० नग झेरॉक्स प्रती काढण्यात आलेल्या आहेत.

**क)** त्यामुळे सध्या अ.क्र.०२ या एकाच मशिनवर मोठ्या प्रमाणावर झेरॉक्सचा ताण पडत आहे. परिणामी Over heating मुळे ते मशिनदेखील बंद पडत आहे. त्यावर क्षमतेपेक्षा जादा ताण पडत आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे काळात एकाच झेरॉक्स मशिनवर मोठ्या प्रमाणावर ताण पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. माहे ऑक्टोबर-२०१७ पासून श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा केला जाणार आहे. त्यामुळे सदर कलावधीत विविध योजना, प्रकल्प राबविण्यात येणार आहेत. त्यासाठी आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स, मा.व्यवस्थापन समितीचे सभेच्या झेरॉक्स, माहिती अधिकार, विविध निविदा व इतर दैनंदिन कार्यालयीन कामकाजा करिता आवश्यक झेरॉक्स यांचे प्रमाण वाढणार आहे. त्याकरिता दररोजच्या कामासाठी ०२ मशिन व तातडीची आवश्यकता म्हणून ०१ मशिन राखीव असणे गरजेचे आहे.

त्यामुळे उपरोक्त परिच्छेद "अ" ते "क" चे अवलोकन करता श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे कामासाठी खालील वर्णनाचे/ क्षमतेचे दोन नग अद्यावत नामांकित कंपनीचे झेरॉक्स मशीन खरेदी करणे अत्यंत आवश्यक आहे.

| अ.क्र. | मशिनचा तपशिल | वर्णन/क्षमता | अंदाजे दर प्रती नग (सर्व करांसह) |
|---|---|---|---|
| ०१. | Digital Multifunctional Copier- Machines | **55PPM,** Print – **600 X 600dpi**, Copy/Print/Scan, DADF Duplex, 100 Sheet bypass, 400 Sheet OCT, 4 X 500 Sheet Trays, | रु.३,५०,०००/- |

**(I)** उपरोक्त तक्त्यातील अ.क्र.०२ मध्ये नमुद केलेले रिको कंपनीचे झेरॉक्स मशिन विहित पद्धतीने ई-निविदा मागवून माहे मे- २०१७ मध्ये खरेदी केलेले आहे. सदर पुरवठाधारक मागील मंजुर दरामध्ये (रु.२,९२,९५०/- सर्व करांसहित) त्याच वर्णानचे झेरॉक्स मशिन पुरविणेस तयार असल्यास त्यांचेकडून तातडीची आवश्यकता म्हणून दोन नग झेरॉक्स मशिन मागील मंजुर दराने खरेदी करता येतील, तरी त्याप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**अथवा**

**(II)** तातडीची आवश्यकता म्हणून उपरोक्त नमुद वर्णनाचे झेरॉक्स मशिन विहीत पद्धतीने ई-निविदा मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त (I) अथवा (II) बाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दैनंदिन कामासाठी प्रस्तावामध्ये नमुद केलेप्रमाणे ०२ नग अद्ययावत झेरॉक्स मशिन खरेदी करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

विषय नं.१२ **श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, कंत्राटी पध्दतीने ऑफीस असिस्टंट, माहिती केंद्र, सिकंदराबाद यांचा मुदतवाढ मिळणेच्या दि.२०.०७.२०१७ रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत सिकंदराबाद येथे साईभक्तांना सोई-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी माहिती केंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर कार्यालयात दि.१७/१०/२०१० रोजीचे आदेशाने प्रथम ०१ वर्षासाठी श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा यांची ऑफीस असिस्टंट म्हणून कंत्राटी पध्दतीने एकूण मानधनावर नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानंतर श्री.चंद्रकांत सुराणा यांना वेळोवेळी मुदतवाढ व मानधन वाढ देण्यात आलेली आहे. त्यांना सध्या दि.०३/०८/२०१६ रोजीचे आदेशाने दि.२४/०८/२०१६ ते दि.२३/०८/२०१७ अखेर एक वर्षाकरीता कंत्राटी पध्दतीने प्रतिमहा रु.१५,०००/- (अक्षरी रुपये पंधरा हजार मात्र) एकूण मानधनावर मुदतवाढ देणेत आलेली आहे. त्यांची कंत्राटी पध्दतीचे नेमणूकीची मुदत दि.२४/०८/२०१७ संपणार आहे.

श्री.सुरणा यांची मुदत दि.२४/०८/२०१७ रोजी संपत असल्याने त्यांनी दि.२०/०७/२०१७ रोजीचे अर्जाने सध्याचे अटी-शर्तीवर मुदतवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. तसेच हैद्राबाद हे ‘अ’ श्रेणीचे शहर असल्याने येथील महागाईच्या पटीत उचित मानधनवाढ मिळणेची विनंती केलेली आहे. सदर अर्जावर प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांनी, श्री.सुराणा हे सिंकदराबाद येथील संस्थानचे माहिती केंद्रात कार्यालय सहाय्यक म्हणून कंत्राटी पध्दतीने मानधन तत्वावर नेमणूक करण्यात आलेली असून, त्यांना रु.१५,०००/- दरमहा देण्यात येतात. त्यांची मुदतवाढ दि.२३/०८/२०१७ रोजी संपत असल्याने त्यांना मुदतवाढ देणेस व योग्य मानधनवाढ देण्यास हरकत नाही. सिंकदराबाद येथील माहिती केंद्रावरुन खालील प्रमाणे वार्षीक प्राप्ती व खर्च झाल्याचे कळविले आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१ | ऑनलाईन आरती / दर्शन बुकींग | २०,२८,०००.०० |
| ०२ | ऑनलाईन रुम बुकींग | ९,६४,६११.०० |
| ०३ | पुस्तक विक्री | ९,६०,७७४.०० |
| ०४ | देणगी | १,७०,६८३.०० |
| ०५ | सर्व्हिस चार्ज | १३,५४०.०० |
| | एकूण प्राप्ती | **रु.४१,३७,६०८.००** |
| | वार्षिक खर्च | **रु.३,८४,८९२.००** |

तरी श्री. चंद्रकांत माणकचंद सुराणा, ऑफीस असिस्टंट, सिकंदराबाद यांचे दि.२०/०७/२०१७ रोजीचे अर्जातील विनंती व त्यावरील प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, त्यांची मुदत संपत असलेल्या तारखेपासून पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटीपध्दतीने मुदतवाढ व मानधनवाढ देणेबाबतच्या प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.७६१ **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा, ऑफीस असिस्टंट, सिकंदराबाद यांचे दि.२०/०७/२०१७ रोजीचे अर्जातील विनंती व त्यावरील प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग यांचा अभिप्राय विचारात घेता, श्री.चंद्रकांत माणकचंद सुराणा यांना, त्यांची मुदत संपत असलेल्यादिनांकापासुन पुढे एक वर्ष कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने, आहे त्याच मानधनावर मुदतवाढ देण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१३ श्री साईबाबा संस्थान पाणी पुरवठा योजना नविन साठवण तलाव निर्मिती करणे व यासाठी श्री.रमेश जी. संहेता, मुंबई यांचेकडून आर्थिक मदत स्विकारणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-**

| अ. नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम/तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतूद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील. |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | २ (झ) | सर्वसाधारणपणे, विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहून, समितीला या अधिनियामाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते सर्व अधिकार असतील. |

**प्रस्तावना:-** श्री क्षेत्र शिर्डी येथे श्रीसाईचे दर्शनासाठी दिवसेंदिवस साईभक्तांचे संख्येत मोठया प्रमाणावर वाढ होत आहे. संस्थानमार्फत साईभक्तांचे सोयी-सुविधेसाठी निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था माफक दरात करण्यात येत आहे. साईभक्तांचे पिण्याचे व निवासव्यवस्थेकरीता बांधण्यात आलेल्या इमारतींकरीता पाणी पुरवठा करणेकामी शिर्डी संस्थान, कनकुरी व पिंपळवाडी या संयुक्त पाणी पुरवठा योजना सन १९९५ पासून कार्यान्वित करणेत आलेली आहे. सदर योजनेतंर्गत मौजे कनकुरी ता.राहाता या ठिकाणी पाणी साठविणेसाठी चार साठवण तलावांची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदरहू योजना तयार करतेवेळी तीन साठवण तलावांची निर्मीती करण्यात आलेली असून महिंद्रा & महिंद्रा लि. नाशिक यांचेकडुन संस्थानचे मौजे कनकुरी येथील गट नं.१२१ मध्ये ३६ एम.एल.क्षमतेचा एक नविन साठवण तलाव सन २०१६ मध्ये देणगी स्वरुपात बनविण्यात आलेला आहे. सदरहू चार साठवण तलावांची एकुण साठवण क्षमता ३११ एम.एल. (द.ल.लिटर) इतकी आहे. सदरचे साठवण तलावात नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन गोदावरी/दारणा नदी, गोदावरी उजवा तट कालवा याव्दारे शासन मंजुरीनुसार पाणी पुरवठा आवर्तन (रोटेशन) देण्यात येत आहे. याकरीता नाशिक पाटबंधारे विभाग, नाशिक यांचेकडुन५३.३२०५ एम.सी.एफ.टी वार्षिक पाणीसाठा मंजुर आहे.

जलसंपदा विभागाकडुन देण्यात येणारा रोटेशन (आवर्तन) कालावधी हा दीड ते दोन महिने (वार्षिक ७ ते ८ आवर्तने) या दरम्यान आहे. संस्थानचा दैनंदिन पाणी वापर हा ३५ लाख लिटर ते ४० लाख लिटर आहे. उन्हाळयात तसेच गर्दीचे कालावधीत यात वाढ होवुन ४० लाख लिटर ते ४५ लाख लिटर होत आहे.

श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ (विजयादशमी) या कालावधीत साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये लाखो साईभक्त श्री साईचे महासमाधीचे दर्शनार्थ शिर्डी येथे भेट देतील. यामुळे साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असल्याने पर्यायी दैनंदिन पाणी वापरातही वाढ होणार आहे. त्यावेळी साईभक्तांची गैरसोय होवू नये यासाठी श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्ष कालावधीत तात्पुरते स्वरुपात वार्षिक मंजूर पाणीसाठा ५३.३२०५ एम.सी.एफ.टी ऐवजी वाढ करुन ७० एम.सी.एफ.टी होणेसाठी मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर, मा.जिल्हाधिकारी नाशिक व कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग नाशिक यांना प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे.

**प्रस्ताव:-** सध्याचा मंजूर वार्षिक ५३.३२०५ एम.सी.एफ.टी (१५१ कोटी लिटर) पाणीसाठा विचारात घेता, जलसंपदा विभागाकडुन उपलब्ध होणा-या पाण्यातुन आपणास साधारणत: अंदाजे ३५ ते ४० लाख लिटर्स पाणी आपण दैनंदिन पुरवू शकतो. यामध्ये वाढ करुन तो वार्षिक ७० एम.सी.एफ.टी (१९८ कोटी लिटर) केल्यास आपणास दैनंदिन ५० लाख लिटर ते ५५ लाख लिटर पाणी पुरविणे शक्य होईल.

सदर योजनेतंर्गत पाणी साठविणेसाठी निर्मिती करण्यात आलेल्या चार साठवण तलावांची एकुण साठवण क्षमता ३११ एम.एल. (द.ल.लिटर) इतकी आहे. याव्दारे दैनंदिन ५० लाख लिटर पाणी ६० दिवस पुरविणे शक्य होईल. संस्थान साठवण तलावांचे पाणी साठवण क्षमतेत वाढ केल्यास जलसंपदा विभागाकडुन देण्यात येणा-या रोटेशन कालावधीत वाढ झाली तरी आपणास सलग ८० दिवस पाणी पुरविता येईल.

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** श्री.रमेश जी.संहेता, मुंबई यांनी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीकरीता नविन वाढीव साठवण तलाव निर्मीतीसाठी देणगी स्वरुपात आर्थिक मदत देणेची तयारी दर्शविलेली आहे. यासाठी संस्थानकडुन जागा उपलब्ध करुन देवून साठवण तलावाची निर्मीती करणेबाबतची कार्यवाही बांधकाम विभागामार्फत करता येईल.

तरी श्री.रमेश जी. संहेता, मुंबई यांचेकडुन नविन साठवण तलाव निर्मीतीसाठी देणगी स्वरुपात आर्थिक मदत स्विकारणेस व वाढीव साठवण तलावाची निर्मीती करणेसाठी सदरचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

निर्णय क्र.७६२ **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, श्री.रमेश जी. संहेता, मुंबई यांचेकडुन नविन साठवण तलाव निर्मीतीसाठी देणगी स्वरुपात आर्थिक मदत स्विकारणेस व वाढीव साठवण तलावाची निर्मीती करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- पाणी पुरवठा विभागप्रमुख)

---

विषय नं.१४ **श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे परिसरातील रस्ते व पार्किंग डांबरीकरण करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद :** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना:** संस्थानमार्फत साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी सन १९९४-९५ मध्ये श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारत उपलब्ध करुन देण्यात आली आहे. सदर इमारतीमधील खोल्या पूर्ण क्षमतेने वापरात असल्याने, तेथे मोठ्या प्रमाणात साईभक्त व वाहनांची ये-जा सुरु असते. तसेच सदर इमारतीचे पूर्वेस अधिकारी निवासस्थाने व वाहन विभाग आहे.

भक्तनिवास इमारतीचे दक्षिण व पश्चिम बाजूने पार्किंग व इमारतीचे संपूर्ण बाजूने अंतर्गत रस्ता तसेच अधिकारी निवासस्थाने व वाहन विभाग इत्यादी परिसरात मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरु असते. सदर ठिकाणी सन २०११ मध्ये डांबरीकरण करणेत आले होते. सततचे वापराने सदर ठिकाणचे डांबरीकरण खराब झालेले आहे. करीता सदरचे पार्किंग व अतंर्गत रस्ते जास्त खराब झालेल्या ठिकाणी खड्डे भरणे, त्यानंतर डांबरीकरण सिलकोटसह करणे अत्यावश्यक आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण / एकक |
|---|---|---|
| ०१. | पूर्व-पश्चिम मुख्य रस्ता व अंगर्तत रस्ते. | ५३९१.६० चौ. मी. |
| ०२. | भक्तनिवासस्थान इमारतीचे दक्षिण बाजूने असलेली पार्किंग | २५६४.९५ चौ. मी. |
| ०३. | भक्तनिवास इमारतीचे पश्चिम बाजूने असलेली पार्किंग | १८०७.६४ चौ. मी. |
| ०४. | वाहन विभागाकडे जाणारा रस्ता वाहन विभाग परिसर | ५५५६.०० चौ. मी. |
| ०५. | अधिकारी निवासस्थानकडे जाणारा रस्ता व पार्किंग | २६००.०० चौ. मी. |
| | **एकुण.** | **१७९२०.१९ चौ. मी.** |

वरीलप्रमाणे रस्ते व पार्किंग परिसरात एकुण १७९२०.१९ चौ. मी. भागात खड्डे भरणे, डांबरीकरण करणे व इतर अनषंगीक कामे करणे यासाठी सन २०१७-१८ चे जिल्हा दरसूचीनुसार तयार करणेत आलेले अंदाजपत्रकानुसार रु.४३,१९,४३०/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव:** तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु४३,१९,४३०/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करुन घेणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० रुम) इमारतीचे परिसरातील प्रस्तावात नमुद केलेले रस्ते व पार्किंगचे डांबरीकरण करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.४३,१९,४३०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**विषय नं.१५** **गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम नियमित चालविणेस परवानगी मिळणेबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचे दि.०२.०५.२०१४ व दि.२६.०९.२०१६ रोजीचे पत्र.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एका वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव -** गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल कॅमेरा क्लोकरुम श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांना नियमित चालविणेकामी मुदतवाढ देणेबाबत..

**प्रस्तावना-** श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील सिटी सर्वे नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ (क्षेत्र १३ चौमी) मा.व्यवस्थापन समितीचे दि.१९/०२/२०१२ रोजीचे सभेतील विषय नं.२ निर्णय क्रं.१७२ अन्वये मागील अटी/शर्तीप्रमाणे पूर्वीचे मासिक परवाना फी मध्ये १०% वाढ करुन (म्हणजे रु.४,४००/-+ ४४०/- = रु.४,८४०/-) दि.२०/०१/२०१२ पासून पूढे ११ महीने कालावधीसाठी म्हणजेच दि.१९/१२/२०१२ अखेर व्यवसाय करणेस मान्यता दिलेली आहे. तद्नंतरचे मुदतवाढीकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी यांनी त्यांचेकडील दि.१९/१०/२०१२ रोजीचे पत्रान्वये सदर व्यवसायाची मुदत पुढील ५ वर्षांकरीता वाढवून मिळणेकामी विनंती केलेली आहे. तथापि मा.उच्च न्यायालयाचे पूर्व परवानगीशिवाय पुढील मुदतवाढ देता येत नाही ,असेबाबत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी यांना इकडील दि.१७/११/२०१२ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले. परिणामी उक्त मोबाईल,कॅमेरा क्लोकरुम व्यवसायाची मुदत करारनाम्यानुसार दि.१९/१२/२०१२ रोजी संपुष्टात आलेली आहे. तथापि सदर दक्षिणेकडील गेट नं.४ चे प्रवेशद्वाराजवळ साईभक्तांना मोबाईल ठेवणेसाठी लॉकर उपलब्ध नसलेने साईभक्तांची निर्माण होणारी अडचण लक्षात घेता तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी यांनी पूर्वीप्रमाणेच सदर ठिकाणी मोबाईल लॉकर सुरु करणेबाबत तोंडी सूचना दिल्या. त्यानुसार दि.०७/११/२०१३ पासून श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी यांनी मोबाईल कॅमेरा क्लोकरुम सदर ठिकाणी सुरु केलेले आहे. उक्त सोसायटीने सदर ठिकाणी चालवत असलेले क्लोकरुम नियमित चालविणेस परवानगी मिळणेकामी त्यांचेकडील दि.०२/०५/२०१४ रोजीचे पत्रान्वये संस्थानकडे विनंती केली.

त्या अनुषंगाने प्रस्तुतचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०३/०८/२०१४ रोजीचे सभेपूढे विषय नं.३२ प्रमाणे सादर करणेत आला. त्यावर निर्णय क्रं.६४२ प्रमाणे खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावित कामी संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत येवून मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाचे निर्देशाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी," असे ठरले.

उक्त निर्णयाप्रमाणे सदर सोसायटीला प्रस्तुतचा व्यवसाय करणेकामी मुदत वाढवून देणेकामी मा.उच्च न्यायालय, खंडपीठ,औरंगाबाद यांचे कोर्टात सिव्हील ॲप्लिकेशन नं.१०४२६/२०१४ चे दि.०६/१०/२०१४ रोजी दाखल करणेत आले. सदर अर्जावर मा.न्यायालयाकडून निर्णय झाला नाही. दरम्यानचे काळात शासनाकडून मा.व्यवस्थापन समिती गठीत करण्यात आली. त्यामुळे मा.व्यवस्थापन समितीचे दि.१६/०८/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.५६६ अन्वये मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडेस दाखल केलेले उपरोक्त सिव्हील ॲप्लिकेशन दि.०८/०९/२०१६ रोजी मागे घेणेत आलेले आहे.

सध्यस्थितीत गुरुस्थान मंदिराच्या दक्षिणेकडील सि.स.नं.२० नगरपंचायत मिळकत घर नं.७०६ क्षेत्र १३ चौमी मध्ये श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी ही सोसायटी चालवत असलेला मोबाईल कॅमेरा क्लोकरुम व्यवसाय दि.०७/११/२०१३ पासून आजअखेर चालू आहे व उक्त सोसायटी संस्थानला दरमहा भाडे रक्कम रु.४,८४०/- इतकी अदा करीत आहे.

उक्त सोसायटीकडून दि.०७/११/२०१३ पूर्वी एक वर्षासाठी आकारलेले भू-भाडे दरमहा रक्कम रु.४,८४०/- मध्ये दि.०७/११/२०१३ नंतर प्रति वर्षी १० टक्के प्रमाणे वाढ करुन खालील तक्त्यात दर्शविलेल्या कालावधीसाठी सोसायटी कडून भाडे वसूल करता येईल.

| अ.नं. | करारनामा तारीख | मासिक भाडे | वसूल करावयाचे एकूण भाडे | वसूल झालेले एकूण भाडे | भाडे वसूल करावयाची बाकी | करारानुसार पुढील १०% दरमहा होणारी भाडेवाढ रक्कम (रकाना क्रं.३ मधील रकमेच्या १०% रक्कम) | १०% भाडेवाढ धरुन दरमहा होणारे एकूण भाडे (रकाना क्रं.३+७) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दि.०७/११/२०१२ ते दि.०६/११/२०१३ | ४,८४०/- | ५८,०८०/- | ५८,०८०/- | --- | ४८४/- | ५,३२४/- |
| २ | दि.०७/११/२०१३ ते दि.०६/११/२०१४ | ५,३२४/- | ६३,८८८/- | ५८,०८०/- | ५,८०८/- | ५३२/- | ५,८५६/- |
| ३ | दि.०७/११/२०१४ ते दि.०६/११/२०१५ | ५,८५६/- | ७०,२७२/- | ५८,०८०/- | १२,१९२/- | ५८६/- | ६,४४२/- |
| ४ | दि.०७/११/२०१५ ते दि.०६/११/२०१६ | ६,४४२/- | ७७,३०४/- | ५८,०८०/- | १९,२२४/- | ६४४/- | ७,०८६/- |
| | एकूण | | २,६९,५४४/- | २,३२,३२०/- | ३७,२२४/- | | |

(अक्षरी रु.सदोतीस हजार दोनशे चोवीस मात्र)

**विभागाचा अभिप्राय-** उपरोक्तप्रमाणे दि.०६/११/२०१६ अखेर उक्त सोसायटीकडून वसुल करावयाचे भाडे रक्कम रु,३७,२२४/- इतकी वसुल करुन घेवून व उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या कालावधीसाठीचे करारनामे पूर्वीप्रमाणेच नोटरीसमोर नोंदविणेकामी व श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी यांचे दि.२६/०९/२०१६ रोजीचे पत्राप्रमाणे दि.०७/११/२०१६ ते दि.०६/१०/२०१७ या ११ महीन्यांच्या कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.७,०८६/- + १०% रु.७०९/- = एकूण रक्कम रु.७,७९५/- इतकी निश्चित करुन त्याप्रमाणे करारनामा करुन घेणेकामीच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि., शिर्डी यांचेकडून गुरुस्थान मंदिराचे दक्षिणेकडील मोबाईल, कॅमेरा क्लोकरुम चालविणेच्या व्यवसायाचे प्रस्तावात नमुद केलेनुसार भाडे वसुल करणेत यावे व यापुढील कालावधीसाठी त्यांना मुदतवाढ देणेपुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता कक्ष)

---

**विषय नं.१६** **सन २०१७ दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना, शिर्डी यांनी जा.नं.श्री.सा.सं.क.सं. /३५/२०१७ दि.०५/०८/२०१७ रोजीचे पत्रान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे व्यवस्थापन मंडळाने तसेच आपण कर्मचा-यांच्या हिताच्या दृष्टीने वेळोवेळी करण्यात आलेल्या मागण्यांचा तातडीने विचार करुन कार्यवाही केलेली आहे. त्याबद्दल "श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना" श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था व आपले मनःपुर्वक आभारी आहोत.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत दरवर्षी संस्थान कर्मचा-यांना दिपावली सानुग्रह देण्यात येते. त्याबद्दल श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना आपले मनःपुर्वक आभारी आहोत. यावर्षी दिपावली दि.१९/१०/२०१७ रोजी असुन दरवर्षी ८.३३ टक्के इतका सानुग्रह अनुदान दिला जात आहे. परंतु दिवसेंदिवस पडणारा दुष्काळ, वाढलेली महागाई लक्षात घेता ह्या दिपावली निमित्त कर्मचा-यांना सानुग्रह अनुदानात वाढ करुन १६.६६ टक्के इतका (डबल) दिल्यास दिपावली आनंदाने साजरी करता येईल.

तरी मा. महोदया श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटना आपणास नम्रपणे विनंती करते की, ह्या वर्षी दिपावली निमित्त संस्थान कर्मचा-यांना त्यांचे दोन महिन्यांचे पगाराइतके सानुग्रह अनुदान मिळावे, ही नम्र विनंती.

**(ब)** सन १९७७ पासून तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळ/समितीचे निर्णयानुसार तसेच मा.न्यायालयाचे निर्णयानुसार संस्थानचे व्यवस्थापन पहाणारे मा.कोर्ट रिसीव्हर यांनी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवानिमित्त दरवर्षी दिपावलीपुर्वी सानुग्रह अनुदान देणेत येत आहे. त्यानंतर सन १९८४ मध्ये मा.सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई यांनी संस्थान व्यवस्थापनासाठी स्किम तयार करुन, मा.धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे नियंत्रणाखाली तत्कालीन मा.व्यवस्थापन मंडळानेही संस्थानचे व्यवस्थापन पहात असतांना दरवर्षी संस्थान सेवकांना सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे.

दरम्यानचे कालावधीत, माहे ऑगस्ट, २००४ मध्ये महाराष्ट्र शासनाने संस्थानचे दैनंदिन व्यवस्थापन व प्रशासन पहाणेकरीता, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम, २००४ (अधिनियम क्रमांक १४) हा कायदा पारीत केला. या अधिनियमात संस्थान कर्मचा-यांचे बाबतीत प्रामुख्याने खालील तरतुदी करणेत आलेल्या आहेत.

कलम नं.१५- मुख्य कार्यकारी अधिकारी आणि इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेच्या अटी व शर्ती या शीर्षाखालील पोटकलम (३) समितीच्या मुख्य कार्यकारी अधिका-याचे आणि इतर अधिका-यांचे व कर्मचा-यांचे वेतन व भत्ते आणि इतर खर्च हे व्यवस्थापन निधीतून देण्यात येतील.

कलम नं.१६- सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडे नेमून देणे या शीर्षाखालील "नियत दिवसाच्या लगतपुर्वी जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तीला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या कामकाजांशी संबंधीत अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल; आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही."

परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदीनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही.

कलम १७- समितीची कर्तव्ये व अधिकार या शीर्षाखालील पोटकलम (२) (घ) समितीच्या सदस्यांना व मुख्य कार्यकारी अधिका-याला व इतर अधिकारी व कर्मचारी यांना व्यवस्थापन निधीतून वेतन, मानधन, फी व भत्ते आणि इतर देय रकमा नियमित प्रदान करील.

तसेच या व्यतिरिक्त कलम १५ चे तरतुदीत उल्लेख केलेल्या व्यवस्थापन निधीबाबत या अधिनियमात कलम २२- व्यवस्थापन निधी व त्याचा विनीयोग या शीर्षाखालील तरतुदीत पोटकलम (३) (ख) मध्ये समितीचे इतर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते देणे असे स्पष्टपणे नमूद करणेत आलेले आहे.

उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या मा.व्यवस्थापन समितीने सन २००४ ते सन २०१२ पर्यंत दरवर्षी संस्थान सेवकांना दिपावली उत्सवाकरीता सानुग्रह अनुदान देणेस मान्यता दिलेली आहे. त्याप्रमाणे संस्थान सेवकांना दरवर्षी दिपावली उत्सवाकरीता सानुग्रह अनुदान वाटप/अदा करण्यात आलेले आहे.

तसेच, दरम्यानचे कालावधीत, म्हणजेच सन २०१३, २०१४ व २०१५ बाबत वेळोवेळी मा.त्रिसदस्य समिती व मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने सन २०१३ ते २०१५ अखेर संस्थानचे स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना प्रतिवर्षी सानुग्रह अनुदान अदा करणेस सशर्त (Provisionally) मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन प्रत्येक वर्षी स्थायी व अस्थायी कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान वाटप/अदा करणेत आलेले आहे.

शासन पत्र क्र. सासंवि-२०११/५३८/प्र.क्र.६९/पूर्नबांधणी-१२/का.१६ विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई- ३२ दि. २३/०१/२०१३ चे पत्रान्वये शासनाने शासनाच्या प्रचलित धोरणानुसार कर्मचा-यांना बोनस देण्याचे बंद असतांना संस्थानच्या आस्थापनेवरील कर्मचा-याना शासनाची मान्यता घेणे आवश्यक असलेबाबत कळविलेले आहे.

त्यानुसार मागील वर्षी मा. व्यवस्थापन समिती दि. ०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७४८ व महाराष्ट्र शासन, विधि व न्याय विभाग यांचे शासन निर्णय क्रमांकः सासंवि १०१६/१४३२/ प्र.क्र.१८२/कार्या-१६, दि. २९ ऑक्टोबर २०१७ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सेवेतील पात्र कायम व कंत्राटी कर्मचा-यांना दि. ०१/१०/२०१५ ते दि. ३०/०९/२०१६ या कालावधीत त्यांच्या वार्षिक वेतनाच्या ८.३३% इतके सानुग्रह अनुदान मंजूर करण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन लेखाशाखा विभागाकडील दिनांक

१६/०८/२०१७ रोजीचे अहवालानुसार सानुग्रह अनुदानापोटी सन २०१६ मध्ये एकूण रु.६,९८,०५,८८५/- इतकी रक्कम अदा करणेत आलेली आहे.

**(क)** उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, प्रचलित पध्दतीप्रमाणे श्री साईबाबा संस्थान कर्मचारी संघटनेचे मागणीनुसार सन-२०१७ चे दिपावली उत्सवाचे सानुग्रह अनुदानाकरीता खाली नमुद केलेल्या अटी शर्तीनुसार संस्थान आस्थापनेवरील स्थायी, अस्थायी (कंत्राटी), एकत्रित मानधन/ वेतनावरील कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत प्रस्तावीत करणेत येत आहे.

(०१) सन-२०१७ दिपावली उत्सवानिमित्त सानुग्रह अनुदानासाठी प्रचलित नियमाप्रमाणे पात्र ठरणा-या स्थायी व अस्थायी संस्थान सेवकांना दि.०१ ऑक्टोबर, २०१६ ते दि. ३० सप्टेंबर, २०१७ अखेर वार्षिक वेतनाच्या ८.३३ टक्के दराने लेखाशाखेकडील दिनांक १६/०८/२०१७ रोजीचे अहवालानुसार अंदाजे रक्कम रुपये ७,५५,००,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी पंच्चावन्न लाख) मात्र इतका खर्च येणार आहे.

(०२) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ या कालावधीत संस्थान आस्थापनेवरील स्थायी (कायम) तसेच मानधनावर सेवेत असलेले अधिकारी व कर्मचारी, कंत्राटी पध्दतीने नेमणूका देण्यात आलेले अधिकारी/ कर्मचारी, कंत्राटी सल्लागार/ मोजणीदार, डीटीपी ऑपरेटर, ग्रंथपाल, अर्धवेळ सहाय्यक शिक्षक व संस्थान आस्थापनेवर प्रतिनियुक्तीने सेवेत असलेले शासकीय अधिकारी यांना दिलेल्या वार्षिक एकूण वेतनाचे / पगाराच्या ८.३३ टक्के दराने होणारी रक्कम अदा करता येईल.

(०३) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ या कालावधीत ज्या कर्मचा-यांवर गैरवर्तनाचा ठपका ठेवून अथवा ज्या कर्मचा-यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन, सेवेतून कमी केलेले आहे. तसेच ज्या कर्मचा-यांनी या कालावधीत संस्थान सेवेचा राजीनामा दिला आहे, अशा कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान देय होणार नाही.

(०४) दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१६ ते दिनांक ३० सप्टेंबर, २०१७ या कालावधीत संस्थानला कंत्राटी पध्दतीने कामगार पुरविणेसाठी नेमलेल्या लेबर व सुरक्षा कंत्राटदारामार्फत कामास असलेल्या कंत्राटी कुशल, अकुशल व एकत्रित वेतन/ मानधनावरील तसेच माजी सैनिक सुरक्षा रक्षकासह इतर सुरक्षा कर्मचारी यांना दिलेल्या वार्षिक एकूण वेतनाचे ८.३३ टक्के दराने होणारी सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधीत कंत्राटी कामगार यांना कंत्राटदारामार्फत अदा करता येईल.

उपरोक्त प्रस्तावीत केलेप्रमाणे सन-२०१७ साठी अट-शर्त क्र.०२ व ०४ नुसार पात्र होणा-या संस्थानचे स्थायी व अस्थायी पदावरील अधिकारी व कर्मचा-यांना दि.०१ ऑक्टोबर, २०१६ ते दि.३० सप्टेंबर, २०१७ या कालावधीत एकूण पगाराच्या ८.३३ टक्के दराने अंदाजे रक्कम रु.७,५५,००,०००/- (अक्षरी रुपये सात कोटी पंचावन्न लाख) मात्र सानुग्रह अनुदान अदा करणेकामीचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेस तसेच मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने शासनाचे दि. २३/०१/२०१३ रोजीचे पत्रातील निर्देशास अनुसरुन सदरचा प्रस्ताव मा. प्रधान सचिव विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडे शासन मान्यतेसाठी पाठविणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेनुसार पात्र स्थायी, अस्थायी (कंत्राटी) संस्थान कर्मचाऱ्यांना सन २०१७ दिपावली निमित्ताने सानुग्रह अनुदान देणेच्या उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.**

**परंतु विधी व न्याय विभागाचे सासंकि २०११/ ५३८/ प्र.क्र.६९/ पुनर्बांधणी-१२/ का.१६, दि.२३.०१.२०१३ रोजीचे पत्रास अनुसरुन, सदरहू सानुग्रह अनुदान संस्थान नियमानुसार पात्र ठरणाऱ्या स्थायी व अस्थायी (कंत्राटी) कर्मचाऱ्यांना आदा करणेपुर्वी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१७** **दिनांक २०.०८.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७६६** दिनांक २०.०८.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग)

---

**विषय नं.१८** **शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देय असलेला सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमातील तरतूद –** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम २१ (१) (ज) मध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये विश्वस्तव्यवस्थेकडून देय असलेले कोणतेही कर, भाडे, भरपाई, आकार व इतर रकमा यांचे प्रदान करील, अशी तरतूद आहे.

**प्रस्ताव–** शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना देय असलेला सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचा मालमत्ता कर भरणेबाबत..

**प्रस्तावना-** शिर्डी नगरपंचायत,शिर्डी यांनी त्यांचेकडील उपरोक्त दि.२८/०७/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाचे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या एकूण १३४ मालमत्तेवरील संकलित कर, शिक्षण कर,रोजगार हमी कर,वृक्ष कर व अग्निशमन कराची आकारणी मागणीची एकूण रक्कम रु.१,०२,६६,०७३/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख सहासष्ट हजार त्र्याहत्तर मात्र) इतकी कळविलेली आहे.

त्यानंतर शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी त्यांचेकडील दि.०८/०८/२०१७ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त रक्कम १५ दिवसांचे आत नगरपंचायत कार्यालयास भरणा केल्यास नगरपंचायत अधिनियम १९६५ चे कलम १५०(३) अन्वये १ % सूट देण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे संकलित करावर १ % सूट रक्कम रु.५२,०१७/- इतकी वजा करुन एकूण रक्कम रु.१,०२,१४,०५७/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख चौदा हजार सत्तावन्न मात्र) चा भरणा नगरपंचायत कार्यालयात जमा करावा,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

**विभागाचा अभिप्राय–** १) उपरोक्त मालमत्तेवरील कराच्या रकमेच्या १ % रिबेट वजा जाता रक्कम रु.१,०२,१४,०५७/- (अक्षरी रु.एक कोटी दोन लाख चौदा हजार सत्तावन्न मात्र) इतकी RTGS द्वारे लेखाशाखेमार्फत नगरपंचायत, शिर्डी यांना अदा करता येईल. २) तसेच यापूढे संस्थान मिळकतीचे संबंधातील शासकीय अथवा निमशासकीय कर,भाडे,भरपाई,आकार व इतर शासनास देय असलेल्या रकमा शासनास अदा करणेबाबतचा निर्णय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर घेता येईल, त्यास मान्यता असावी.

सदरचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, असे ठरले की, संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस वेळोवेळी बराचसा निधी दिला जातो, याकरीता शिर्डी नगरपंचायतीने संस्थान इमारतींचा कर माफ करावा, असे त्यांना कळविणेत यावे.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **दिनांक ०६.०९.२०१७ रोजी झालेल्या झालेल्या स्थानिक उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.७६८** दिनांक ०६.०९.२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या स्थानिक उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१** **पाणी पुरवठा विभागाकरीता साईआश्रम A व B ब्लॉक प्लंबिग मेंटेंनन्स साहित्य खरेदीकामी ई-निविदेतील न्युनतम दरांबाबत निर्णय होणेबाबत.**

संस्थानचे पाणी पुरवठा विभागाकरीता साईआश्रम A व B ब्लॉक प्लंबिग मेंटेंन्सस साहित्य खरेदीकामीमहाराष्ट्र शासनाचे संकेत स्थळावर ई-निविदा प्रसिध्द करण्यात आलेली होती.

मुदतीअंती २ निविदा प्राप्त झाल्याने त्यास शासनाचे खरेदी नियमावलीनुसार एक आठवडयाची म्हणजेच दि.३१.०५.२०१७ पर्यंत मुदत वाढ देण्यात आलेली होती. मुदतीअंती तीन ई-निविदा प्राप्त झालेल्या होत्या. सदर तीन तांत्रिक निविदा दि.०७.०६.२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेत उघडून कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रिकदृष्ट्या २ निविदा पात्र तर १ निविदा अपात्र ठरलेली होती.

शासनाचे दि.०१.१२.२०१६ चे सुधारित खरेदी नियमावलीतील ४:४:३:१ निविदा कालावधीस मुदतवाढ यामध्ये खालीलप्रमाणे तरतुद आहे.

**४:४:३:१ निविदा कालावधीस मुदतवाढ-**

निविदा स्पर्धात्मक होण्यासाठी कमीत कमी तीन निविदाकार असणे आवश्यक आहे. तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्यास, संबंधीत खरेदी अधिका-याने प्रथम किमान एक आठवडयाची मुदतवाढ

द्यावी. अशी मुदतवाढ दिल्यानंतर देखिल तीन पेक्षा कमी निविदाकारांनी भाग घेतला असल्याचे निदर्शनास आल्यास दुस-यांदा एक आठवडयाची मुदतवाढ द्यावी. त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देऊ नये.

वरील नमुद वस्तूस्थिती व शासनाचे सुधारित खरेदी नियमावलीतील वरील तरतुदीस अनुसरुन पात्र दोन्ही निविदाधारकांच्या व्यापारी निविदा दि.१२.०७.२०१७ रोजीचे खरेदी समितीचे सभेत उघडण्यात आलेल्या आहेत. त्यांचा ऑनलाईन प्राप्त तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे–

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Asian Sales Corporation | Union Trading |
|---|---|---|---|---|
| 1 | 1" फ्लश कॉक (U 1509) | २५६ नग | २,१५३.०० | **२,०३६.००** |
| 2 | 1" यु.पी.व्ही.सी. पाईप (80) | १८०० फुट | **२७.५०** | २७.६० |
| 3 | 1" यु.पी.व्ही.सी. ब्रास थ्रेडर (आतील आटे) | ५१२ नग | १४०.०० | **१३२.००** |
| 4 | 1" यु.पी.व्ही.सी. ब्रास थ्रेडर (बाहेरील आटे) | ५१२ नग | **१७०.००** | १७५.०० |
| 5 | 1" यु.पी.व्ही.सी. एलबो | ३०० नग | **१८.५०** | १९.०० |
| 6 | 1/2" यु.पी.व्ही.सी. ब्रास टी | २६० नग | **७०.००** | ७४.०० |
| 7 | 1/2" ॲंगल कॉक (EC-0507) | २६० नग | ६८०.०० | **६४०.००** |
| 8 | कमोड शिट कव्हर, आयव्हरी कलर | २५६ नग | **६८०.००** | ७१०.०० |
| 9 | सी.पी. जेट स्प्रे, विमान टाईप (U 1905) | २५६ नग | ६५२.०० | **६११.००** |
| 10 | कमोड संडास भांडे आयव्हरी कलर | ३० नग | **३,६५०.००** | ३,७८०.०० |
| 11 | नेटल फोल्ड सी.पी.स्क्रु – 75/10 | ८ पुडे | ०० | ०० |
| 12 | सी.पी.व्ही.सी सोल्युशन (२०० ग्रॅम पॅक) | २० पॅक | **३५८.००** | ३६०.०० |
| 13 | यु.पी.व्ही.सी सोल्युशन (२३७ ग्रॅम पॅक) | २२ पॅक | **१९९.००** | २१०.०० |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील न्युनतम दर गडद व अधोरेखित केलेले आहेत.

निविदा प्रकिया राबवितांना दोन निविदा पात्र ठरल्यास खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**ब)** दोन निविदा तांत्रिकदृष्ट्या पात्र ठरल्यास खरेदीची वास्तविक किंमत व अगोदर ठरलेली अंदाजित किंमत यामध्ये (-) २० टक्के (+) १० टक्के तफावत असल्यास ती मान्य करण्यास खरेदीदार विभागास मुभा राहील. या किंमत श्रेणीमध्ये (Price Band) किमती न आल्यास फेरनिविदा काढावी.

सदर तरतूदीस अनुसरुन निविदेतील L1 दर व अंदाजित किंमत यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे-

| अ.नं. | **साहित्याचा तपशिल** | **मागणी** | **प्रस्तावातील अंदाजित दर** | **ई-निविदा L1 दर** |
|---|---|---|---|---|
| 1 | 1" फ्लश कॉक (U 1509) | २५६ नग | २,४७५.०० | **२,०३६.००** |
| 2 | 1" यु.पी.व्ही.सी. पाईप (80) | १८००फुट | ३३.०० | **२७.५०** |
| 3 | 1" यु.पी.व्ही.सी. ब्रास थ्रेडर (आतील आटे) | ५१२ नग | १३५.०० | **१३२.००** |
| 4 | 1" यु.पी.व्ही.सी. ब्रास थ्रेडर (बाहेरील आटे) | ५१२ नग | १९५.०० | **१७०.००** |
| 5 | 1" यु.पी.व्ही.सी. एलबो | ३०० नग | २१.०० | **१८.५०** |
| 6 | 1/2" यु.पी.व्ही.सी. ब्रास टी | २६० नग | ५५.०० | **७०.००** |
| 7 | 1/2" ॲंगल कॉक (EC-0507) | २६० नग | ६५०.०० | **६४०.००** |
| 8 | कमोड शिट कव्हर, आयव्हरी कलर | २५६ नग | ३५०.०० | **६८०.००** |
| 9 | सी.पी. जेट स्प्रे, विमान टाईप(U 1905) | २५६ नग | ७८०.०० | **६११.००** |
| 10 | कमोड संडास भांडे आयव्हरी कलर | ३० नग | १,३००.०० | **३,६५०.००** |
| 11 | नेटल फोल्ड सी.पी.स्क्रु – 75/10 | ८ पुडे | ५५०.०० | ०० |
| 12 | सी.पी.व्ही.सी सोल्युशन (२०० ग्रॅम पॅक) | २० पॅक | ३१०.०० | **३५८.००** |
| 13 | यु.पी.व्ही.सी सोल्युशन (२३७ ग्रॅम पॅक) | २२ पॅक | २५०.०० | **१९९.००** |

सुधारित खरेदी नियमावलीतील तरतूद क्रं.४.४.३.१ (ब) तरतुदीनुसार वरील तक्त्याचे अवलोकन करता अ.नं.१,३,७,९ व १३ या पाच Items साठी न्युनतम दरधारक मे. युनियन ट्रेडींग, नाशिक व मे.अ.नं.२,४, व ५ या तीन Items साठी मे. एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांना पुरवठा आदेश देता येतील, तर ६,८,१० व १२ या ४ Items साठी वरील नियमावलीतील तरतुदीनुसार दर जास्त असल्यामुळे पुरवठा आदेश देता येणार नाही, तर तर अ.नं.११ साठी कुणाचेही दर प्राप्त नाहीत. त्यामुळे वरील ६,८,१० ,११, १२ क्रमांकावर असलेल्या ५ आयटेम्सचा अंदाजे खर्च रु.३ लाखांपेक्षा कमी असल्यामुळे ते कोटेशन मागवून खरेदी करावी लागतील.

सदर ई-निविदा मे २०१७ मध्ये प्रसिध्द करण्यात आलेली होती, त्यामध्ये खालीलप्रमाणे जीएसटी बाबतचे अटीचा समावेश होता.

ई-निविदेतील अट क्रं.१७- सदर ई-निविदा प्रक्रिया चालू असतांना किंवा पुरवठा आदेशानंतर पुरवठादाराला अदा कराव्या लागणा-या करामध्ये बदल झाल्यास किंवा करप्रणालीत बदल झाल्यास त्यानुसार साहित्याचे किमतीमध्ये त्याप्रमाणात वाढ किंवा घट करण्यात येईल. मात्र सदर वाढ किंवा घट ही निविदा सादर करतेवेळी असलेल्या कराच्या प्रमाणावरुन ठरविण्यात येईल. म्हणजे निविदा सादर करतेवेळी असलेल्या करामध्ये नंतर वाढ/घट झाल्यास फक्त झालेली वाढ/घट किंमत ठरवितांना विचारात घेण्यात येईल. मात्र काम पुर्ण झाल्यानंतर किंवा मालाचा पुरवठा पुर्ण झाल्यानंतर सदर वाढ/घट झाल्यास ती लागू राहणार नाही. अशी अट नमूद करण्यात आलेली होती.

तसेच जीएसटीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५.०७.२०१७ रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

निर्णय क्रं.६६८ – "दि.०१ जुलै २०१७ पासून संपुर्ण देशामध्ये वस्तू व सेवा कायदा लागू झाला असून त्यामध्ये ब-याचशा वस्तू व सेवा करांच्या दरांमध्ये मोठया प्रमाणात बदल झालेला आहे. सेवा/पुरवठाधारक यांना आदा करावयाचा कर सदरहू पुरवठाधारकांना शासनास भरावा लागतो. त्यामुळे तो कर पुरवठाधारकांच्या नफ्याचा/ उत्पन्नाचा भाग येत नाही. त्यामुळे वस्तू व सेवा करामध्ये,अगोदरच्या कराच्या तुलनेने जी वाढ/घट झालेली असेल ती वाढ, संबंधीत पुरवठाधारकांनी मागणी केल्यास प्रकरण परत्वे खत्री करुन, त्यांना आदा करण्यात यावी/ कमी करण्यात यावी. तथापि, अशी वाढ देतांना पुर्वीची करप्रणाली व नवीन करप्रणालींचा पुर्ण अभ्यास संबंधीत विभागांने करुन नंतरच अशी वाढ द्यावी. तसेच जर वस्तू व सेवा कायद्यानुसार वस्तूचे दर कमी झाले असतील तर त्याचाही आढावा सर्व विभागांनी घ्यावा व त्यानुसार दर कमी करणेबाबत कार्यवाही करावी, असे ठरले."

वरील नमूद वस्तुस्थिती, सुधारित खरेदी नियमावलीतील तरतुदीं तसेच निविदेतील जीएसटीबाबतची अट व मा.व्यवस्थापन समितीचा जीएसटीबाबत झालेला निर्णय विचारात घेता वरीलप्रमाणे नमूद ८ आयटेम्ससाठी लागू असलेला न्यूनतम दर अधिक लागू असलेला जीएसटी कर रक्कम (जास्त/ कमी) समावेश करुन पुरवठाधारकांना पुरवठा आदेश दयावा लागेल असे मत आहे.

तरी उपरोक्त तक्त्यातील नमूद ८ Items साठी न्यूनतम दरधारकांना पुरवठा आदेश देणेस व उर्वरीत ५ Items साठी पुन्हा कोटेशन मागणी करणेबाबत निर्णय होणेकामी सदरचा विषय मा.उपसमितीचे सभेपुढे सादर.

**साईआश्रम A व B ब्लॉक करीता प्लंबिग मेंटेंनन्स साहित्य खरेदी करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारकांना आजचे सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत आले होते. त्यापैकी मे.युनियन ट्रेडींग कंपनी, नाशिक यांचे प्रतिनिधी सभेसमोर दरांवर चर्चा करणेसाठी हजर होते, त्यांनी सभेसमक्ष तसेच मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक हे सभेसमोर उपस्थित राहू शकले नाहीत, याकरीता त्यांनी ई-मेलद्वारे खालीलप्रमाणे अंतीम दर देऊ केले.**

**०१. मे.युनियन ट्रेडींग कंपनी, नाशिक यांनी दिलेले अंतीम दर-**

| अ.नं. | तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. | साहित्याचा तपशील | मागणी | मे.युनियन ट्रेडींग कंपनी, नाशिक | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ई-निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेले प्रती नग दर रु. |
| 1 | 1 | 1" फ्लश कॉक (U 1509) | २५६ नग | २,०३६.०० | **२,०००/-** |
| 2 | 3 | 1" यु.पी.व्ही.सी. ब्रास थ्रेडर (आतील आटे) | ५१२ नग | १३२.०० | **१३०/-** |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 7 | 1/2" ॲंगल कॉक (EC-0507) | २६० नग | ६४०.०० | **६४०/-** |
| 4 | 9 | सी.पी. जेट स्प्रे, विमान टाईप (U 1905) | २५६ नग | ६११.०० | **६००/-** |

**०२. मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक यांनी ई-मेलद्वारे दिलेले अंतीम दर-**

| अ. नं. | तुलनात्मक तक्त्यातील अ.नं. | साहित्याचा तपशील | मागणी | मे.एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | ई-निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. | चर्चेअंती देऊ केलेले प्रती नग दर रु. |
| 1 | 2 | 1" यु.पी.व्ही.सी. पाईप (80) | १८०० फुट | २७.५० | **२७/-** |
| 2 | 4 | 1" यु.पी.व्ही.सी. ब्रास थ्रेडर (बाहेरील आटे) | ५१२ नग | १७०.०० | **१६८/-** |
| 3 | 5 | 1" यु.पी.व्ही.सी. एलबो | ३०० नग | १८.५० | **१८/-** |
| 4 | 13 | यु.पी.व्ही.सी सोल्युशन (२३७ ग्रॅम पॅक) | २२ पॅक | १९९.०० | **१९५/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम A व B ब्लॉकचे प्लंबिग मेंटेनन्स करणेकरीता पाणी पुरवठा विभागाकरीता आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणेकामी उपरोक्त तक्त्यामधील गडद व अधारेखीत केलेले अंतीम निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच उर्वरीत ५ Items साठी पुन्हा विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०२ **संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थानन विश्वस्त व्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१(१) मधील पोट कलम (क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासनकरणे व पोट कलम (झ) विश्विस्तव्यवस्थेच्या मालमत्तांचा विकास करणे आणि विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनांसाठी स्थावर किंवा जंगम मालमत्तांचे संपादन करणे

**मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २२/१२/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक ९१२ अन्वये खालील प्रमाणे झालेला आहे.

"…यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील जमिनी भोवती कुंपन करणेचे काम उत्पादक कंपन्यांकडुन करुन घेणेत यावे, असे समितीचे मत झाले. याकरीता सदरहु फेर ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता देणेत आली."

**प्रस्तावना:-** संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व को-हाळे येथील खालील क्षेत्रात संरक्षणाचे दृष्टीने कुंपन करणे प्रस्तावित आहे. विषयांकीत कामासाठी सुधारीत जिल्हा दरसूची (DSR) सन २०१६-१७ नुसार येणारे रु.३६,७१,८६३/- मात्र इतका खर्च अपेक्षीत होता.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२२/१२/२०१६ रोजीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. सदरहु प्राप्त ई-निविदांच्या तांत्रिक माहितीचा लिफाफा मा. खरेदी समितीच्या दि.२१/०३/२०१७ रोजीच्या सभेपुढे उघडणेत आला. सदरहू कामी फक्त दोनच निविदाधारक पात्र ठरत असल्याने दि.२२/०३/२०१७ रोजीच्या टिपणीअन्वये याकामी फेर निविदा मागविणेस मान्यता देणेत आली आहे.

ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची वाढीव अंतिम मूदत दि.३०/०७/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदतीत खालील ०५ ई-निविदा अपलोड झालेल्या आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | श्री. अनिल एस. पाटील, सोलापूर |
| ०२ | मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव |
| ०३ | श्री.डी.बी. फोफसे, वैजापूर |
| ०४ | त्रीमुर्ती कन्स्ट्रक्शन, नाशिक |
| ०५ | श्री.विजय वमने, माळेवाडी, श्रीरामपूर |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा. खरेदी समितीचे दि.१२/०७/२०१७ सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त ठेकेदारांपैकी खालील चार ठेकेदार पात्र झाले आहेत.

| **अ.नं.** | **ठेकेदारांचे नांव/ गांव** |
|---|---|
| ०१ | श्री. अनिल एस. पाटील, सोलापूर |
| ०२ | मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव |
| ०३ | श्री.डी.बी. फोफसे, वैजापूर |
| ०४ | त्रीमुर्ती कन्स्ट्रक्शन, नाशिक |

उपरोक्त ०४ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई- निविदांचा वाणिज्यिक लिफाफा दि.०४/०८/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **ठेकेदारांचे नांव/ गांव** | **रक्कम** | **शेरा** |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.अनिल एस. पाटील, सोलापूर | ३६,७१,८६२.९९ | |
| ०२ | मे. आर.एल. भुतडा, कोपरगांव | ४४,७४,७७६.५४ | -- |
| ०३ | श्री.डी.बी. फोफसे, वैजापूर | **३२,५०,३४६.८८** | **निम्नतम** |
| ०४ | त्रीमुर्ती कन्स्ट्रक्शन, नाशिक | ३४,९५,०४७.६१ | |

उपरोक्त तपशिलानुसार ०४ निविदाधारकांपैकी ठेकेदार श्री.डी.बी. फोफसे, वैजापूर यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सविनय सादर.

**संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी उपस्थित होते. त्यांनी दर कमी करणेऐवजी जीएसटी कराची रक्कम वेगळी मिळणेबाबत सभेस विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासनाने जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात होणारा बदल या विषयाचे दि.१९ ऑगष्ट, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकास अनुसरुन संस्थान मालकीचे मौजे शिर्डी व कोऱ्हाळे येथील जमिनीचे भोवती कुंपन करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

०३ **श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी प्राप्त ई-निविदांचे वाणिज्यीक देकारांवर निर्णय होणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियम कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९/१०/२०१६ रोजीचे सभेत निर्णय क्रमांक७१० अन्वये खालील प्रमाणे झालेला आहे.

"...यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी विहीत पध्दीतीने ई-निविदा मागविणेस तसेच याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देणेत आली."

**प्रस्तावना-** मौजे निमगांव को-हाळे येथील संस्थानचे गट नं.८०,८५ मध्ये श्री साई प्रसादालय इमारतीचे बांधकाम करण्यात आले असून दि.०८/०१/२००९ पासून साईभक्तांना तेथे प्रसाद भोजन वाटप करणेत येत आहे. दररोज सरासरी ३५ ते ४० हजार भाविक प्रसाद भोजनचा लाभ घेतात. सदर इमारतीचा वापर सूरू होऊन

०७ वर्षापेक्षा आधिक कालावधी झालेला आहे. सततच्या वापरामुळे इमारतीचे अंतर्गत भागातील रंग ब-याच ठिकाणी खराब झालेला आहे. यामध्ये मुख्य किचन, चपाती किचन व बुंदी किचन मधील रंगकाम धुरामुळे बरेच खराब झालेले आहे. तसेच इमारतीचे बाहेरील बाजूस सिमेंट पेंन्टने रंगकाम करणेत आलेले आहे. वातावरणाच्या परीणामामुळे सदरचा रंग देखील खराब झालेला आहे. त्यामुळे प्रसादालय विभागाने इमारतीचे आतिल व बाहेरील बाजूने रंगकाम करून देणेस कळविले आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीचे उपरोक्त निर्णयानुसार याकामी वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यात होती. ठेकेदार यांना ई-निविदा अपलोड करण्याची अंतिम मूदत दि.०६/०७/२०१७ अखेर ठेवण्यात आली होती. ई-निविदा अपलोड करणेची अंतिम मूदतीत खालील ०८ ई-निविदा अपलोड झालेल्या आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | डायमंड कन्स्ट्रक्शन कंपनी, लोणी |
| ०२ | मानुप इन्फ्रास्ट्रक्चर, पुणे |
| ०३ | आर.के. सावंत, नाशिक |
| ०४ | श्री.डी.बी. फोफसे, वैजापूर |
| ०५ | श्रिको प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद |
| ०६ | विलास पाटील ॲण्ड असोशिएटस, भुसावळ |
| ०७ | बाबासाहेब आर वाघे, केलवड |
| ०८ | युनिव्हर्सल एंटरप्रायजेस, नवि मुंबई |

सदर प्राप्त ई-निविदांचे तांत्रीक निविदा मा. खरेदी समितीचे दि.१२/०७/२०१७ सभेपुढे उघडणेत आल्या असून ठेकेदार यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता तांत्रीक छाननी अहवालानुसार उपरोक्त ठेकेदारांपैकी खालील पाच ठेकेदार पात्र झाले आहेत.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव |
|---|---|
| ०१ | आर.के. सावंत, नाशिक |
| ०२ | श्री.डी.बी. फोफसे, वैजापूर |
| ०३ | श्रिको प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद |
| ०४ | विलास पाटील ॲण्ड असोशिएटस, भुसावळ |
| ०५ | युनिव्हर्सल एंटरप्रायजेस, नवि मुंबई |

उपरोक्त ०५ पात्रताधारक ठेकेदार यांनी सादर केलेला ई- निविदांचा वाणिज्यिक लिफाफा दि.०४/०८/२०१७ रोजीचे मा. खरेदी समितीचे सभेपुढे उघडणेत आले असून, त्यांनी सादर केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | ठेकेदारांचे नांव/ गांव | रक्कम | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | आर.के. सावंत, नाशिक | **६१,६९,२८३.००** | **निम्नतम** |
| ०२ | श्री.डी.बी. फोफसे, वैजापूर | ७४,७५,३१२.३५ | -- |
| ०३ | श्रिको प्रोजेक्ट प्रा.लि., हैद्राबाद | ७८,७०,५४९.७५ | -- |
| ०४ | विलास पाटील ॲण्ड असोशिएटस, भुसावळ | १,२६,४६,४३५.०९ | -- |
| ०५ | युनिव्हर्सल एंटरप्रायजेस, नवि मुंबई | ८०,८३,७८६.७० | -- |

उपरोक्त तपशिलानुसार ०५ निविदाधारकांपैकी ठेकेदार आर.के. सावंत, नाशिक यांचे दर निम्नतम आहेत. तरी याकामी निम्नतम दराचे ठेकेदार यांना कार्यादेश देणेसाठी सदरील विषय मा. व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेकामी सविनय सादर.

**श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील निम्नतम दरधारक आजचे उपसमिती सभेसमोर चर्चेसाठी अनुपस्थित होते. परंतु त्यांनी दुरध्वनीद्वारे दर कमी करणेऐवजी जीएसटी कराची रक्कम वेगळी मिळणेबाबत सभेस विनंती केली.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र शासनाने जीएसटी अंमलबजावणीनंतर शासकीय कंत्राटात होणारा बदल या विषयाचे दि.१९ ऑगष्ट, २०१७ रोजी प्रसिध्द केलेल्या परिपत्रकास अनुसरुन श्री साई प्रसादालय इमारतीचे आतील व बाहेरील भागास रंगकाम करणेकामी राबविणेत आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करणेत येऊन, याकामी नव्याने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

०४ **संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उघणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नतम दरधारक निविदाधारकांना चर्चेकामी बोलविणेबाबत.**

**अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९२६

०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०६.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६७

**प्रास्ताविक:-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशान्वये, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या १० जुलै, २०१७ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता घेणेत आलेली होती. त्यानुसार राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्राप्त झालेल्या ई-निविदांच्या तांत्रिक निविदा मा.खरेदी समितीचे दि.१९ ऑगष्ट, २०१७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत. तसेच पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा मा.खरेदी समितीच्या दि.३० ऑगष्ट, २०१७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत.

उघडणेत आलेल्या वाणिज्यीक निविदांच्या तुलनात्मक तक्त्याप्रमाणे संगणके व प्रोजेक्टरसाठी M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune यांनी देऊ केलेले दर निम्तत्तम असून, उर्वरीत सर्व साहित्यांसाठी (लॅपटॉप, युपीएस, प्रिंटर्स व नेटवर्क स्विच) M/s R D Data Systems, Nashikयांनी देऊ केलेले दर निम्नत्तम आहेत.

उपरोक्तप्रमाणे ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत वाणिज्यीक निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारक M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune व M/s R D Data Systems, Nashik यांना मा.उपसमितीचे सभेसमोर चर्चा व वाटाघाटींसाठी बोलविता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** माहिती तंत्रज्ञान विभागाअंर्गत ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत वाणिज्यीक निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारक M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune व M/s R D Data Systems, Nashik यांना मा.उपसमितीचे सभेसमोर चर्चा व वाटाघाटींसाठी बोलविणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** माहिती तंत्रज्ञान विभागाअंतर्गत ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत वाणिज्यीक निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारक M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune व M/s R D Data Systems, Nashik यांना मा.उपसमितीचे सभेसमोर चर्चा व वाटाघाटींसाठी बोलविणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागाअंतर्गत ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामीच्या उपरोक्त प्रस्तावामध्ये याकामी ई-निविदा प्रक्रियेद्वारे प्राप्त झालेल्या दरांच्या तुलनात्मक तक्त्याचा समावेश करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव फेरसादर करणेत यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

०५ **दरवर्षीप्रमाणे सन २०१८ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका विहित पध्दतीने छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Techical Bid) पात्र निविदाकार यांचे व्यावसायीक बीड (Commercial Bid) उघडले असता, निम्नतम दर देऊ केलेल्या निविदाकारांना कार्यादेश देणेबाबत.**

**अधिनियमः-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम १७ नं. ठ मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

**"श्री साईबाबांचे जीवन कार्य,त्यांच्या लिला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार-प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालविल व त्याचा विस्तार करील."**

**प्रस्ताविकः-** श्री साईबाबांच्या शिकवणूकीचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने दरवर्षी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे वतीने श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन साईभक्तांना उपलब्ध करुन दिले जातात.

**प्रस्तावः-** मा. व्यवस्थापन समिती दि.२३.०५.२०१७ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार सन २०१८ ची दैनंदिनी, दिनदर्शिका-०१ पाने व डिलक्स दिनदर्शिका ०५ प्रकारात छपाईकामी रु. ६,५०,०००,००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका तसेच श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाईकामी ई-निविदा सूचना संस्थान संकेतस्थळावर, संस्थान यादीतील सर्व प्रिंटीग प्रेस यांना ईमेलव्दारे व शासकीय दराने दै. पुण्यनगरी-ठाणे, दै. दिव्य मराठी- नाशिक, दै. सामना- मुंबई व दै. पुढारी- पुणे येथील वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात येऊन, अपलोडसाठी दि. २०.०७.२०१७ ते दि.३१.०७.२०१७ पर्यंत असा १२ दिवसांचा कार्यकाल देण्यात आलेला होता.

उक्त ई-निविदा अपलोडसाठी परत दि .०१.०८.२०१७ ते दि. ०७.०८.२०१७ अखेर ०७ दिवस जास्तीत जास्त निविदाकारांची स्पर्धा होणेकामी मुदतवाढ देण्यात आलेली होती.

मा.खरेदी समिती दि. १९.०८.२०१७ रोजीची सभेत सन- २०१८ च्या साई डायरी व कॅलेंडर्स ई-निविदेतील तांत्रिक बीड (Technical Bid) उघडून, निविदेतील अटी/ शर्तीनुसार ०८ स्पर्धक निविदाकारांच्या पूर्वपात्रतेविषयक कागदपत्रांची लेखाशाखेकडून छाननी केली असता, त्यांचा अहवाल खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| अ.नं. | निविदाकारांचे नाव | पात्र / अपात्र |
|---|---|---|
| ०१ | मे. प्रिंट प्लस प्रा.लि., मुंबई | **पात्र** |
| ०२ | मे. शिवम ऑफसेट, कोल्हापूर | **पात्र** |
| ०३ | मे. सॅप प्रिंट सोल्युशन प्रा. लि., मुंबई | **पात्र** |
| ०४ | मे.ॲडवेल इंटरनॅशल प्रा.लि., कोलकत्ता | **पात्र** |
| ०५ | मे. आरमॉस प्रा.लि., मुंबई | **अपात्र**<br>(**अपात्रतेचे कारणः-** लेखापरिक्षण अहवाल- २०१५-१६ ई- निविदेत अपलोड केलेला नाही.) |
| ०६ | मे. निट प्रिंटर्स, अहमदनगर | **पात्र** |
| ०७ | मे. वेदप्रकाश सुनिल दत्त, नवी दिल्ली | **पात्र** |
| ०८ | मे. चेरी ऑफसेट, सोलापूर | **पात्र** |

ई- निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Technical Bid) ०७ पात्र निविदाकार यांचे मा. खरेदी समिती दि. ३०.०८.२०१७ रोजीची सभेतील ई- निविदेतील व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडणेबाबतचा निविदाकारांचे दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे सादर करीत आहे.

| अं. नं. | तपशिल | छपाई संख्या | नित प्रिंटर्स, अहमदनगर | सॅप प्रिंट सोल्युशन प्रा लि., मुंबई | शिवम ऑफसेट, कोल्हापूर | ॲड-वेल इंटरनॅशनल (प्रा.) लि., कोलकत्ता | प्रिंट प्लस प्रा.लि, मुंबई | वेद प्रकाश सुनिल दत्त, नवी दिल्ली | चेरी ऑफसेट, सोलापूर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स साईज- १८ से.मी.X २५से.मी. | २,००,००० | ९२.६० | १०४.४० | ४९९.२९ | ९४.९० | **८६.००** | १३२.२० | १२४/- |
| ०२ | श्री साई दिनदर्शिका ०१ पानी मोठे (१९"X२९") इंच | ४,२५,००० | १५.२० | १८.०० | १६.७० | २२.९० | १६/- | १६.५० | **१५.१२** |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"X३५" इंच | २०,००० | ०० | ०० | ४५०.३२ | ०० | २३०/- | **२०१.६०** | ३६०/- |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट कॅलेंडर्स (७पेजेस) आकार १९.२५"X२७.२५" इंच | १०,००० | ०० | ०० | ४४९.२० | ०० | ०० | **२२४.००** | ४०२/- |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज) आकार १९"X२७" इंच | ४००० | ०० | **२३७.४०** | ४५०.२३ | ०० | ०० | ०० | ३४५/- |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"X०७" इंच | १५,००० | ०० | **१२२.३१** | ४२४.३० | ०० | ०० | १६२.४० | २५०/- |
| ०७ | श्री साईबाबा डायरी पॅकेट साईज ३" X ४.५" कव्हर मेटपेट | ५०,००० | ०० | ०० | १२.६० | ११.०९ | **१०.५०** | ०० | १३.५० |
| ०८ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"X०७" इंच कार्ड बोर्ड पेपरवर छपाई | १०,००० | ०० | **५३.५५** | ६९/- | ७५.९० | ९९.५० | ०० | २६०/- |

**मागणी:-** सन २०१८ चे दैनंदिनी व दिनदर्शिका विहित पध्दतीने छपाईकामी प्राप्त स्पर्धक निविदाकार यांचे ई-निविदेतील व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडले असल्याने निम्नत्तम दर निश्चित झालेले आहे. श्री साई समाधी शताब्दी वर्ष असल्याने लवकरात लवकर छपाई कार्यादेश निम्नत्तम दरधारकांना देणे आहे. तसेच खालील तक्त्यात दर्शविलेप्रमाणे संस्थान विक्री किंमत ठरविता येईल.

| अं.नं. | तपशिल | छापील किंमत रु. | २०% सवलतीच्या दराने देणगी मूल्य रुपये. |
|---|---|---|---|
| ०१ | श्री साई दैनंदिनी डिलक्स साईज- १८ से.मी.X २५ से.मी. | १२५/- | १००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ०२ | श्री साई दिनदर्शिका<br>०१ पानी मोठे (१९"X२९") इंच | १९/- | १५/- |
| ०३ | श्री साईबाबा डिलक्स वॉल<br>कॅलेंडर्स (८ पेजेस) आकार २२"X३५" इंच | २६२/- | २१०/- |
| ०४ | श्री साईबाबा मेटपेट<br>कॅलेंडर्स (७पेजेस) आकार १९.२५"X२७.२५" इंच | २८७/- | २३०/- |
| ०५ | श्री साईबाबा थ्रीडी वॉल कॅलेंडर्स (सिंगल पेज)<br>आकार १९"X२७" इंच | ३००/- | २४०/- |
| ०६ | श्री साईबाबा थ्रीडी डेस्क<br>कॅलेंडर्स (७ पेजेस) आकार ९.७५"X०७" इंच | १६३/- | १३०/- |
| ०७ | श्री साईबाबा डायरी<br>पॅकेट साईज ३" X ४.५" कव्हर मेटपेट पेपरवर छपाई | १९/- | १५/- |
| ०८ | श्री साईबाबा डेस्क कॅलेंडर्स (७ पेजेस)<br>आकार ९.७५"X०७" इंच कार्ड बोर्ड पेपरवर छपाई | ७५/- | ६०/- |

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी करुन शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** आर्थिक/ धोरणात्मक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट:–** दरवर्षीप्रमाणे सन २०१८ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका विहित पध्दतीने छपाई करुन भक्तांना उपलब्ध करुन देणेकामी ई- निविदेतील तांत्रिक बीडमध्ये (Technical Bid) ०७ पात्र निविदाकार यांचे व्यवसायिक बीड (Commercial Bid) उघडले असता उक्त दरपत्रकांचा तुलनात्मक तक्त्यात अधोरेखीत व गडद केलेले निम्नत्तम दर देऊ केलेल्या निविदाकारांना दैनंदिनी व दिनदर्शिका छपाईकामाचा कार्यादेश देणे व विक्री दर ठरविणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन समिती सभेत निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, दरवर्षीप्रमाणे सन २०१८ ची श्री साई दैनंदिनी/ दिनदर्शिका व श्री साईबाबा डिलक्स दिनदर्शिका छपाई करुन घेणेकामी प्रस्तावातील तुलनात्मक तक्त्यामधील गडद व अधोरेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत येऊन, संबंधीतांना छपाईचा कार्यादेश तात्काळ देण्यात यावा.**

**अ.नं.२ ची श्री साई दिनदर्शिका (०१ पानी) छपाईकामी चेरी ऑफसेट, सोलापुर यांचे प्रती नग रु.१५.१२ मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले असून, त्यांचा मागील वर्षीच्या छपाईचा पुर्वानुभव विचारात घेता, त्यांचे काम समाधानकारक नाही. मात्र ई-निविदा प्रक्रियेमध्ये त्यांचे दर निम्नतम आलेले असल्यामुळे त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशीही समिती सदस्यांची चर्चा झाली.**

**तसेच प्रस्तावातील तक्त्यामध्ये नमुद केलेले श्री साई दैनंदिनी व दिनदर्शिका- २०१८ यांची, त्यांना येणाऱ्या छपाई खर्चामध्ये साईभक्तांना विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

**परंतु सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना, अ.नं.२ ची श्री साई दिनदर्शिका (०१ पानी) छपाईकामी चेरी ऑफसेट, सोलापुर यांना छपाईचा कार्यादेश देण्यापुर्वी, त्यांना पुढील व्यवस्थापन समिती सभेसमोर चर्चेसाठी बोलविणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**०६. जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन, हाताळणी, प्रक्रिया व विल्हेवाट करणेबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद** :-1) पृ. क्र. 355, समितीच्या अधिकाऱ्यांचे अधिकार व कर्तव्ये 14(2) ख

2) पृ. क्र. 356, समितीची कर्तव्ये व अधिकार 17 (2) झ

3) पृ. क्र. 359, विश्वस्तव्यवस्था निधीचा विनीयोग 21 (1) क, (2) (ग)

**प्रस्ताविक:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी येथे पर्यावरण व वनसंरक्षण खाते मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दि. 20 जुलै 1998 रोजी जैवीक

वैद्यकिय निरुपयोगी व टाकाउ वस्तुंचे विल्हेवाटीकरीता काही नियम-अटी व कायदापालनासाठी जारी केलेल्या अधिसुचनेनुसार जैव वैद्यकिय घनकचरा निर्मीती, हाताळणी व व्यवस्थापन करणेत येत आहे.

श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये निर्माण होणारा जैव वैद्यकिय घनकचरा नियमावलीनुसार शास्त्रोक्त पद्धतीचे व्यवस्थापन हाताळणी, प्रक्रिया व विल्हेवाट लावणे गरजेचे असल्यामूळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण (म. प्र. नि.) मंडळाचीमान्यताप्राप्त संस्थेस देणे बधंनकारक आहे. त्यानुसार म. प्र. नि. मंडळाची मान्यताप्राप्त अहमदनगर जिल्हयासाठी अधिकृत एकमेवसंस्थाअसल्यामुळे मे. बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांचेकडे २००६ पासुनदोन्ही हॉस्पिटलमधुन निघणारा जैव वैद्यकिय घनकचरा पुढील प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता दररोज देणेत येत आहे. त्यामुळे हॉस्पिटलमध्ये कुठल्याही प्रकारचा जैव वैद्यकिय घनकचरा शिल्लक राहत नाही.

सदर कंपनीला संपूर्ण अहमदनगर जिल्हा हद्दीतील वैद्यकीय संस्था मधील निर्माण होणारा जैव वैद्यकीय घनकचरा वाहतूक व विल्हेवाट लावणे कामी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून २००४ पासून परवाना मिळालेला आहे. त्यानुसार संपूर्ण अहमदनगर जिल्हा हद्दीतील वैद्यकियसंस्थांनाआजपर्यंत सेवा पुरवत आहेत. श्री साईबाबा संस्थानचेदोन्ही हॉस्पिटल्स हे अहमदनगर जिल्हा हद्दीत येत असल्यामुळे जैव वैद्यकिय घनकच-याचे प्रक्रिया व विल्हेवाट लावणे करीता मे. बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांनादेणेसबंधनकारक आहेत्यानुसार मे. बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांना एसएसएस/एसएसबीएच/बीएमडब्लुएम /वशी/८७७/२०१६, दि. २७/०७/२०१६ अन्वये दि.०१/०९/२०१४ ते दि.३१/०८/२०१७ या कालावधीसाठी प्रति महिना एकुण रू. ४०,०००/- या दराने कंपनीला कार्यादेश देण्यात आला होता.

सध्या मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगरसेवा पुरवत असलेल्या काही शासकीय व मोठ्या रुग्णालयाची व त्यांचेकडुन आकारण्यात येणारे दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे-

| **अ. क्र.** | **हॉस्पिटलचे नाव व पत्ता** | **खाटांची संख्या** | **सेवा शुल्क (प्रती खाट/ प्रती दिन)** | **सध्याचे आकारण्यात येणारे एकूण मासिक शुल्क** | **सेवा शुल्काची मुदत** |
|---|---|---|---|---|---|
| १. | सिव्हील हॉस्पिटल, अहमदनगर | २५४ | रु. ४.६७ | रु. ३५५८५.०० | एप्रिल २०१५ ते एप्रिल २०१८ |
| २ | प्रवरा मेडिकल हॉस्पिटल , लोणी | ६५० | रु. ३.३८ | रु. ६६०००.०० | फेब्रु २०१५ ते फेब्रु २०१८ |
| ३ | साईबाबा हॉस्पिटल व साईनाथ हॉस्पिटल, शिर्डी | ५४७ | रु. २.४३ | रु. ४००००.०० | सप्टेंबर २०११ ते ऑगस्ट २०१४<br>सप्टेंबर २०१४ ते ऑगस्ट २०१७ |
| ४ | आनंदऋषीजी हॉस्पिटल, अहमदनगर | २०० | रु. ४.६७ | रु.२८०२०.०० | एप्रिल २०१५ ते एप्रिल २०१८ |
| ५ | नोबेल हॉस्पिटल, अहमदनगर | ११० | रु. ४.६७ | रु. १५४११.०० | एप्रिल २०१५ ते एप्रिल २०१८ |
| ६ | साखर कामगार हॉस्पिटल, श्रीरामपूर | १०० | रु. ४.८४ | रु. १४५२०.०० | जून २०१७ ते जून २०२० |
| ७ | आत्मामालिक हॉस्पिटल, कोपरगाव | १०० | रु. ४.८४ | रु. १४५२०.०० | जून २०१७ ते जून २०२० |
| ८ | शनेश्वर हॉस्पिटल, शनी शिगनापूर, | ६० | रु. ४.८४ | रु. ८७१२.०० | जून २०१७ ते जून २०२० |
| ९ | ग्रामीण रुग्णालय, कोपरगाव | ३० | रु. ४.८४ | रु. ४३५६.०० | जून २०१७ ते जून २०२० |
| १० | गोर हॉस्पिटल, राहता | २० | रु. ४.८४ | रु. २६१४.०० | जून २०१७ ते जून २०२० |
| ११ | जोशी हॉस्पिटल, शिर्डी | १८ | रु. ४.८४ | रु. २६१४.०० | जून २०१७ ते जून २०२० |
| १२ | कानडे हॉस्पिटल, राहता | १५ | रु. ४.८४ | रु. २१७८.०० | जून २०१७ ते जून २०२० |
| १३ | गोंदकर हॉस्पिटल, शिर्डी | ०९ | रु. ४.८४ | रु. १३०७.०० | जून २०१७ ते जून २०२० |

**मागणी**: वरीलतुलनात्मक तक्त्यानुसार (पुर्वीचे एकुण रू. ४०,०००/- प्रमाणे)आपल्या संस्थेच्या श्री साईनाथ रूग्णालयाची खाटांची संख्या ३०० व श्री साईबाबा हॉस्पीटलची खाटांची संख्या २४७ अशी एकूण ५४७ असुनमे. बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांना प्रक्रिया व विल्हेवाटेसाठी प्रती दिन रुपये २.४३ प्रती खाट दर येत होता.

सद्या राहता तालुक्यातील सर्व रूग्णालयातील सेवा शुल्क रुपये ४.८४ प्रती दिन प्रती खाट आहे. त्यानुसार आपले श्री साईबाबा व श्री साईनाथ रूग्णालयाची खाटांची संख्या ५४७ असुन त्याचे सेवा शुल्क रुपये ७९४२४.०० (अक्षरी– एकोणऐंशी हजार चारशे चोवीस मात्र ) प्रती महिना व अधिक स्वतंत्र वाहनाचा वाहतूक खर्च असे **एकत्रित खर्चाचे एकुण रू.८६,०००/- प्रति महिना** कोटेशन AMD/453/454, Dtd.

02/08/2017 अन्वये मे. बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांनी पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी दिले आहे. तसेच सदर कंपनीचे पत्र क्र. ५२३, दि. २३/०८/२०१७ अन्वये सदर सेवेसाठी जी. एस.टी. मध्ये सवलत असल्याचे पत्र जोडले आहे. तसेच म. प्र. नि. मंडळाची मान्यताप्राप्त अहमदनगर जिल्हयासाठी अधिकृत एकमेव संस्था मे. बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगरअसल्याचाखुलासा करणारे प्रत्र महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण (म. प्र. नि.)मंडळाकडून क्र. ६८५, दि. २९/०७/२०१७ अन्वये प्राप्त झाले असुन ते सोबत जोडले आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत-** जैव वैद्यकिय घनकचरा पुढील प्रक्रिया व कार्यवाहीकरीता सार्वजनीक रित्या जैव वैद्यकिय घनकचरा व्यवस्थापन करणाऱ्या संस्थेस देणे बंधनकारक आहे. त्यानुसार म. प्र. नि. मंडळाची मान्यताप्राप्त अहमदनगर जिल्हयासाठी अधिकृत एकमेव संस्था मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर असल्यामूळे त्यांचेकडे दोन्ही हॉस्पिटलमधुन निघणारा जैव वैद्यकिय घनकचरा पुढील प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता दररोज देणेस बंधनकारक आहे असे नम्र मत आहे.

तरी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे नियमानुसार मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांना श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रुग्णालयामधील निघणारा जैव वैद्यकिय घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता घेवुन जाणेकामी पुढील एक वर्ष कालावधीसाठी मागणी केलेल्या सर्व करांसहीत प्रति महिना रू ८६,०००/- (अक्षरी रू. शह्याऐंशी हजार मात्र) चर्चा व वाटाघाटी करुन दर निश्चित करणेस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता असावी.

**जैव वैद्यकीय घनकचरा व्यवस्थापन, हाताळणी, प्रक्रिया व विल्हेवाट करणेकामीच्या दरांवर चर्चा करणेसाठी मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांचे प्रतिनिधी आजचे उपसमिती सभेसमोर उपस्थित होते. चर्चेअंती त्यांनी याकामी प्रति महिना रु.७२,०००/- मात्र अंतीम दर देऊ केले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयामध्ये निघणारा जैव वैद्यकिय घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाटीकरीता घेवुन जाणेकामी मे.बायोक्लिन सिस्टीम्स, अहमदनगर यांचे एक वर्ष (दि.०१/०९/२०१७ ते दि.३१/०८/२०१८) कालावधीसाठी प्रति माह रु.७२,०००/- मात्र अंतीम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**०७. श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन २०१७-१८ या वर्षाकरीता खरेदी करावयाचे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीमधील पार्ट-१९ करीता पात्र कमर्शियल फेर ई-निविदा उघडून मिळणेबाबत.**

श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे सन २०१७-१८ या वार्षिक औषधे खरेदीकामी दि.२५/०२/२०१७ रोजीचे मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.५ अन्वये मिळालेली आहे.

वरील निर्णयानुसार सदरचे खरेदीकामी दि.१३/०३/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये वर्तमान पत्रात जाहिरात देऊन दि.०५/०५/२०१७ पर्यंत निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत ठेवण्यात आली होती. त्यास अनुसरुन १४८ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या असून प्राप्त निम्नत्तम दरानुसार पुरवठा धारकांना पुरवठा आदेश देण्यात आलेले असून ज्या आयटमकरीता पुरेसे दर प्राप्त झालेले नाहीत, त्याकरीता दि.१४/०७/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये फेर ई-निविदा मागविण्यास मान्यता घेऊन दि.२४/०७/२०१७ ते १०/०८/२०१७ या कालावधीत ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. परंतु ब-याच निविदाधारकांनी दुरध्वनीवरुन सदरहू ई-निविदेस मुदतवाढ मिळणेकामी विनंती केलेली आहे. त्यामुळे सदरचे खरेदीकामी जास्तीत जास्त तुलनात्मक दर मिळणेकामी जास्तीत जास्त ई-निविदा प्राप्त होण्यासाठी सदरहू ई-निविदेस दि.१०/०८/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीन्वये दि.१४/०८/२०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली असून एकुण १६१ ऑनलाईन ई-निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

उपरोक्त खरेदीकामी प्राप्त झालेल्या १६१ तांत्रिक ऑनलाईन ई-निविदा दि.१९/०८/२०१७ रोजीचे मा.खरेदी समितीचे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असून त्यातील तांत्रिक बाबी वित्त विभागामार्फत तपासून घेण्यात आलेल्या असून त्यामधील पार्ट-१९ करीता एकुण प्राप्त ०७ निविदाधारकांपैकी ०४ निविदाधारक पात्र होत आहेत, त्यामुळे उपरोक्त खरेदीमधील पार्ट-१९ करीता पात्र ०४ ऑनलाईन ई-निविदा मा.उपसमितीचे सभेपुढे संबंधित निविदाधारकांचे समक्ष उघडून घेता येतील, त्याचा तपशिल खालीलप्रमाणे-

| Sr.No. | Name of Tenderer |
|---|---|
| 01 | Cambindia Biotech Kits Pvt Ltd., Mumbai |
| 02 | N.P.Agencies, Mumbai |

| | |
|---|---|
| 03 | Poly Medicure Ltd., Mumbai |
| 04 | Transasia Bio-Medicals Ltd.,Mumbai |

उपरोक्तप्रमाणे खरेदीकामी पात्र ०४ कमर्शियल ऑनलाईन ई-निविदा आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर, उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आल्या.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयासाठी सन २०१७-१८ या वर्षाकरीता आवश्यक असलेली औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदी करणेकामी उघडणेत आलेल्या ई-निविदांमध्ये प्राप्त झालेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन तो पुढील उपसमिती सभेसमोर सादर करणेत यावा. तसेच या सभेसाठी तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारकांनाही चर्चेसाठी सभेसमोर बोलविणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**०८. श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव २०१७ निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी प्राप्त दरपत्रके उघडणेबाबत.**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०.०८.२०१७ चे सभेतील निर्णय क्र.७१२ नुसार श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७ निमंत्रण पत्रिका व इतर वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली आहे. पुण्यतिथी उत्सवासोबत शताब्दी सोहळयाचा उदघाटन समारंभ असल्याने, मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षीच्या उत्सवासाठी जादा खर्च होण्याची शक्यता आहे. ही बाब विचारात घेता, प्रस्तावातील तक्त्यामधील अ. नं. २ साठी अंदाजे रु. १० लाख व अ. नं. ५ साठी अंदाजे रु.२५ लाख मात्र वाढीव खर्चासह अंदाजे रु. ६४,६५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

सामान्य प्रशासन विभाग दि.०२.०९.२०१७ चा मंजूर प्रस्ताव श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१७ अन्वये १,८०,००० नग निमंत्रण पत्रिका छपाई करणेकामी दुरध्वनीवरुन दरपत्रके मागविणेस मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार दि.०४.०९.२०१७, रोजी शिर्डी परिसरातील नामांकित प्रेसधारकांना दुरध्वनीव्दारे फोर कलर साईज 8.75"X11.25" व 250GSM आर्ट पेपर तसेच पाकीटे छपाई साईज 6"X9.25" व 130GSM पेपर वापरुन श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव-२०१७ निमंत्रण पत्रिका १,८०,००० नग छपाई करणेकामी दि. ०५.०९.२०१७, रोजी ४.०० वाजेपर्यंत दरपत्रक सामान्य प्रशासन विभागात देणेबाबत कळविण्यात आले होते त्यानुसार दि.०५.०९.२०१७ रोजी खालीलप्रमाणे ४ सिलबंद दरपत्रके प्राप्त झाले आहे.

| अ.क्र | प्रेसधारकाचे नाव | आवक नं / दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| १. | लक्ष्मी प्रिंटर्स, कोल्हार भगवती | १२६१४/०५.०९.२०१७ | बंद लिफाफा |
| २. | लोमेश्वर प्रिंटींग प्रेस, लोणी | १२३१५/०५.०९.२०१७ | बंद लिफाफा |
| ३. | क्वॉलिटी प्रिंटर्स, संगमनेर | १२६१६/०५.०९.२०१७ | बंद लिफाफा |
| ४. | प्रवरा ऑफसेट, लोणी | १२३१७/०५.०९.२०१७ | बंद लिफाफा |

उपरोक्त प्राप्त ४ छपाईधारकांचे सिलबंद दरपत्रके आजचे स्थानिक उपसमिती सभेसमोर उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.क्र | प्रेसधारकाचे नाव | दरपत्रकामधील प्रती नग मुळ दर रु. |
|---|---|---|
| १. | लक्ष्मी प्रिंटर्स, कोल्हार भगवती | ३.५० |
| २. | लोमेश्वर प्रिंटींग प्रेस, लोणी | ३.६५ |
| ३. | क्वॉलिटी प्रिंटर्स, संगमनेर | ३.४० |
| ४. | प्रवरा ऑफसेट, लोणी | **३.२५** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, शताब्दी महोत्सवाची सुरुवात या उत्सवाने होणार असल्याने श्री साईबाबा पुण्यतिथी उत्सव- २०१७ ची उत्कृष्ठ प्रकारची निमंत्रण पत्रिका छपाई करुन घेणेकामी प्रवरा ऑफसेट, लोणी यांचे प्रती नग रु.३.२५ मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना छपाईचा कार्यादेश देणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **श्री साईबाबा समाधी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत देशात व परदेशात श्री साई पादुका दर्शन सोहळा आयोजित करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे सभेत पादुका दर्शन सोहळयाबाबत झालेले निर्णय:-**

**१) दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१७१**

*"श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते ३१ ऑक्टोबर, २०१८ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजीक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरुपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे. तसेच श्रींचे पादुका जवळपास १०० ठिकाणी दर्शनासाठी पाठविण्यात याव्यात."*

**२) दिनांक २८ एप्रिल, २०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२८०**

*"जे सर्वसामान्य साईभक्त श्रींचे दर्शनासाठी शिर्डी येथे येऊ शकत नाही, अशा साईभक्तांच्या सोयीसाठी, समाधी शताब्दी महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर श्रींच्या मुळ पादुका देश – विदेशामध्ये ठिकठिकाणी दर्शनासाठी उपलब्ध करून देण्यात याव्यात. यासाठी जी साईमंदिरे बाबांच्या पादुकांची मागणी करतील, त्यांची योग्य ती चौकशी व खातरजमा करुन, त्यांनाही चांदीच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. या पादुकांसोबत संस्थानची दक्षिणा पेटी व देणगी पावती पुस्तक ठेवण्यात यावे. मंदिर विभागाने या संबंधीची नियमावली तयार करावी व समाधी शताब्दी वर्षातील मुळ पादुका दर्शन सोहळ्याची सुरुवात आंध्रप्रदेश राज्यातील विजयवाडा येथून करणेत यावी. या ठिकाणी श्रींच्या भक्तांची संख्या जास्त प्रमाणात आहे.".*

**३) दिनांक २३.०५.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३५८**

शताब्दी वर्षाचे प्रत्येक महिन्यात पादुका दर्शन कार्यक्रम आयोजित करावा. पादुका दर्शन सोहळयासाठी सर्व सोयीयुक्त संस्थान वाहन तयार करुन घेण्यात यावे. या कार्यक्रमाचे नियोजन व खर्च त्या-त्या राज्यातील दानशूर साईभक्तामार्फत किंवा मंदिरामार्फत करण्यात यावे. तसेच देश विदेशातील पादुका दर्शनासाठी दोन पादुकांचा सेटचा वापर करण्यात यावा. तसेच महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यात पादुका दर्शन सोहळा आयोजित करण्यात यावा."

**४) दिनांक २५.०७.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ६२५**

*"श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष सन २०१७-१८ चे कालावधीत भारतात व परदेशात श्री साईपादुका दर्शन व साईभजन संध्या कार्यक्रमाचा पहिल्या ०३ (ऑक्टोबर ते डिसेंबर -२०१७) महिन्यांसाठीचे कार्यक्रम निश्चित करुन पुढील सभेसमोर सादर करणेत यावे तसेच पादुका सोहळयासाठी सर्व ठिकाणी मुळ पादुका पाठवू नयेत. मागणी करणा-या संस्थेची क्षमता पाहुनच पादुका दर्शनासाठी पाठविणेत याव्यात. सदरहु पादुका दर्शन सोहळयासाठी पाठविणेकामी महाराष्ट्रासाठी एक व महाराष्ट्राबाहेरील राज्यांसाठी एक अशी दोन वाहनांची व्यवस्था करणेत यावी."*

**५) दि. २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८७**

*"समिती सदस्य मा. श्री भाऊसाहेब वाकचौरे, मा. श्री बिपीनदादा कोल्हे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समिती गठीत करणेत येऊन, या समितीने देशभरातील विविध राज्यांमध्ये साई पादुका दर्शन सोहळा*

*आयोजित करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची ८ दिवसांमध्ये छाननी करुन अंतिम करावे. तसेच परदेशातील अर्जाची छाननी करतेवेळी समिती सदस्य मा. श्री प्रताप भोसले यांचे मागदर्शन घेण्यात यावे. पादुका दर्शन सोहळयासाठी देशातील काही ठराविक ठिकाणी श्रींच्या मुळ पादुका व परदेशात चांदीच्या पादुका पाठविण्यात याव्यात, असे ठरले.*

*माहे आक्टोबर २०१७ या महिन्यात साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाचा पादुका दर्शन सोहळयाची सुरुवात दि.१३ व १४ आक्टोबर २०१७ रोजी पणजी (गोवा) येथून करणेत यावी. त्यासाठी गोवा प्रदेश श्री साईदर्शन पादुका सोहळा समिती, पणजी यांचे मुळ पादुका दर्शन प्रस्तावास मान्यता देण्यात आली.*

*उपरोक्त छाननी समितीने अंतिम केलेल्या प्रस्तावांच्या ठिकाणी समिती सदस्य व संस्थानचे अंधिकारी यांनी उपलब्धतेनुसार प्रत्यक्ष भेटी देऊन कार्यक्रमाच्या पूर्व तयारीचा व नियोजनाचा आढावा घ्यावा. पादुका दर्शन सोहळयाचे पूर्व तयारी व पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी येणा-या अनुषंगीक सर्व खर्चास / प्रवास खर्चास (वाहन, रेल्वे, विमान) मान्यता देण्यात आली.राज्यांत, परराज्यांत, परदेशात पादुका दर्शन पादुकासाठी प्रस्तावित केल्यानुसर आवश्यकतेप्रमाणे कर्मचारी पाठविण्यात यावेत. प्रत्येक पादुका दर्शन सोहळयासाठी सोबत जावयाचे कर्मचा-यांचे विभाग, संख्या व नामनिर्देश याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेणे आवश्यक राहील. यासाठी येणा-या आवश्यक खर्चास मान्यता देण्यात आली.*

*विविध ठिकाणी आयोजित करावयाच्या पादुका दर्शन सोहळयासाठी प्रत्येक वेळी उपलब्धतेप्रमाणे सर्व विश्वस्त व किमान २ अधिकारी यांना उपस्थित राहण्यास व त्यासाठी येणा-या अनुषंगीक सर्व खर्चास / प्रवास खर्चास (वाहन, रेल्वे, विमान) मान्यता देण्यात आली. उपस्थित राहणा-या अधिका-यांचे बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नामनिर्देशित करणे आवश्यक राहील असे ठरले.*

*आवश्कतेनुसार तातडीचे प्रसंगी देशातंर्गत विमान प्रवासाने पादुका घेऊन जाणे -येणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली. याबाबत वेळोवेळी प्रसंगानुरुप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा असे ठरले व त्यासाठीच्या अनुषंगीक सर्व खर्चास मान्यता देण्यात आली. पादुका दर्शन सोहळयासाठी प्रवास व इतर ठिकाणी सुरक्षेच्या कारणास्तव हत्यारी पोलीस बंदोबस्त घेणेस व त्यासाठीच्या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली "*

**प्रस्तावना–** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. त्या अनुषंगाने प्रचार व प्रसारासाठी देश विदेशांमध्ये ठिकठिकाणी श्रींच्या पादुका दर्शन सोहळा आयोजन करण्यात येणार आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८७ ला अनुसरून प्राथमिक चर्चा करणेकामी दि.२९/०८/२०१७ रोजी शिर्डी येथील संस्थानचे लेडींबागेतील "०" नंबर सभागृह येथे मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे मा.श्री. बिपीनदादा कोल्हे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रतिनिधी मा.श्री. मनोज घोडेपाटील, उपजिल्हाधिकारी यांचे उपस्थितीत आढावा बैठक पार पडली. सदरहू बैठकीमध्ये सादर करण्यात आलेल्या पादुका दर्शन प्रस्तावांबाबत ज्या आयोजकांनी परिपूर्ण प्रस्ताव सादर केलेले आहेत अशा भारतातील आयोजकांना दि.२२/०९/२०१७ व विदेशातील आयोजकांना दि.२३/०९/२०१७ रोजी शिर्डी येथे बोलविण्यात यावे तसेच त्यावेळेस विश्वस्त मा.श्री.जयकर सो. व मा.श्री.भोसले सो. यांनाही निमंत्रीत करण्यात यावे असे ठरले.

त्यानंतर दि.०१/०९/२०१७ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी (विश्वस्त मा.श्री. वाकचौरे सो. व मा. श्री. कोल्हे सो. यांचेशी दूरध्वनीद्वारे पादुका दर्शन सोहळयाचे आयोजनाबाबत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने) नोव्हेबर-डिंसेबर-जानेवारी महिन्यातील पादुका दर्शन सोहळयाचा कार्यक्रम निश्चित करणेसाठी अनुक्रमे तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यातील मोठया शहरातील प्रस्तावधारकांना मंगळवार दि.०५/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता चर्चेसाठी बोलविण्यात यावे असे निर्देश श्री. मोहन यादव, जनसंपर्क अधिकारी व श्री राजतिलक बागवे, प्र. अधिक्षक शताब्दी कक्ष यांना देण्यात आले होते. त्यानंतर दि.०२/०९/१७ रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांनी दिलेल्या निर्देशानुसार खालील नमूद ०९ प्रस्तावधारकांना मंगळवार दि०५/०९/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता बैठकीस बोलविण्यात आले.

| अ.नं. | राज्य | शहर / गांव | मंदिर/ट्रस्ट/साईभक्तांचे नांव | दुरध्वनीवरुन संपर्क करण्यात आलेल्या व्यक्तिचे नांव |
|---|---|---|---|---|
| १. | तामिळनाडू | कोईमतूर | शिर्डी साईबाबा डिव्होटिज | श्रीमती निरुपा श्रीराम |
| २. | | कोईमतूर | श्री नागासाई ट्रस्ट, श्री नागासाई मंदिर | श्री. एस. बालासुब्रमण्यम |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | | चैन्नई | ऑल इंडिया साई समाज (मैलापूर) | श्री. आनंद साई |
| ४. | पॉन्डेचरी | पॉन्डेचरी | इंटरनॅशनल शिर्डी साईबाबा डिव्होटिज ट्रस्ट | श्री. डी.मनीकंदन |
| ५. | मध्य प्रदेश | भोपाल | शिर्डी साईधाम धमार्थ संस्था | श्री. शांडील्य बाबा |
| ६. | | इन्दौर | श्री इंन्दौर शहर साईभक्त सेवा समिती | श्री. अभिनव छोटू शुक्ला |
| ७. | गुजरात | अहमदाबाद | श्री शिर्डी साईबाबा समाज सेवा संस्थान | श्री. गिरीष व श्री बालाकृष्ण |
| ८. | | सुरत | साई विश्व समस्त साईभक्त मंडळ | श्री. हिमांशू पाठक |
| ९. | | सुरत | श्री साई गणेश सेवा ट्रस्ट | श्री. अतुल साळी (अनुपस्थित) |

दि.०५/०९/२०१७ चे बैठकीसाठी विश्वस्त मा. श्री. भाऊसोहब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महोदया मा. उपकार्यकारी अधिकारी व जनसंपर्क अधिकारी उपस्थित होते. तसेच उपरोक्त तक्त्यातील नमूद केलेल्या प्रस्तावधारकांपैकी सुरत येथील श्री साई गणेश मंडळाचे पदाधिकारी/सदस्य अनुपस्थित होते.

**प्रस्ताव-** मा. व्यवस्थापन समितीचे दि. २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार देश-विदेशात साई पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करणेसाठी समिती सदस्य मा. श्री. भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री. बिपीनदादा कोल्हे व मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्व उपस्थित आयोजकांशी समितीने विविध विषयावर सविस्तर चर्चा केली. चर्चेअंती खालील प्रस्तावांची शिफारस मा. व्यवस्थापन समितीकडे करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

| **अ.नं.** | **राज्य** | **शहर** | **महिना** | **प्रस्तावित दिनांक** | **आयोजकांचे/प्रतिनिधीचे नांव** |
|---|---|---|---|---|---|
| **०१.** | **तामिळनाडू** | चैन्नई, मैलापूर | नोव्हेंबर-२०१७ | दि.०८ व ०९ नोव्हेंबर | ऑल इंडीया साई समाज, मैलापूर (श्री. आनंद साई) |
| **०२.** | | पॉडेचेरी | | दि.१० नोव्हेंबर | श्री इंटरनॅशनल साईबाबा डिव्होटीज ट्रस्ट, पॉडेचेरी (श्री. मनीकंदन) |
| **०३.** | | कोईमबतुर | | दि.११ व १२ नोव्हेंबर | श्री नागासाई ट्रस्ट,कोईमबतुर (श्री. एस. बालासुब्रमण्यम) |
| **०४.** | **मध्यप्रदेश** | भोपाळ | डिसेंबर-२०१७ | दि.१७ व १८ डिसेंबर | शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाल (श्री.बाबा शांडील्य) |
| **०५.** | **गुजरात** | सुरत | जानेवारी२०१८ | दि.०४ ते ०६ जानेवारी | साई विश्वा समस्त साईभक्त मंडळ, सुरत (श्री. हिमांशू पाठक, सुरत) |
| **०६.** | | अहमदाबाद | जानेवारी-२०१८ | दि.०७ व ०८ जानेवारी | शिर्डी साईबाबा समाज सेवा संस्थान, अहमदाबाद (श्री. गिरीषभाई पटेल व श्री. बालाकृष्णा पटेल) |

तरी छाननी समिती यांचेमार्फत शिफारस करण्यात आलेल्या आयोजकांमार्फत वर नमूद तामिळनाडू, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यात माहे-नोव्हेबर, डिंसेबर-२०१७ व जानेवारी-२०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजन होणेसाठी सदरहू प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७६९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी वर्षाचे निमित्ताने प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे, तामिळनाडू, पॉण्डेचेरी, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यात माहे-नोव्हेबर, डिंसेबर-२०१७, व जानेवारी-फेब्रुवारी- २०१८ या महिन्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेस मान्यता देण्यात आली. याकामी प्रस्तावित केलेली ठिकाणे व आजचे सभेमध्ये प्राप्त झालेल्या अर्जांवरही खालीलप्रमाणे चर्चा होऊन, वेळापत्रक तयार करणेत आले.**

| **अ.नं.** | **राज्य** | **शहर** | **प्रस्तावित दिनांक** | **आयोजकांचे/प्रतिनिधीचे नांव** | **आजचे सभेत झालेली चर्चा** |
|---|---|---|---|---|---|
| **०१.** | **तामिळनाडू** | चैन्नई, मैलापूर | दि.०८ व ०९ नोव्हेंबर | ऑल इंडीया साई समाज, मैलापूर (श्री.आनंद साई) | मंजुर |
| **०२.** | | पॉडेचेरी | दि.१० व ११ नोव्हेंबर | श्री इंटरनॅशनल साईबाबा डिव्होटीज ट्रस्ट, पॉडेचेरी (श्री. मनीकंदन) | प्रस्तावित आयोजक ट्रस्टचे साईबाबांचे मंदिर नसल्याने देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही. रमणी यांनी सुचविलेप्रमाणे कमलासाई शिर्डीसाई सेवा समिती, |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | पॉण्डेचेरी यांना पादुका दर्शन सोहळयासाठी श्रींच्या पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात. तसेच पॉण्डेचेरी येथे जाते वेळेस दानशुर साईभक्त श्री.के.व्ही. रमणी यांचेकडे दोन तास दर्शनासाठी पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात |
| **०३.** | | कोईमबतुर | दि.१२ व १३ नोव्हेंबर | श्री नागासाई ट्रस्ट,कोईमबतुर (श्री. एस. बालासुब्रमण्यम) | मंजुर |
| **०४.** | | **चेन्नई** | दि.१४ नोव्हेंबर | शिर्डी साईबाबा डिव्हॉटीज ट्रस्ट, चैन्नई | चेन्नई येथील साईभक्त प्रिती साई हे समाधी शताब्दी पार्श्वभूमीवर त्यांच्या देणगीतून लेंडीबागेतील धबधब्याचे नुतणीकरण करुन देणार आहेत, त्यांची देणगी स्विकारणेत यावी व श्रींच्या पादुका पॉण्डेचेरीवरुन परत येताना चेन्नई येथे प्रिती साई यांचेकडे एक दिवसासाठी दर्शनासाठी उपलब्ध करुन द्याव्यात. |
| **०५.** | **मध्यप्रदेश** | भोपाळ | दि.१७ व १८ डिसेंबर | शिर्डी साईधाम धमार्थ संस्था, भोपाल (श्री.बाबा शांडील्य) | मंजुर |
| **०६.** | **गुजरात** | सुरत | दि.०४ ते ०६ जानेवारी | साई विश्वा समस्त साईभक्त मंडळ, सुरत (श्री. हिमांशू पाठक, सुरत) | मंजुर |
| **०७.** | | अहमदाबाद | दि.०७ व ०८ जानेवारी | शिर्डी साईबाबा समाज सेवा संस्थान, अहमदाबाद (श्री. गिरीषभाई पटेल व श्री. बालाकृष्णा पटेल) | मंजुर |
| **०८.** | **महाराष्ट्र** | विदर्भ | दि.२५ जानेवारी ते दि.१० फेब्रुवारी, २०१८ | श्री सद्गुरु साई चॅरिटेबल ट्रस्ट, नागपुर | सदरहू ट्रस्टचे प्रतिनिधी श्री.पंकज महाजन यांनी सभेसमोर त्यांचा पादुका दर्शन सोहळयाविषयीचा प्रस्ताव सादर केला. त्यांनी माहिती दिली की, विदर्भामधील सर्व जिल्यांमध्ये पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेची जबाबदारी स्विकारणेस ते तयार आहेत. यास सभेने मान्यता दिली व त्यांना श्रींच्या पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात, असे ठरले. |

**तसेच आजचे सभेत कनकवली, कराड व दिल्ली येथील साईभक्त उपस्थित होते. त्यांनीही त्यांचेकडे पादुका दर्शन सोहळा आयोजित करणेसाठी श्रींच्या पादुका मिळणेची विनंती केली.**

**यावर विस्तृत चर्चा होऊन, दि.१२.१०.२०१७ ते दि.१४.१०.२०१७ या कालावधीमध्ये साई सेवा ट्रस्ट, पणजी, गोवा यांचेकडे पादुका दर्शन सोहळयासाठी, श्रींच्या पादुका उपलब्ध करुन देण्याचे ठरलेले आहे. या पादुका शिर्डीकडे परत येतेवेळी दि.१५.१०.२०१७ रोजी श्रध्दा पदयात्रिक मित्र मंडळ, कनकवली यांना व दि.१६.१०.२०१७ रोजी श्री साईबाबा पालखी सोहळा समिती, कराड यांना श्रींच्या पादुका दर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात याव्यात. त्याचप्रमाणे साईपालहार ट्रस्ट, खन्ना मार्केट, लोधी रोड, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी श्री.दिपक बांगा हे साईभक्तही सभेत उपस्थित होते, त्यांनी दि.२८.१०.२०१७ रोजी पादुका दर्शन सोहळयासाठी, श्रींच्या पादुका मिळणेची विनंती केली. त्याची विनंती मान्य करण्यात येऊन, त्यांना पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात.**

**यावेळी मा.अध्यक्ष महोदय यांनी अशी माहिती दिली की, अमेरीकेतील साईमंदिरांनीही श्रींच्या पादुकांची, दि.०९ नोव्हेंबर- २०१७ ते दि.२७ नोव्हेंबर, २०१७ अखेर, पादुका दर्शन सोहळयासाठी मागणी केलेली आहे, त्यांना पादुका उपलब्ध करुन देण्यात याव्यात. या पादुका दर्शन सोहळयासाठी मा.अध्यक्ष महोदय उपस्थित राहणार आहेत, समिती सदस्यांपैकी व संस्थानचे अधिकारी संवर्गातील कोणास उपस्थित रहावयाचे असल्यास, त्यांची जाणे-येणेची व्यवस्था संस्थानमार्फत करण्यात यावी. त्याचप्रमाणे आय लव्ह साई या संस्थेने यु.के. व कॅनडा या देशांमध्ये पादुका दर्शन सोहळयासाठी, श्रींच्या पादुकांची मागणी केलेली आहे. त्यांचेकडून पादुका दर्शन सोहळयासाठीच्या तारखांचा प्रस्ताव मागवून सभेसमोर सादर करावा, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३** **श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत "सबका मालिक एक है" या महानाट्याचे आयोजन करणे.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

४. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ड)श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठरावः-**

१) श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रूपरेषा व स्वरूप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतिक साई मंदिर विश्वस्त/पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय होणेकामी धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रक मा. व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करणेत आले होते. त्यात सप्टेंबर-२०१७ व ऑक्टोबर-२०१८ मध्ये या नाटयप्रयोगाचा समावेश करण्यात आलेला आहे. सदरहू प्रस्तावावर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"..समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमांची रूपरेषा ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.."*

२) श्री साईबाबांच्या जीवनावर आधरीत 'सबका मालिक एक है' या महानाट्याचे संस्थानने आयोजन करणेबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीच्या दि.२०/०८/२०१७ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला होता. यावर निर्णय क्र.६९४ खालीलप्रमाणे संमत झाला आहे.

"श्री साईबाबांच्या जीवनावर आधारित 'सबका मालिक एक है' या महानाट्याचे समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजन करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या नाटयप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्ट स्थानिक उपसमिती सभेकडून तपासून घ्यावी, असे ठरले."

**प्रस्तावना:-** श्री.प्रशांत डांगे, कार्यकारी निर्माता, साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे दि.२८/११/२०१६ व दि.२२/०७/२०१७ चे पत्रानुसार साई चरित्रावर आधारीत 'सबका मालिक एक है'या प्रकाश (Light) आणि ध्वनी (Sound) हिंदी महानाट्याचेश्रीसाईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजन

करण्यासाठीचा प्रस्ताव दि.२०/०८/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर निर्णय क्र.६९४ अन्वये रक्कम रु.९ लाख मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली आहे. तसेच या नाट्यप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्ट स्थानिक उपसमिती सभेकडून तपासुन घ्यावी, असे ठरले आहे.

श्री.सोमेश्वर बालपांडे यांनी दि२६/०८/२०१७ रोजी शिर्डी येथे भेट देऊन कार्यक्रमासाठी साईनगर मैदान व श्री साई प्रसादालयामागील शेती महामंडळाच्या जागेची पाहणी केली. साईनगर मैदान येथे सदर कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे झाल्यास १५००० ते २०००० पर्यंत प्रेक्षक या कार्यक्रमाचा आनंद घेऊ शकतील. परंतु त्यापेक्षा जास्त प्रेक्षक संख्येसाठी शेती महामंडळाच्या जागेवर सदर कार्यक्रम घेऊन LED BOARD ची व्यवस्था करावी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले.

आता दि.०२/०९/२०१७ रोजीचे ई-मेलद्वारेश्री. सोमेश्वर बालपांडे यांनी" सदर महानाट्य शिर्डी येथे दि.०१/१०/२०१७ रोजी सादर करण्यास आम्ही तयार आहोत. नैसर्गिक कारणामुळे प्रयोग रद्द करावा लागल्यास दि.०२/१०/२०१७ किंवा दि.०३/१०/२०१७ रोजी हा प्रयोग सादर करण्यात येईल व त्याचे कुठलेही अतिरिक्त शुल्क आपणाकडुन घेण्यात येणार नाही. तरी महानाट्याच्या यशस्वितेकरीता (Travelling, Transporting इत्यादी) रु.३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख मात्र) ॲडव्हान्स पाठविण्याची कृपा करावी " असे कळविले आहे.

**प्रस्तावः-** साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे "सबका मालिक एक है" हे हिंदी महानाट्य श्री साईबाबांचे जीवनावर आधारित असल्याने श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार व प्रसार होणार आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६९४ अन्वये श्रीसाईबाबांच्या जीवनावर आधारित सबका मालिक एक है या महानाटयाचे समाधी शताब्दीच्या पार्श्वभूमीवर दि.०१ ऑक्टोबर, २०१७ रोजी आयोजन करणेस व त्याकामी येणाऱ्या रु.९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच या नाटयप्रयोगातील प्रसंग व संवाद याचे स्क्रिप्ट स्थानिक उपसमिती सभेकडून तपासुन घ्यावी, असे ठरलेले आहे.

श्री. सोमेश्वर जगन्नाथ बालपांडे यांचे दि.०२/१०/२०१७ चे ई-मेलद्वारे महानाट्याच्या यशस्वितेकरीता (Travelling, Transporting इत्यादी बांबीसाठी) रु.३,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये तीन लाख मात्र) ॲडव्हान्स मिळणेबाबत तसेच त्यांनी रंगभूमि प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे कायमस्वरुपी योग्यता प्रमाणपत्र पाठविले आहे.

श्री.बालपांडे यांनी विनंती केल्याप्रमाणे त्यांना ॲडव्हान्स (अग्रीम) द्यावयाचा झाल्यास, काही अपरिहार्य कारणामुळे कार्यक्रम पुढे ढकलला गेला तर पुढील तारखेच्या वेळी स्वतंत्र प्रवास खर्च दिला जाणार नाही तसेच कार्यक्रम रद्द झाल्यास ॲडव्हान्स (अग्रीम) पुर्णपणे परत करावा लागेल, असे संस्थेला कळविता येईल.

तरी याकामी खालील बाबींवर निर्णय होणे गरजेचे आहे.

१) साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांचे 'सबका मालिक एक है' हे हिंदी महानाट्याच्या प्रयोगासाठी (Travelling, Transporting इत्यादी बाबीसाठी) रुक्कम रुपये ३ लाख ॲडव्हान्स देणेबाबत

२) महानाट्यासाठी जागेची निश्चिती करणेबाबात.

३) महानाट्याच्या आयोजनासाठी संस्थानमार्फत खालील बाबींसाठी आवश्यक त्या खर्चास मान्यता देणेबाबत.

1. Ground/ Stadium. (6 day before show)
2. Audience sitting arrangement & Bari gating.
3. Green Room's 15 ft X 30 ft - 6 Nos. (with Carpet, Chairs, Fan's, Heliozoan's & Mirror's)
4. Ground Light's (Sufficient Light for Audience)
5. Mobile urinal's 2 Nos. (on back side of Green Room's for Artist)
6. Generator's (with Diesel)
   a) 125 KVA for Light's (Before 1 day's of show & show day)
   b) 125 KVA for Sound (Before 1 day's of show & show day)
   c) 10 KVA for service light (Before 6 day's of show & 2day's after show)
7. Residence for Artist & Back stage worker's
   a) Back stage worker's (Before 6 day's of show & 2day's after show)
   b) 30 Production Team Person's (2 day's before show & 1day's after show)

c) 110 Artist (2 days before show & 1day's after show)

8. Food for Artist & Back stage person's (2 time Nashta, 1 time Lunch, 1 time Dinner & 4 time Tea)
9. Permissions for performance.
10. Security Arrangements
11. Advertisement
12. Printing Material (Hoardings/ Banners/ Tickets etc.)

निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जीवनावर आधारीत "सबका मालिक एक है" या महानाट्याचे आयोजन करणेकामी संस्थानमार्फत प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. परंतु या महानाट्याच्या प्रयोगासाठी साई क्रिएटिव्ह व्हीजन, नागपूर यांना रु.३,००,०००/- मात्र अग्रीम रक्कम देता येणार नाही, याबाबत संबंधीतांना कळविण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **शताब्दी कालावधीत विद्यावाचस्पती श्री शंकरजी अभ्यंकर यांचे प्रवचन व त्यांचे मानधनाबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :**

(१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

(२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(३) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १(ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(४) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ड) श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २०/०८/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ६८२ :**

श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षभर आयोजित करण्यात येणा-या विविध प्रस्तावित, धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमाची सुधारीत रुपरेषा ठरविण्यात आली.

तसेच शताब्दी महोत्सवामध्ये आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमसाठीचे कलाकार व त्यांचे मानधन यांचे परिशिष्ठ ब, क ड व ई सोबत सादर केलेले आहे. या यादीतील कार्यक्रम, कलाकार, व त्यांचे मानधन स्थानिक उप-समितीने छाननीकरुन कार्यक्रम निश्चित करावेत. त्यामधील विनामुल्य सेवा करणा-या कलाकारांना प्राधान्य देण्यात येऊन, वर्षभर संधी देण्यात यावी. कार्यक्रमाची निश्चिती झाल्यानंतर त्यामध्ये गरजेनुसार/ परिस्थितीनुसार आवश्यक ते बदल करण्याचे अधिकार व्यवस्थापन समितीला राहतील, असे ठरले.

या निश्चित केलेल्या सर्व प्रकारच्या कार्यक्रमांसाठी,अपवाद वगळता मानधन व प्रवास असे सर्व मिळून प्रत्येकी एका कार्यक्रमासाठी जास्तीत जास्त रुपये ३ लाख मात्रचे खर्चास तसेच शताब्दी वर्षात आयोजित केलेल्या कार्यक्रमांसाठी स्टेज, मंडप, साऊंड सिस्टीम, विदयुत रोषणाई, सीसीटिव्ही, सुरक्षा व्यवस्था व आवश्यक जादाचे मनुष्यबळ यावर होणरा खर्च व इतर अनुषंगीक खर्चासही मान्यता देण्यात आली.

**प्रस्तावना:** श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत "श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवानिमित्ताने दि. ०१ ऑक्टोबर,

२०१७ ते दि. ३१ ऑक्टोबर, २०१७ अखेर ३८६ दिवस दररोज साईभक्तांसाठी धार्मिक, सामाजिक, साईबाबांची शिकवण, सेवाभाव दर्शविणा-या भव्य स्वरूपाच्या कार्यक्रमांचे आयोजन करणेत यावे", असे ठरले होते.

त्यानुसार जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम-शताब्दी कक्ष/१९९३/२०१७ दि.१३/०७/२०१७ अन्वये विद्या वाचस्पती श्री शंकरजी अभ्यंकर, पुणे यांना शताब्दी कालावधीत प्रवचन कार्यक्रमांचे आयोजनबाबत पत्र देण्यात आले होते.

यास अनुसरुन त्यांनी दिनांक ३१/०८/२०१७ रोजीचे ई-मेल पत्राव्दारे दिनांक १ ते ३ फेब्रुवारी, २०१७ या तीन दिवसाचे कार्यक्रमासाठी सहमती दर्शविली असून, त्यांचे पत्रात त्यांनी सुनियोजनासाठी खालीलप्रमाणे बाबीं नमूद केल्या आहेत.

(१) संत विदयापीठाचा प्रकल्प १०० कोटीचा आहे. प्रकल्प उभा रहातो आहे तो केवळ प्रतिष्ठानच्या प्रवचनांच्या माध्यमातून. त्यामुळे या प्रकल्पाचा आपल्या वतीने २ लक्ष रुपयांची देणगी दयावी. श्री अभ्यंकर व्यक्तिगत मानधन वा बिदागी घेत नाहीत. प्रतिष्ठानच्या वतीने रीतसर पावती दिली जाईल.

(२) आपल्या संस्थेच्या वतीने सर्व प्रमुख वृत्तपत्रांमध्ये जाहिरात यावी. कारण हे प्रवचन व सदविचार जास्तीत जास्त श्रोत्यांपर्यत पोहोचावेत.

(३) आम्ही स्वतंत्र गाडीने शिर्डीला येऊ.

(४) निवास व्यवस्था उत्तम हॉटेलमध्ये करावी.

(५) महत्वाच्या ठिकाणी बोर्ड व फलक लावावेत.

(६) प्रवचनांनंतर गरम व ताजे दुध गुरुदेव घेतात. त्यात साखर वा इतर कोणताही मसाला नसावा.

(७) प्रतिष्ठानच्या ग्रंथ व सीडींचा कक्ष लावला जाईल. आमच्याबरोबर प्रतिष्ठानचे ४ कार्यकर्ते असतील. ते कक्ष सांभळतील. त्यांच्या प्रवास-निवासाची व्यवस्था आपण करावी. तसेच कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रतिष्ठानच्या कार्याविषयी निवेदन केले जाईल.

(८) ध्वनियंत्रण व्यावसायिक दर्जाची व उत्तम असावी.

(९) व्हिडिओ शूटिंग करावयाचे असल्यास पूर्वपरवानगी घ्यावी लागेल.

**प्रवचनासाठी आवश्यक तयारी - व्यासपीठ साहित्य :**

(१) उंचावर व्यासपीठ, त्यावर उत्तम व स्वच्छ वस्त्र, मागे लोड

(२) प्रतिमेसाठी स्टॅण्ड

(३) विषयानुरुप प्रतिमा व फोटो

(४) प्रतिमेला एक ताजा व उत्तम हार

(५) प्रवचनकारांना एक ताजा उत्तम व हलका हार, हार ओला नसावा.

(६) समई, तेल, वात, काडेपेटी, मेणबत्ती, आरतीचे साहित्य

(७) स्टेज सजावट

(८) बिसलेरी पाण्याची बाटली, थर्मास व भांडे

(९) छोटे व्यासपीठ, ज्यावर ग्रंथ ठेवला जातो.

(१०) व्यासपीठावर अधिष्ठान म्हणून ठेवावयाचा ग्रंथ

(११) प्रवचनकारांच्या मागील बाजूस उभा टेबल फॅन

(१२) स्पीकर्स चार (मोठे)

**विशेष सूचना**

(१) व्यासपीठ वरुन, मागून झाकलेले असावे तसेच व्यासपीठ दक्षिणाभिमुख नसावे.

(२) व्यासपीठासमोर माती नसावी. प्रवचनकारांना धुळीचा त्रास होतो. कृपया कारपेट घालावे.

(३) रस्त्याला लागून व्यासपीठ असेल तर त्या रत्यावरील रहदारी पूर्ण थांबविण्यात यावी.

(४) मैदानातही रहदारीचा त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

उपरोक्त नमूद केलेप्रमाणे प्रवचनाचे सुनियोजनासाठी त्यांनी उपरोक्त बाबींचा उल्लेख केला आहे. तसेच पत्रामध्ये त्यांनी त्यांचे प्रस्तावित संत विदयापीठाकरीता रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख) मात्रची रक्कम देणगी स्वरुपात मिळणेसाठीचा उल्लेख केलेला असून, कार्यक्रमाचे वेळी त्यांचे निवासाकरीता उत्तम हॉटेलची व्यवस्था करणे, त्यांचे समवेत आलेल्या ४ कार्यकर्ते यांना पुणे ते शिर्डी जाणे-येणेकरीता प्रवासभाडे व त्यांचे निवासाची व्यवस्था करणेबाबत कळविणेत आलेले आहे.

मात्र त्यांनी दिनांक ०७/०९/२०१७ रोजी पाठविलेल्या ई-मेल पत्राव्दारे, होणा-या प्रवचनासाठी व्यक्तिगत मानधन घेण्यास गुरुदेव अभ्यंकराची समंती असल्याचे कळविले आहे. त्यानुसार प्रवचनासाठी त्यांचे संत विदयापीठाकरीता रुपये २,००,०००/- मात्रची देणगी स्वरुपात न देता विदयावाचस्पति शंकर वासुदेव अभ्यंकर यांचे नावे मानधन स्वरुपात देता येईल.

तरी शताब्दी कालावधीत प्रवचन कार्यक्रमांचे आयोजन करणेकरीता विदया वाचस्पती श्री शंकरजी अभ्यंकर, पुणे यांना मानधन रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लाख) मात्र देणेबाबत तसेच त्यांनी संमतीदाखल पाठविलेल्या पत्रातील बाबींसाठी होणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे समाधी शताब्दी कालावधीत विद्यावाचस्पती श्री.शंकरजी अभ्यंकर यांना रु.२,००,०००/- मात्र मानधन देण्यात येऊन, त्यांचे प्रवचनाचा कार्यक्रम आयोजित करणेस व त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **साई पादुका दर्शन सोहळयाकरीता भारत बेंज कंपनीची एक ए.सी. प्रवासी बस खरेदीकामी देण्यात आलेल्या पुरवठा आदेश व अग्रिम रकमेस कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील:-**

१) कलम १७ (१) मध्ये राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून, संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्यती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यकत त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२) कलम २१ (१) मध्ये, विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम, १९६१ च्या तरतुदींना अधिन राहून, समितीकडून पुढील पैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल,--

(ख) - रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

(ग) - भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

(ड) - श्रीसाईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे.

**प्रस्तावना:-** श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीत शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयीसुविधा उभारणे तसेच संपुर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचे आयोजन करणेत येणार आहे.

मा.व्यवस्थापन समितीचेदि.२५/०७/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयानुसार,साई पादुका दर्शन सोहळयाकरीता महाराष्ट्रातील पुर्ण जिल्ह्यामध्ये पादुका दर्शनासाठी घेऊन जाणेसाठी एक व बाहेरील राज्याकरीता एक अशा ०२ अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेसाठी टाटा, अशोक लेलंण्ड व भारतबेंज या तीन कंपन्यांच्या बसेसबाबत तपशीलवार चर्चा करणेत येऊन, त्यामधील भारतबेंज या कंपनीची (917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB)बस खरेदी करणेचे निश्चित करणेत आले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे भारतबेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB या मॉडेलच्या ०२ अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेकामी भारतबेंज कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून विहीत पध्दतीने दरपत्रके मागविणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली, असे ठरले.

यानुसार जा.नं.एसएसएस-वाहन-२६०७-२०१७ दिनांक १०/०८/२०१७ चे पत्रान्वये भारत बेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPBया मॉडेलच्या दोन ए.सी.प्रवासी बसेस खरेदी करणेकामी भारत बेंज कंपनीचे अधिकृत डिलरकडून दरपत्रके दिनांक २३/०८/२०१७ अखेर मागविण्यात

आली होती. दिनांक २३/०८/२०१७ अखेर पुरेशी दरपत्रके प्राप्त न झालेने दिनांक २३/०८/२०१७ चे मंजूर टिपणी व जा.नं.एसएसएस-वाहन-२६०७/२०१७ दिनांक २३/०८/२०१७ चे पत्रान्वये दि.२८/०८/२०१७ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. तसेच अधिक स्पर्धात्मक दर प्राप्त होणेसाठी दोन्ही दर मागणीपत्र संस्थानचे अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच इंटरनेट व्दारे प्राप्त सुमारे १४ पुरवठादारांना मेलव्दारे दरमागणी पत्र पाठविण्यात आलेली होती.

यानुसार भारतबेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB या मॉडेलच्या अत्याधुनिक ए.सी. बस खरेदी करणेकामीदि.२८/०८/२०१७ अखेर प्राप्त झालेली ०४ दरपत्रके दि.३०/०८/२०१७ रोजी मा. खरेदी समितीचे सभेत उघडणेत आली असुन त्यांनी दरपत्रकात देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशिल | घाडगे ट्रकींग KGP ॲटो लि., नाशिक | घाडगे ट्रकींग KGP ॲटो लि., ताथवडे (पुणे) | वासन ट्रकींग वासन ट्रकींग प्रा.लि. चेंबुर मुंबई | घाडगे ट्रकींग KGP ॲटो लि., कोल्हापुर |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रति नग | प्रति नग | प्रति नग | प्रति नग |
| 1 | 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPB | 21,66,985.00 | 21,66,985.00 | 21,66,985.00 | 21,66,985.00 |
| 2 | SGST/UTGST | 3,03,377.90 | 3,03,377.90 | 3,03,378.00 | 3,03,377.90 |
| 3 | CGST | 3,03,377.90 | 3,03,377.90 | 3,03,378.00 | 3,03,377.90 |
| 4 | TCS @ 1 % | 27,737.41 | 27,737.41 | 27,737.00 | 27,737.41 |
| 5 | Total (1 to 4) | **28,01,478.21** | **28,01,478.21** | **28,01,478.00** | **28,01,478.21** |
| 6 | Insurance | 71,158.00 | 71,158.00 | -- | 71,158.00 |
| 7 | Grand Total (5+6) | 28,72,636.21 | 28,72,636.21 | | 28,72,636.21 |

वरील दरपत्रकातील दरांचा विचारकरता, सर्व अधिकृत विक्रेत्यांनी भारत बेंज कंपनीचे ए.सी. बस करीता समान दर दिलेले आहेत. शिर्डी विभागाकरीता भारत बेंजचे अधिकृत डिलर घाडगे ट्रकींग, KGP ॲटो लि., ताथवडे (पुणे) हे आहेत.

दि.३०/०८/२०१७ रोजी सकाळी १०.२८ वा. श्री विक्रांत महाजन, रिजनल मॅनेजर, मुंबई यांचा मेल संस्थानला प्राप्त झालेला असुन यात दि.०१/०९/२०१७ पासुन उपरोक्त दर ६% वाढणार तसेच उद्या संध्याकाळ पर्यंत पुरवठा आदेश दिल्यास अधिकृत डिलर उपरोक्त दरात बस देतील असेही नमुद केलेले आहे.

वाहनाची मुळ किंमतीत ६% म्हणजे साधारंत: रु.१,६८,०००/- ची वाढ होणार असलेने एका बसचा पुरवठा आदेश तातडीने दिल्यास सदर रक्कमेची बचत होणार आहे. त्यामुळे सदरच्या खरेदी समितीचे सभेत एक बसचा पुरवठा आदेश देण्यात यावा असे ठरले. तसेच भारत बेंज कंपनीचे सोनम सिंग यांनी दि.३०/०८/२०१७ रोजी १३.४४ वा. याकामी रु.५०,०००/- बुकींग रक्कम पाठविण्याचे बाबत ईमेल द्वारे कळविलेले होते.

त्यानुसार घाडगे ट्रकींग, KGP ॲटो लि., ताथवडे (पुणे)यांना इकडील जा.नं.एसएसएस/ वाहन/ २९०५/ २०१७ दि.३०/०८/२०१७ रोजीचे पत्राने भारत बेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPBया मॉडेलची एक ए.सी.प्रवासी बसेस खरेदी करणेकामी प्रथम वर्ष विमा रक्कमेसह एकुण रक्कम रु.२८,७२,६३६/- (अक्षरी रक्कम रु.अठ्ठाविस लाख बहात्तर हजार सहाशे छत्तीस मात्र) पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे. या सोबत भारतीय स्टेट बँक ऑफ इंडीया, शाखा शिर्डीचा चेक नं.६१५४६२ दि.३१/०८/२०१७ नुसार बुकींग रक्कम (ॲडव्हान्स) रु.५०,०००/- मात्र आदा करण्यात आलेली आहे.

**मागणी:-** तरी साई पादुका दर्शन सोहळ्या करीता भारत बेंज कंपनीच्या 917 Tourist A.C. Bus BS-IV, Mod.-35+1+1 SPBया मॉडेलची एक ए.सी.प्रवासी बसेस खरेदी करणेकामी घाडगे ट्रकींग,KGP ॲटो लि., ताथवडे (पुणे)यांना देण्यात आलेल्या एकुण रक्कम रु.२८,७२,६३६/- (अक्षरी रक्कम रु.अठ्ठाविस लाख बहात्तर हजार सहाशे छत्तीस मात्र) चे पुरवठा आदेशास व अग्रिम रक्कम रु.५०,०००/- मात्र देणेस कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७७२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साई पादुका दर्शन सोहळयाकरीता भारत बेंज कंपनीची एक ए.सी. प्रवासी बसची चेसी खरेदी करणेकामी देण्यात आलेल्या पुरवठा आदेश व अग्रिम रकमेस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण विहीत पध्दतीने ई-निविदा मागवून करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियमः-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ नुसार मा.व्यवस्थापन समितीची कर्तव्ये व अधिकाराबाबत कलम नं.१७ (२) ठ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

'श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य,त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार- प्रसार करील आणि श्री साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील'

**प्रस्ताविकः-** उपरोक्त तरतुदीनुसार प.पू.श्री साईबाबांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबत प्रचार-प्रसार होणेसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी मार्फत संस्थान प्रकाशित साईचरित्र,पुस्तके,फोटो व ऑडीओ/व्हीडीओ सीडीचे पुनरमुद्रणकरुन साईभक्तांना माफक किंमतीने विक्री केली जाते.

सर्व साधारण एक ते दोन वर्ष पुरेल एवढया प्रतींची छपाई केली जाते. वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करणे, ई-निविदा मागिवणे, प्राप्त निविदा मा. खरेदी समितीचे सभेत तांत्रिक व व्यवसायिक बीड उघडणे, छाननी करणे व कार्यादेश देणे अशा कामासाठी ३ ते ४ माहिन्यांचा कालावधी लागतो त्यामुळे ३ ते ७ महिने पुरेल एवढा साठा शिल्लक राहिल्यानंतर छपाईची कार्यवाही चालू करण्यात येते. देशातील अनेक साईमंदिरात साईभक्त संमेलने आयोजित केली जातात त्यामुळे ठराविक प्रकाशनांची मागणी अचानक वाढते.

प्रकाशने विभागामार्फत संस्थान परिसरात नवीन ०५ पुस्तकालये व संस्थानचे मुंबई कार्यालय, परराज्यात संस्थानव्दारे सुरु करण्यात आलेले माहिती व सुविधा केंद्र येथे साईभक्तांच्या सेवेसाठी पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तेथील शिल्लक साठा व विक्री प्रस्ताविक छपाईकामी विचारात घेतली जाते.

सन २०१७-२०१८ या कालावधीमध्ये शिर्डी येथे होणा-या श्री साई समाधी शताब्दी महोत्सावात श्री साईभक्तांचे संख्येत लक्षणीय वाढ होणार आहे. तसेच शताब्दी वर्षात परराज्यात आयोजीत होणा-या साईभक्त संमेलनात वेगवेगळया भाषेतील संस्थान प्रकाशित पुस्तकांचे स्टॉल लावण्याचे नियोजन आहे. त्याठिकाणी मोठया प्रमाणात पुस्तकांची मागणी विचारात घेता, साईभक्तांची प्रकाशने खरेदी करण्यासाठी मोठया संख्येने वाढ होणार असल्याने सदर बाबींचा विचार करुन प्रकाशने छपाई संख्येत वाढ करण्यात आलेली आहेत.

श्री गुरुपोर्णिमा उत्सव-२०१७ पासून रु. २५ हजार किंवा त्यापेक्षा जास्त देणगीदार साईभक्तांना श्री साईचरित्र भेट देणेचा उपक्रम सुरु करण्यात आलेला आहे. सदर कामासाठी दरमहा-२०० नगांची मागणी देणगी कार्यालयाकडून करण्यात येत आहे.

**प्रस्तावः-** पुनर्मुद्रण करावयाची पुस्तके/फोटो शिल्लक साठा, अंदाजे किती महिने साठा पुरेल व प्रस्तावित खर्चाबाबत अंदाजे किंमत (Estimated Cost) मुंबईतील ०४ मुद्रणालयाकडील मे. टॅको व्हिजन प्रा.लि. मुंबई, मे.निट प्रिंटर्स, अहमदनगर, सॅप प्रिंट सोल्युशन, मुंबई व प्रिंट प्लस प्रा.लि, मुंबई यांच्याकडून घेऊन त्यांची सरासरी करुन अंदाजे किंमत घेण्यात आलेली आहे. सदरचा परिशिष्ट खालील प्रमाणे.

| अं. नं. | छपाई तपशिल | वार्षिक विक्री | शिल्लक स्टॉक | दरमहा सरासरी विक्री | किती महिने पुरेल | नवीन छपाई संख्या | मागिल छपाई दर | अंदाजे छपाई दर | अंदाजे छपाई एकूण रक्कम रुपये. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साई सतचरित्र- कन्नड आवृत्ती क्र. १९ | २०,३१५ | ५९७९ | १७०० | ०३ | ३०,००० | ४८.१३ | ६०/- | १८,००,०००/- |
| ०२ | श्री साई सगुणोपासना- मराठी (पॉकेट साईज) आवृत्ती क्र.५५ | ७०,००० | ९०,००० | ७००० | ०८ | १,००,००० | ४.१६ | ७/- | ७,००,०००/- |
| ०३ | खापर्डे डायरी - हिंदी आवृत्ती क्र. ०९ | ९००० | ३९८८ | ९०० | ०६ | १०,००० | १८.०० | १५/- | १,५०,०००/- |
| ०४ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी- तेलगू (पॉकेट साईज) आवृत्ती क्र.०६ | ५०००० | १४३५० | ४५०० | ०३ | १,००,००० | २.१५ | ३/- | ३,००,०००/- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | श्री साईनाथ रुद्रध्याय ११ वा अध्याय (पॉकेट साईज) - मराठी<br>आवृत्ती क्र.१८ | ७३१२ | ६००० | ८५० | ०७ | १०,००० | ३.८५ | ५/- | ५,००,०००/- |
| ०६ | श्री साईनाथ भजनमाला-मराठी आवृत्ती क्र. ०७ | १८८ | १८८ | ५० | ०६ | १५०० | २९.३१ | ४०/- | ६०,०००/- |
| ०७ | मुलांचे बाबा- कन्नड<br>आवृत्ती क्र. १६ | ७००० | ३०३७ | ५५० | ०६ | १०,००० | ७.९१ | ११/- | १,१०,०००/- |
| ०८ | श्री साईनाथ सगुणोपासना-आरती कन्नड (पॉकेट साईज)<br>आवृत्ती क्र.०१ | प्रथम आवृती | -- | -- | -- | ५००० | नवीन छपाई | २०/- | १,००,०००/- |
| ०९ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी-तेलगू (पॉकेट साईज) भाष्य अनुवाद<br>आवृत्ती क्र.०३ | प्रथम आवृती | -- | -- | -- | ५००० | नवीन छपाई | ५/- | २५,०००/- |
| १० | खापर्डे डायरी – तेलगू<br>आवृत्ती क्र.०१ | प्रथम आवृती | -- | -- | -- | ५००० | नवीन छपाई | २०/- | १,००,०००/- |
| ११ | प्रधान – इंग्रजी<br>आवृत्ती क्र. ०३ | ४००० | ०० | ४०० | -- | ५००० | ९/- | १५/- | ७५,०००/- |
| १२ | चार अध्याय-बंगाली<br>(पॉकेट साईज) आवृत्ती क्र. ०२ | ७१८ | ७१ | ६०० | -- | ४००० | ११.५० | १५/- | ६०,०००/- |
| १३ | श्री साई सगुणोपासना -हिंदी<br>(पॉकेट साईज) आवृत्ती क्र. १० | ७५,००० | -- | -- | -- | ५०००० | ८.५३ | १२/- | ६,००,०००/- |
| १४ | श्री साई सगुणोपासना - तेलगू<br>(पॉकेट साईज) आवृत्ती क्र. ०३ | ७५,००० | -- | -- | -- | ५०००० | १०.२० | १५/- | ७,५०,०००/- |
| १५ | श्री साई सतचरित्र- हिंदी<br>आवृत्ती क्र. २८ वी | ५५,००० | ८००० | ४१६६ | ०२ | १,००,००० | ३८.७८ | ५०/- | ५०,००,०००/- |
| १६ | श्री साई सतचरित्र- गुजराती<br>आवृत्ती क्र. १५ वी | १४,००० | १५२३७ | ११६६ | ०८ | ५०,००० | ३८.१७ | ५०/- | २५,००,०००/- |
| १७ | श्री साईनाथ स्तवनमंजीरी-मराठी<br>(पॉकेट साईज) आवृत्ती क्र. ४० वी | १,५०,००० | १,५०,००० | १३,००० | ०७ | २,००,००० | २.०० | ३/- | ६,००,०००/- |
| १८ | श्री साई सतचरित्र- तेलगू<br>आवृत्ती क्र. २८ वी | ८४,००० | १,००,००० | ७००० | ०७ | ५०,००० | ४४.५० | ५०/- | २५,००,०००/- |
| | | | | | | | | एकूण रुपये. | **१,५९,३०,०००/-** |

(अक्षरी रु. एक कोटी एकूण साठ लाख तीस हजार मात्र.)

**मागणी:-** साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित पुस्तके विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणे व जाहिरात प्रसिध्दीस देऊन छपाई करुन साईभक्तांना बुकस्टॉलवर उपलब्ध करुन द्यावयाची आहेत.

**संस्थानचे अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय ई छाननी करुन अनुमान:-** आर्थिक/ धोरणात्मक.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-**प्रस्तावित छपाईकामी विहित पध्दतीनुसार वर्तमानपत्रात शासकीय दराने जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागवून, प्राप्त ई-निविदा मा. खरेदी समितीचे सभेपुढे तांत्रिक बीड व व्यवसायिक बीड उघडणे, त्यातील स्पर्धक निविदाकारांना बोलावून चर्चा करणे त्यांनतर मा. व्यवस्थापन समितीची मान्यता घेऊन निम्नतम दराने निविदाकारांना छपाई कार्यादेश देणेत येतील. याकामी अंदाजे रु. १,५९,३०,०००/- (अक्षरी रु. एक कोटी एकूण साठ लाख तीस हजार) मात्रचा खर्च अपेक्षित आहे. सदर खर्च पुस्तके/फोटो व दैनंदिनी/दिनदर्शिका वार्षिक छपाईची तरतूद अंदाजपत्रीय खर्च रु.०९ कोटी ५५ लाख १० हजार मधून करता येईल.

उपरोक्त पुस्तके छपाईकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१,५९,३०,०००/- मात्रचे खर्चास, ई-निविदा प्रक्रिया राबविणे व वर्तमानपत्रात शासकीय दराने देण्यात येणा-या ई- निविदा सूचना जाहिरात प्रसिध्दीचा योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदर विषय मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेली साठा संपत आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.१,५९,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७** **संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत उघडणेत आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांमधील निम्नतम दरधारक निविदाधारकांना चर्चेसाठी बोलविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुद:-** कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:-**

०१. मा.व्यवस्थापन समितीचे दि.२२.१२.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९२६

०२. मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०६.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४६७

**प्रास्ताविक:-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्देशानुसार, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या १० जुलै, २०१७ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये, आयटी विभागाअंतर्गत ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक ६० संगणके, इतर संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी संस्थानचे प्रचलित पद्धतीनुसार ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता घेणेत आलेली होती.

त्यानुसार राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत एकुण ०७ निविदाधारकांनी ऑनलाईन सादर केलेल्या ई-निविदांच्या तांत्रिक ई-निविदा मा.खरेदी समितीचे दि.१९ ऑगष्ट, २०१७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत. उघडण्यात आलेल्या तांत्रिक ई-निविदा पैकी पात्र निविदाधारकांच्या वाणिज्यीक ई-निविदा मा.खरेदी समितीच्या दि.३० ऑगष्ट, २०१७ रोजीचे सभेमध्ये उघडणेत आलेल्या आहेत. उघडण्यात आलेल्या वाणिज्यीक ई-निविदांचा तुलनात्मक दरतक्ता पुढीलप्रमाणे आहे.

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | संगणक (९० नग) दर/एकुण | लॅपटॉप (०७ नग) दर/एकुण | युपीएस (०१ नग) दर/एकुण | प्रोजेक्टर (०२ नग) दर/एकुण | प्रिंटर्स (०२ नग) दर/एकुण | नेटवर्क स्वीच (24 Port) (०१ नग) दर/ एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | KJM Group Systems Solutoin | 40,500 | 38,232 | 1,80,000 | 36,000 | 18,000 | 5,400 |
| | | 36,45,000 | 2,67,624 | 1,80,000 | 72,000 | 36,000 | 5,400 |
| 2 | Mccann Info Solution | 48,380 | 53,500 | 1,58,500 | 50,164 | 17,900 | 6,087 |
| | | 43,54,200 | 3,74,500 | 1,58,500 | 1,00,328 | 35,800 | 6,087 |
| 3 | Minitek Systems India Pvt Ltd | 44,752 | 49,057 | 2,18,043 | 42,642 | 20,072 | 5,947 |
| | | 40,27,680 | 3,43,399 | 2,18,043 | 85,284 | 40,144 | 5,947 |
| 4 | Cybernet it Pvt Ltd | **36,900** | 37,500 | 1,77,634 | **31,900** | 16,500 | 5,800 |
| | | **33,21,000** | 2,62,500 | 1,77,634 | **63,800** | 33,000 | 5,800 |
| 5 | R D Data Syatems | 37,000 | **33,700** | **1,40,500** | 40,550 | **14,100** | **5,000** |
| | | 33,30,000 | **2,35,900** | **1,40,500** | 81,100 | **28,200** | **5000** |
| 6 | Micronics Systems & Services | 42,800 | 41,500 | 2,44,000 | 41,000 | 17,200 | 5,900 |
| | | 38,52,000 | 2,90,500 | 2,44,000 | 82,000 | 34,400 | 5,900 |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | Sai Info Services | 45,700 | 40,600 | 1,97,300 | 48,105 | 17,100 | 5,650 |
| | | 41,13,000 | 2,84,200 | 1,97,300 | 96,210 | 34,200 | 5,650 |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील संगणके व प्रोजेक्टर साठी M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune यांनी देऊ केलेले दर निम्न्त्तम असून, उर्वरीत सर्व साहित्यांसाठी (लॅपटॉप, युपीएस, प्रिंटर्स व नेटवर्क स्विच) M/s R D Data Systems, Nashikयांनी देऊ केलेले दर निम्नत्तम आहेत.

उपरोक्तप्रमाणे ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक ६० संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत वाणिज्यीक निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारक M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune व M/s R D Data Systems, Nashik यांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चा व वाटाघाटींसाठी बोलविता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** माहिती तंत्रज्ञान विभागांतर्गत ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत वाणिज्यीक निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारक M/s Cybernet IT Pvt Ltd, Puneव M/s R D Data Systems, Nashik यांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चा व वाटाघाटींसाठी बोलविणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थान अधिनियम/ ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-** तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** माहिती तंत्रज्ञान विभागाअंर्गत ३० संगणके व सर्व शैक्षणिक संकुलांसाठी आवश्यक संगणके, संगणकीय साहित्य व प्रोजेक्टर खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत वाणिज्यीक निविदांमधील निम्नत्तम दरधारक निविदाधारक M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune व M/s R D Data Systems, Nashik यांना मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर चर्चा व वाटाघाटींसाठी बोलविणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.७७४** **प्रस्तावित खरेदीकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेमधील संगणके व प्रोजेक्टरसाठीचे M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune व लॅपटॉप, युपीएस, प्रिंटर्स, नेटवर्क स्विच साठीचे M/s R D Data Systems, Nashik यांचे प्रतिनिधी आजचे सभेत उपस्थित होते. सभेसमोर M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune यांचे प्रतिनिधींनी प्रति संगणक रु.६००/- मात्र सुट देऊ केली. तसेच M/s R D Data Systems, Nashik यांचे प्रतिनिधींनी वरीष्ठांशी चर्चा करुन ई-मेलद्वारे कळवितो, असे सांगितले.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित खरेदीकामी M/s Cybernet IT Pvt Ltd, Pune यांचे प्रति संगणक रु३६,३००/- व प्रति प्रोजेक्टर रु.३१,९००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच लॅपटॉप, युपीएस, प्रिंटर्स व नेटवर्क स्विच खरेदीकामी M/s R D Data Systems, Nashik यांचेकडून ई-मेलद्वारे प्राप्त होणारे अंतीम दर स्विकारणेत येऊन, मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभागप्रमुख)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८** **श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने शिर्डी शहरामधून जाणा-या अहमदनगर – मनमाड (NH160) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर बाजूस शासकीय विश्रामगृहाजवळ व शिर्डी नांदुर्खी रोडवर (विमानतळ रोड) शिर्डी शिवालगत स्वागत कमानी उभारणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-** अधिनियमाचे कलम १७ (१) नुसार राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मीक विधी, पूजा-अर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे ती उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील, अशी तरतूद आहे.

**मा.व्यवस्थापन समितीचा ठराव:-** मा. व्यवस्थापन समितीच्या दि.१५/०६/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५१६ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"श्रींचे समाधी शताब्दी वर्षाचे निमित्ताने शिर्डीकडे येणारे सर्व रस्ते /महामार्गांवर आकर्षक महाव्दारांची उभारणी करणेत यावी. यासाठी शासनाचे सार्वजनिक बांधकाम खात्यास विचारणा करणेत यावी. ते महाव्दार उभारणी करुन देण्यास तयार असतील तर त्यासाठीचा खर्च सार्वजनिक बांधकाम खात्यास देण्यात यावा अथवा त्यांचेकडून NOC घेवुन, संस्थानमार्फत महाव्दारांची उभारणी करणेत यावी, असे ठरले."*

**प्रस्तावना:-** श्री साईबाबांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होतआहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. सदर कृती आराखडयात संस्थानमार्फत प्रथम प्राधान्य क्रमाने उपलब्ध करावयाच्या सोयीसुविधांमध्ये शिर्डी शहरामधून जाणा-या अहमदनगर– मनमाड (NH-160) या राष्ट्रीय महामार्गावरशिर्डी शहराच्या उत्तरेस सावळीविहीर येथे (नाशिक फाटयाजवळ) तसेच शिर्डी शहराच्या दक्षिणेसशिर्डी शिवाजवळ स्वागत कमानी उभारणे प्रस्तावित आहे. यासाठी जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचेमार्फत कार्यवाही सुरु आहे. सदरचे कामासाठी त्यांना निधी वर्ग करणेकरीता मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव महाराष्ट्र शासन, विधी व न्याय विभाग यांना संस्थानचे जा.क्र.२४६०, दि.०४/०८/२०१७ रोजीच्या पत्राने सादर केलेला आहे.

मा.नामदार श्री.राधाकृष्णजी विखे पाटील यांचे अध्यक्षतेखाली दि.१८/०८/२०१७ रोजी शासकीय विश्रामगृह, शिर्डी येथे झालेल्या बैठकीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा निमित्त करावयाचे विविध विकास कामे व नियोजनाबाबत चर्चेअंती अहमदनगर – मनमाड (NH160) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर बाजूस शासकीय विश्रामगृहाजवळ व शिर्डी नांदुर्खी रोडवर(विमानतळ रोड) शिर्डी शिवालगत स्वागत कमानी उभारणी करणेबाबत निर्देश दिले आहेत.

**प्रस्ताव**:- नगर-मनमाड रस्ता हा जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचेअखत्यारीत असल्याने इतर दोन स्वागत कमानींबरोबर वर नमुद केलेप्रमाणे शिर्डी शहराचे उत्तर बाजूस शासकीय विश्रामगृहाजवळ स्वागत कमान उभारणेबाबत त्यांचे मार्फत पुढील कार्यवाही करता येईल. याकामी अंदाजे रक्कम रु.५० लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे. तसेच शिर्डी – नादुर्खी रोड सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे अखत्यारीत असल्याने त्यांचे मार्फत स्वागत कमान उभारणेसाठी विचारणा करता येईल अथवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे ना– हरकत दाखला घेऊन, संस्थानमार्फत स्वागत कमानीची उभारणी करता येईल. सदरचा रस्ता १५ मी. रुंद असल्याने स्वागत कमान उभारणेसाठी अंदाजे रु.२५ लक्ष मात्र खर्च अपेक्षित आहे.

जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांचेमार्फत अहमदनगर– मनमाड राष्ट्रीय महामार्गावर (NH-160) शिर्डी शहराचे उत्तर बाजूस शासकीय विश्रामगृहाजवळ व शिर्डी नांदुर्खी रोडवर शिवालगत स्वागत कमान उभारणीबाबत खालील प्रमाणे निर्णय होणे अपेक्षीत आहे.

१. उपरोक्त ठिकाणी स्वागत कमानी उभारणेसाठी धोरणात्मक निणेय घेणे.
२. स्वागत कमानी उभारणेकामी येणा-या एकूण रक्कम रु.७५ लक्ष मात्रचे अंदाजीत खर्चास मान्यता देणे.
३. सदरहू निधी संस्थानमार्फत कार्यकारी अभियंता, जागतिक बॅंक प्रकल्प (सार्वजनिक बांधकाम) विभाग, अहमदनगर यांना तसेच कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांना उपलब्ध करुन देणे.
४. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधिल तरतुदी अन्वये राज्य शासनाचे पूर्वमान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणे.

तरी उपरोक्त बाबींवर निर्णय होणेसविनंती.

**निर्णय क्र.७७५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीसाईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे निमित्ताने शिर्डी शहरामधून जाणाऱ्या अहमदनगर– मनमाड (NH160) या राष्ट्रीय महामार्गावर उत्तर बाजूस शासकीय विश्रामगृहाजवळ जागा अपुरी असल्यामुळे तेथे स्वागतकमान उभारणे संयुक्तिक होणार नाही, असे समिती सदस्यांचे मत झाले. मात्र शिर्डी नांदुर्खी रस्त्यावरशिर्डी शिवालगत फॅब्रीकेशनची स्वागतकमान उभारणेत यावी, असे ठरले. तसेच त्यासाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९** **श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजीत धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी साईनगर ग्राऊंड येथे स्टेज व त्यावरील शेडचे उभारणीबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. अधिनियमाचे कमल २१ मधील पोटकलम १(ख) रुढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे.

**मा. व्यवस्थापन समिती ठराव –**

श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजित करावयाच्या धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांची रुपरेषा व स्वरुप ठरविणेकामी साईभक्त, शिर्डी ग्रामस्थ तसेच जागतिक साई मंदिर विश्वस्त/ पदाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना व अभिप्राय यावर चर्चा होऊन धोरणात्मक निर्णय होणेकामी धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे वेळापत्रक मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत सादर करणेत आले. सदर प्रारुप वेळापत्रकात शताब्दी वर्षातील प्रत्येक महिन्यात विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमांचा समावेश केला आहे. सदर सभेत सादरीकरणातील विविध मुद्दयांबाबत सविस्तर चर्चा झाली व निर्णय क्र.३५८ खालीलप्रमाणे संमत झालेला आहे.

*"...समाधी शताब्दी वर्षामध्ये सादर करावयाच्या कार्यक्रमांची रुपरेषा ठरविणेत येऊन, झालेल्या चर्चेप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास मान्यता देण्यात आली आहे."*

**प्रस्तावना-** श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ ऑक्टोबर,२०१७ ते दि.१८ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. तसेच शताब्दीचे संपूर्ण वर्षभर वेगवेगळया धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहून श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल, या दृष्टीने तयारी करणेचे नियोजन आहे. सदर कार्यक्रमांचे स्वरुप व रुपरेषा ठरविणेसाठी आजतागायत शिर्डी ग्रामस्थ व साईभक्त यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचना वजा प्रस्ताव, जागतिक साईमंदीर विश्वस्त परिषदमध्ये झालेली चर्चा तसेच वेळोवेळी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या बैठका यातील मुद्दे विचारात घेऊन मा. व्यवस्थापन समितीचे दि.०९/०३/२०१७ रोजीचे सभेत सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आला होता. सदर सभेतील निर्णय क्रमांक १७१ नुसार शताब्दी वर्षाचे दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते १८ ऑक्टोबर, २०१८ याकालावधीत आयोजित करावयाचे विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रारुप वेळापत्रक तयार करणेत आले आहे. सदर प्रारुप वेळापत्रकात शताब्दी वर्षातील प्रत्येक महिन्यात नामवंत प्रवचनकारांच्या प्रवचनांचे कार्यक्रमांचा समावेश केलेला आहे. सदरहू वेळापत्रकास मा.व्यवस्थापन समितीचे दि.२३/०५/२०१७ रोजीचे सभेत निर्णय क्र.३५८ अन्वये मान्यता मिळाली आहे.

त्यानुसार सदर कार्यक्रमांचे आयोजनासाठी साईआश्रम भक्तनिवास येथे टेंसाईल फ्रॅब्रीक शेड (मंडप) उभारणी कामाची ई-निविदा प्रक्रिया सुरु आहे. सदर टेंसाईल फ्रॅब्रिक शेड (मंडप) उभारणी कामासाठी जास्त कालावधी लागल्यास शताब्दी कालावधीतील नियोजीत कार्यक्रमांसाठी संस्थानचे साईनगर येथे एम.एस. स्ट्रक्चरमध्ये स्टेज प्लॅटफॉर्म व त्यावर शेड करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव-** साईनगर ग्राऊंड येथे एम.एस. स्ट्रक्चरमध्ये 40'X32' मापाचा स्टेज प्लॅटफॉर्म व त्यावर पत्रा शेडचे काम करणेसाठी खालिलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**अ) स्टेज प्लॅटफॉर्मकरीता आवश्यक मटेरीयल खर्च :-**

| अ.नं. | मटेरिअल तपशिल | आवश्यक मटेरिअल | अंदाजे दर रक्कम रुपये | खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | M.S.Square Pipe - Size-60X60X3 mm | ३६१० र. फुट | ६५.०० (प्रति र. फुट) | २,३४,६५०.०० |
| ०२ | Colour Asian Paints | ६० लि. | ४००.०० (प्रति लि.) | २४,०००.०० |
| ०३ | 18mm heavy water proof plywood | ४० नग | ३,८४०.०० (प्रति नग) | १,५३,६००.०० |
| ०४ | Rubble Stone | १३ ब्रास | १,२६०.०० (प्रति ब्रास) | १६,३८०.०० |
| ०५ | Sand | २.५ ब्रास | ३,३००.०० (प्रति ब्रास) | ८,२५०.०० |
| ०६ | Metal | ५ ब्रास | २,२०५.०० (प्रति ब्रास) | ११,०२५.०० |
| ०७ | Cement Bag | ६९ गोणी | ३१०.०० (प्रति गोणी) | २१,३९०.०० |
| | | | **एकूण अपेक्षित खर्च (अ):** | **४,६९,२९५.००** |

**ब) स्टेज प्लॅटफॉर्मवर कलर कोटेड शीट शेड उभारणेकामी आवश्यक मटेरीयल खर्च :-**

| अ.नं. | मटेरिअल तपशिल | आवश्यक मटेरिअल | अंदाजे दर रक्कम रुपये | खर्च रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१ | Rubble Stone | १ ब्रास | १,२६०.०० (प्रति ब्रास) | १,२६०.०० |
| ०२ | Sand | १ ब्रास | ३,३००.०० (प्रति ब्रास) | ३,३००.०० |
| ०३ | Metal | २ ब्रास | २,२०५.०० (प्रति ब्रास) | ४,४१०.०० |
| ०४ | Cement Bag | १५ गोणी | ३१०.०० (प्रति गोणी) | ४,६५०.०० |
| ०५ | **M.S. Structure -** | | | |
| | Vertical Footing Member 60X60X3.20 mm sq. pipe | १३६ र. फुट | ६५.०० (प्रति र. फुट) | ८,८४०.०० |
| | Rafter -50X50X2.60 mm sq. pipe | २६० र. फुट | ६०.०० (प्रति र. फुट) | १५,३९०.०० |
| | Purlin – 40X40X2.60 mm sq. pipe | ६१० र. फुट | ५५.०० (प्रति र. फुट) | ३३,५५०.०० |
| | Tie Pipe - 40X40X2.60 mm sq. pipe | १२८ र. फुट | ५५.०० (प्रति र. फुट) | ७,०४०.०० |
| | Structural Frame Horizontal Member – 40X40X2.60 mm sq. pipe | ३३६ र. फुट | ५५.०० (प्रति र. फुट) | १८,४८०.०० |
| | M.S. Plate– (Size – 8’X4’), 6 mm Thk. | १५८ किलो | ५७.०० (प्रति किलो) | ९,००६.०० |
| ०५ | **Colour Coated Sheet -** | | | |
| | Size - 12’X4’, 0.45 mm Thk. | ४४ नग | १,७७०.०० (प्रति नग) | ७७,८८०.०० |
| | Size - 16’X4’, 0.45 mm Thk. | ३० नग | २,३६०.०० (प्रति नग) | ७०,८००.०० |
| | Size - 12’X3’6”, 0.45 mm Thk. | २ नग | १५५०.०० (प्रति नग) | ३,१००.०० |
| ०६ | Taping Screw | ५०० नग | ७.०० (प्रति नग) | ३,५००.०० |
| | | | **एकूण अपेक्षित खर्च (ब):** | **२,६१,२०६.००** |
| | | | **तपशिल (अ) + (ब) एकुण रक्कम रुपये :** | **७,३०,५०१.००** |
| | | | **पुर्णांकित रुपये :** | **७,३०,०००.००** |

उपरोक्त प्रमाणे स्टील स्ट्रक्चर व सिव्हील वर्क यांचा एकत्रित असा सुमारे रु.७.३० लक्ष मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचे काम मेकॅनिकल व बांधकाम विभागामार्फत संयुक्तीकरीत्या करता येईल.

तरी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव वर्षात आयोजित विविध धार्मिक, सांस्कृतिक व सामाजीक कार्यक्रमासाठी साईनगर येथे एम.एस. स्ट्रक्चरमध्ये स्टेज प्लॅटफॉर्म व स्टेजवर कलर कोटेड शीट शेड (साईज – ३२’X४०’) याप्रमाणे कामासाठी वरीलप्रमाणे येणारे रु.७.३० लक्ष मात्र इतक्या खर्चास व सदरचे काम विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन करुन घेणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात आयोजीत धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांसाठी साईनगर ग्राऊंड येथे स्टेज व त्यावरील शेडचे उभारणी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.७,३०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०** **श्री साईबाबा समाधी शताब्दी सन २०१८ निमित्त संस्थान हद्दीतील सितानगर एमएसईबी कॉर्नर ते सैनिकी कॅम्प विश्रामगृह पर्यंतचा रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-**

अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना–** दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये देश विदेशातून साईभक्तांची वर्दळ शिर्डी येथे वर्षभर राहणार आहे. तसेच उत्सव काळात व सुट्टीचे कालावधीमध्ये साईभक्तांचे संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. त्यामुळे शिर्डी शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्याचे दृष्टीने खालील रस्त्यांची विकासकामे हाती घेणे आवश्यक आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजीत किमंत रु. |
|---|---|---|
| ०१ | संस्थान हद्दीतील सितानगर एमएसईबी कॉर्नर ते सैनिकी कॅम्प विश्रामगृह पर्यतचा रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे.<br>(३.७५ मी.चा रस्ता ७.०० मी. रुंदीस करणे)<br>(एकूण ५०० मीटर लांबी) | ३६,३८,५००/- |

सदर काम संस्थान हद्दीतील असल्याने भूसंपादनाचा प्रश्न उदभवत नाही.

**प्रस्ताव–** सदरचे काम संस्थानचे आर्थिक निधीतून करावयाचे असल्याने कामासाठी रु.३६,३८,५००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७७७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी सन २०१८ निमित्त संस्थान हद्दीतील सितानगर एमएसईबी कॉर्नर ते सैनिकी कॅम्प विश्रामगृह पर्यंतच्या रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.३६,३८,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११** **श्री साईबाबा समाधी शताब्दी सन २०१८ निमित्त शेती महामंडळ हद्दीतील सैनिकी कॅम्प विश्रामगृह ते चारी क्र.११ हेलीपॅडकडे जाणारा रस्त्याचे नव्याने बांधकाम करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-** अधिनियम कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना–** दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोंबर २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये देश विदेशातून साईभक्तांची वर्दळ शिर्डी येथे वर्षभर राहणार आहे. तसेच उत्सव काळात व सुट्टीचे कालावधीमध्ये साईभक्तांचे संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. त्यामुळे शिर्डी शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्याचे दृष्टीने खालील रस्त्यांची विकासकामे हाती घेणे आवश्यक आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजीत किमंत रु. |
|---|---|---|
| ०१ | शेती महामंडळ हद्दीतील सैनिकी कॅम्प विश्रामगृह ते चारी क्र.११ हेलीपॅडकडे जाणारा रस्ता नव्याने ७.०० मी. रुंदीस बांधकाम करणे<br>(एकूण ६० मीटर लांबी) | ६,१६,०००/- |

सदर काम शेतीमहामंडळ यांचे हद्दीतील असल्याने त्यांचेकडून ना-हरकत दाखला घेणे आवश्यक राहील असे मत आहे.

**प्रस्ताव–** सदरचे काम संस्थानचे आर्थिक निधीतून करावयाचे असल्याने कामासाठी रु.६,१६,०००/- इतक्या रक्कमेचा प्रस्ताव सादर केलेला आहे. तरी याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७७८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी सन २०१८ निमित्त शेती महामंडळ हद्दीतील सैनिकी कॅम्प विश्रामगृह ते चारी क्र.११ हेलीपॅडकडे जाणारा रस्त्याचे नव्याने बांधकाम करणेकामी शेतीमहामंडळाकडून ना-हरकत दाखला मिळविणेत येऊन, त्याकामी विहीत पध्दतीने ई-मागविणेस व याकामी येणाऱ्या अंदाजे रु.६,१६,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२** **श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-२०१८ निमित्त शिर्डी परिसरातील रस्ते विकसित करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर व जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांना संस्थानमार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** अधिनियमाचे कलम २१ पोट कलम २ (१क) पोट कलम (१) च्या तरतुदींना अधिन राहून, विश्वतव्यवस्थेस, राज्यशासनाच्या पूर्व मंजूरीने, आणि राज्य शासनाकडून राजपत्रात प्रसिध्द केलेल आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करण्यात येईल. अशा कमाल मर्यादेच्या आणि अशा अटी व शर्तीच्या अधिन राहून भक्तांच्या सोयीसाठी बस वाहनतळ, रेल्वे स्थानक व विमानतळ आणि तत्सम पायाभुत सुविधा यांसारख्या पायाभुत सुविधा पुरविण्यासाठी किंवा त्या वाढविणेसाठी शासकिय विभागांना, शासकिय महामंडळांना, शासकिय कंपन्यांना किंवा शासकिय उपक्रमांना सहायक अनुदान देता येईल. अशी तरतुद आहे.

**प्रस्तावना**: श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्यातर्फे दि.०१ऑक्टोबर, २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर,२०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे केले जाणार आहे. या शताब्दी वर्षामध्ये श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिर्डीमध्ये येणा-या भक्तांना सर्व प्रकारच्या पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देता याव्यात यासाठी एकत्रित कृती आराखडा तयार करुन नियोजनबद्ध कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. यासाठी विधि व न्याय विभाग, शासन निर्णय दि.२२/१०/२०१३ अन्वये मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली संयुक्त कृती आराखडा समिती गठीत करण्यात आली आहे. सदर कृती आराखडा अंतिम करुन केंद्र शासनाकडे सादर करावयाच्या प्रस्तावाला मान्यता देण्यासाठी मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत कृती आराखडा समितीची बैठक दि.३१मार्च, २०१७ रोजी मा.मुख्यमंत्री महोदय यांचे समिती कक्ष, विधानभवन, मुंबई येथे पार पडली. सदर बैठकीमध्ये कृती आराखडयासमान्यता मिळालेली आहे.

सदरहू कृती आराखडयामध्ये शिर्डी परिसरातील रस्ते विकसित करणेसाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर व जिल्हा परिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांचेमार्फत प्रथम प्राधान्य गटातील संस्थान व महाराष्ट्र शासन निधितुन प्रस्तावित व द्वितिय प्राधान्य गटातील केंद्र सरकारचे निधीतुन प्रस्तावीत किंमतीचा घोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं.** | **कार्यकारी विभागाचे नांव** | **प्रथम प्राधान्य गट (रु. कोटीत)** | **द्वितिय प्राधान्य गट(रु. कोटीत)** | **एकूण (रु. कोटीत)** |
|---|---|---|---|---|
| ०१ | सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर | ३४.५१ | ५३८.७० | ५७३.२१ |
| ०२ | जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर | ५६.८० | २२०.५० | २७७.३० |

उपरोक्त निधी मागणी करणारा प्रस्ताव संबंधित विभागामार्फत शासनाकडे सादर करण्यात आला होता. सदरहू प्रस्तावास अद्याप मान्यता मिळालेली नाही.

मा.ना.श्री. राधाकृष्ण विखे पाटील, विरोधी पक्षनेता यांनी श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे पूर्वतयारीकरीता संस्थान, शिर्डी नगरपंचायत व सर्व शासकीय विभागांचे संबंधित अधिकारी यांचे समवेत घेतलेल्या बैठकीत उत्सव काळात साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असल्याने शिर्डी येथे होणा-या गर्दीचा विचार

करता शिर्डी परिसरातील रस्त्यांची सुधारणा करणेबाबत संबंधित विभागांना सुचना केलेल्या आहेत. तसेच मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी आपत्ती व्यवस्थापन नियोजनाकरीता घेतलेल्या बैठकीत शताब्दी कालावधीमध्ये साईभक्तांचे संख्येत वाढ होणार असलेने, गर्दीचे नियोजनाकरीता रस्त्यांची सुधारणा करणेबाबत संबंधित विभागांना सूचना केल्या आहे.

त्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी जा.क्र.प्रशा/ ५२५९/ २०१७ दि.०१/०९/२०१७ पत्रान्वये खालील रस्त्यांचे कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी उपलब्ध नसल्याने संस्थान मार्फत याकामी रक्कम रु.२४ कोटी मात्र निधी उपलब्ध करुन मिळावा जेणेकरुन सदरची कामे वेळत पूर्ण करता येतील असे कळविले आहे.

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजित किंमत (रु. लक्ष) |
|---|---|---|
| १ | शिर्डी कनकुरी डो-हाळे रस्ता (इजिमा.९) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३००.०० |
| २ | नांदुर्खी ते प्ररामा – ८ (इजिमा.८५) कि.मी.०/०० ते ६/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १५०.०० |
| ३ | गोदावरी वसाहत ते रुई (प्रजिमा.९१) कि.मी. ०/०० ते ७/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १७५.०० |
| ४ | रुई ते पिंपळवाडी रस्ता (प्रजिमा.८८) कि.मी. ०/०० ते ४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १००.०० |
| ५ | पिंपळवाडी एकरुखे गणेशनगर वाकडी ते रा.मा.५० पर्यंत रस्ता कि.मी. ०/०० ते २५/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | १०००.०० |
| ६ | रांजणगांव खु ते खडकेवाके रस्त (प्रजिमा.९२) कि.मी. ०/०० ते १४/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३५०.०० |
| ७ | नांदुर्खी साकुरी रस्ता ( प्रजिमा.१०) कि.मी. १०/५०० ते १२/५०० व २४/०० ते २८/०० मध्ये मजबुतीकरण व डांबरीकरण करणे. ता. राहाता | ३२५.०० |
| | **एकूण रक्कम रुपये लक्ष -** | **२४००.००** |

तसेच जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर यांनी जा.क्र.कार्या ४/प्रशा २/४०/१७ दि.०१/०९/२०१७ रोजीचे पत्रान्वये मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, शाखा अहमदनगर यांना अग्रेषित केलेल्या पत्रात खालील ४ रस्त्यांचे कामासाठी रु.१.६८ कोटी निधीची आवश्यकता असून, जिल्हा परिषदेकडे रस्त्यांच्या देखभाल दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध नसल्यामुळे निधीची उपलब्धता झाल्यानंतरच सदर कामे करण्यासंदर्भात पुढील कार्यवाही करता येईल असे नमूद केले आहे. सदरहू पत्राची प्रत माहीतीस्तव इकडील कार्यालयास सादर केली आहे.

| अ.नं. | रस्त्याचे नांव | रस्त्याचा दर्जा | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|---|
| १. | डो-हाळे- कनकुरी-शिर्डी प्र.रा.मा.८ ला मिळणारा इजिमा ९ रस्ता कि.मी. ०/००० ते ७/३०० मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. राहाता | इजिमा ९ | ६७.३० |
| २. | प्ररामा ८ सावळीविहीर बु.- वेस ते रांजणगांव देशमुख रस्त्यसाठी कि.मी. ०/००० ते ७/५०० मध्ये मुरुमी साईड पट्टया तयार करणे. ता. राहाता | इजिमा १४ | ४.२८ |
| ३. | प्ररामा ८ (धर्मशाळा रोड) ते कालवा (Canal) मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. राहाता | योजनाबाहय | ४४.३५ |
| ४. | नांदुर्खी बु. ते निमगांव- को-हाळे रस्ता कि.मी.०/००० ते ६/००० मजबुतीकरण व डांबरीकरण करणे ता. राहाता | ग्रा.मा.११० | ५२.७३ |
| | | **एकूण -** | **१६८.६६** |

उपरोक्त दोन्ही प्रस्तावांमध्ये डो-हाळे- कनकुरी -शिर्डी रस्ता व नांदुर्खी बु. ते निमगांव- को-हाळे हे रस्ते सामाईक आहेत. त्यामुळे सदर रस्ते जिल्हा परिषद, अहमदनगर यांचे मागणीतुन कमी करावे लागतील.

**प्रस्तावः- (अ)** सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी प्रस्तावात नमूद केलेली एकुण ०७ रस्ते अपात्कालीन परस्थितीमध्ये या रस्त्यांचा उपयोग पर्यायी बाह्यवळण रस्ता म्हणून होऊ शकतो. याकामी अंदाजे रु.२४ कोटी मात्र इतका निधी संस्थानकडून मिळणेस विनंती केली आहे

**(ब)** कार्यकारी अभियंता,जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर यांनी मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, शाखा-अहमदनगर यांना अग्रेषित केलेल्या पत्रात नमूद केलेली एकुण ०४ रस्ते सुधारणेसाठी अंदाजे रु.१.६९ कोटी इतका निधी संस्थानकडून मिळणेस विनंती केली आहे. परंतू त्याचे प्रस्तावातील अ. नं.०१ व ०४ हे रस्ते सार्वजनिक बांधकाम विभाग, संगमनेर यांनी त्यांचे प्रस्तावात सुध्दा नमूद केलेली असल्याने,जिल्हा परिषद सार्वजनिक बांधकाम (उत्तर) विभाग, अहमदनगर यांचे प्रस्तावातून वगळून अ.नं.०२ व ०३ चे रस्ते सुधारणेसाठी रक्कम रु.४८.६३ लक्ष इतका निधी संस्थानकडून मिळणेस विनंती केली आहे

तरी **अ** व **ब** प्रस्तावानुसार निधी उपलब्ध करुन देणे व याकामी मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७७९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव सन २०१७-२०१८ निमित्ताने शिर्डी परिसरातील कोण-कोणते रस्ते विकसित करावयाचे हे समिती ठरविल व समितीने निश्चित केलेले रस्ते संस्थान स्वत: विकसीत करेल. याकरीता सदरहू प्रस्ताव तूर्त स्थगित ठेवणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३** **श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सन २०१८ निमित्त शिर्डी वाहतूक आराखड्यातील रस्त्याचे डांबरीकरण/ कॉंक्रिटीकरण करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी २००४ चे कलम २१ (२) खालीलप्रमाणे आहे.

पोट कलम (१) आणि (१ क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी पुरेशी तरतुद केल्यानंतर विश्वस्तव्यवस्थेच्यानिधीत शिल्लक राहीली असल्यास, अशा शिल्लक रकमेचा विश्वस्तव्यवस्थेच्या वितरणयोग्य उत्पन्नाच्या तीस टक्क्यापेक्षा अधिक नसेल एवढा भाग, समितीस वेळोवेळी पुढील सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरता व खर्च करता येईल.

(दोन) स्थानिक नागरी सेवा सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होण्यासाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय्य करण्यासाठी.

**प्रस्तावना:** दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते दि.१९ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीमध्ये श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष साजरे करण्यात येणार आहे. या कालावधीमध्ये देश-विदेशातून साईभक्तांची वर्दळ शिर्डी येथे वर्षभर राहणार आहे. तसेच उत्सव काळात व सुट्टीचे कालावधीमध्ये साईभक्तांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणार आहे. त्या अनुषंगाने मा.ना.श्री.राधाकृष्ण विखेपाटील यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि.२६/०८/२०१७ रोजीच्या बैठकीतील चर्चेनुसार खालील रस्ते विकसीत करणे आवश्यक आहे.

**अ)** मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांनी त्यांचे पत्र जा.क्र.न.पं./टि.क्र.८/२३०९/२०१७ दि.०६/०९/२०१७ अन्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

" उपरोक्त विषयाच्या संदर्भान्वये "श्रीसाईबाबा समाधी शताब्दी सन २०१८" च्या निमित्ताने शिर्डी पोलिस वाहतूक विभाग यांनी सादर केलेल्या वाहतूक आराखड्याची खालील रस्ते विकसीत करणेसाठी संदर्भ ३ अन्वये प्रस्ताव सादर करणेत आला होता. तरी सदर प्रस्तावा अंतर्गत कामांची सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहे. अंदाजपत्रके हे सार्वजनिक बांधकाम विभाग व मजि.प्रा. विभाग यांचे प्रचलित दरसूचीनुसार तयार करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजीत किंमत रु. |
|---|---|---|
| ०१ | शिर्डी नगरपंचायत हद्दीतील पश्चिमेकडील १८.० मी. विकास योजना वळण रस्ता कडून शिर्डी संस्थान प्रसादालायकडे जाणेसाठी खाजगी मालकांचे स.नं.१६४ मधून १२.००मी. रुंद व १६०मी. लांब दक्षिण उत्तर रस्ता डांबरीकरण करणे व नाल्यावर सिडीवर्क बांधकाम करणे. (सदर रस्ता विकसित करणेसाठी स.क्रं.१६४ (पैकी) चे मालक यांचे ना हरकत घेणे आवश्यक राहील.) | २५,५२,१४९/- |
| ०२ | जुना पिंपळवाडी रस्ता ते साईश हॉटेल लगत ते गायके हॉस्पिटल समोरून विकास योजनेतील १८.० मी. रस्त्यापर्यंत३५०मी. लांब व६.००मी. रुंद रस्ता डांबरीकरण करणे. | १०,४५,२३१/- |
| ०३ | जुना पिंपळवाडी रस्ता ते ओम साईनगरकडे जाणारा व नंदु लोढा यांचे घरासमोरून विकास योजनेतील १८.० मी. रस्त्यापर्यंत ३५० मी. लांब व ६.०० मी. रुंद रस्ता कॉंक्रिटीकरण करण्यात यावा. (स.नं.६ मधील लेआऊटमधील रस्ता) | ३५,०६,१९०/- |

| | | |
|---|---|---|
| ०४ | शिर्डी हद्दीमधील स.नं. ९८ मधील पत्रकार कॉलणीमधील दक्षिणोत्तर रस्ता. (शिर्डी बनरस्ता ते ५०० रुम भक्तनिवास रस्ता पाणी टाकीलगत) असुन लांबी- ४०० मी. व रुंदी ५.५० मी. कॉंक्रिटीकरण करणे. | ३१,६४,८२४/- |
| ०५ | गावठाण हद्दीतील पालखी रस्त्याच्या कडेचे लगतचे पेव्हीग ब्लॉकचे नुतनीकरण व पथदिवे नुतनीकरण करणे. | ३२,७१,०३१/- |
| | **एकूण रक्कम रु.** | **१,३५,३९,४२५/-** |

तरी वरीलप्रमाणे कामांचे सविस्तर अंदाजपत्रके सोबत सादर करीत आहे. वरील संदर्भ क्र.०३ नुसार सादर केलेल्या प्रस्तावाची ढोबळ किंमत रु.९६.०० लक्ष इतकी होती. तथापी सविस्तर अंदाजपत्रके तयार केलेनंतरची सुधारीत प्रस्तावाची एकुण किंमत रु.१,३५,३९,४२५/- इतकी आहे. तरी वरील रस्ते हे श्रीसाईबाबा समाधी शताब्दी वाहतूकीसाठी अत्यावश्यक असल्याने श्रीसाईबाबा संस्थानमार्फत डांबरीकरण/ कॉंक्रिटीकरण काम तातडीने हाती घेणेस विनंती आहे."

वरीलपैकी अ.क्र.१ - स.नं.१६४ मधून १२.०० मी. रुंद व १६० मी. लांब दक्षिणउत्तररस्ता डांबरीकरण करणे कामासाठी मा. व्यवस्थापन समितीचे दि.२५/०२/२०१७ रोजीचे सभेतील नि.क्र.३४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. या रस्त्यांसह एकूण ५ रस्ते विकसीत करणेसाठी शिर्डी नगरंपचायतीचे अंदाजपत्रकानुसार एकूण रु.१,३५,३९,४२५/- खर्च अपेक्षित आहे.

**ब)अहमदनगर मनमाड रस्त्याचे पुर्वेकडील वितरीका क्र. ११ चे बाजुने निमगाव शिव रस्त्यापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करणे.**(लांबी- ११००मी. वरुंदी५.५० मी.) –मा. व्यवस्थापन समितीचे दि.२०/०८/२०१७ रोजीचे सभेतील नि. क्र. ६७६ मध्ये नगर मनमाड रस्त्यापासुन पश्चिमेकडे चारी क्र.११ वरून हेलिपॅड कडे जाणारा रस्ता विकसित करणेत आला आहे. त्याप्रमाणे नगर मनमाड रस्त्यापासून पुर्वेकडे जाणारा चारी क्र.११ सन-न-सॅन्ड हॉटेलपर्यंत बंदीस्त करून रस्ता विकसीत करण्यात यावा असे ठरले आहे. सदरहु रस्त्यातील चारी नं. ११ बंदिस्त करून रस्ता विकसीत करणेसाठी जलसंपदा विभाग, नाशिक यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. जलसंपदा विभागाकडे संपर्क करून सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. त्यात काही कालावधी जाईल. करीता तुर्त शताब्दी कालावधीतील रहदारीचे नियोजनासाठी अहमदनगर मनमाड रस्त्याचे पुर्वेकडील वितरीका क्र. ११ चे बाजुने निमगाव शिव रस्त्यापर्यंत या सध्याचे वहीवाटीतील ५.५० मी. रस्त्याचे ११००मी. लांबीत डांबरीकरण करणेसाठी प्राथमिक अंदाजपत्रकानुसार रु८८,७५,३५०/- मात्र खर्च अपक्षित आहे.

वरीलप्रमाणे 'अ' व 'ब' मध्ये नमूद केल्यानुसार रस्ते विकसित करणेसाठीएकूण रु.२,२४,१४,७७५/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

**प्रस्ताव**: तरी वरीलप्रमाणे 'अ' व 'ब' मध्ये नमूद केलेल्या रस्त्यांचे विकसनासाठी संस्थानचे आर्थिक निधीतून एकूण रु.२,२४,१४,७७५/- इतक्या खर्चास मान्यतेसाठी, चारी नं. ११ चे उजव्या बाजूने रस्ता विकसीत करणेसाठी जलसंपदा विभाग, नाशिक यांचे परवानगीसाठी तसेच संस्थान अधिनियम २००४ मधिल वर नमूद केलेले तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावातील 'अ' व 'ब' मध्ये नमूद केलेल्या रस्त्यांचे विकसन संस्थानमार्फत करणे व त्यासाठी येणाऱ्या एकूण रु.२,२४,१४,७७५/- मात्र खर्चास संस्थान अधिनियम २००४ मधिल तरतुदीनुसार विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेस. तसेच चारी नं.११ चे उजव्या बाजूने रस्ता विकसीत करणेसाठी जलसंपदा विभाग, नाशिक यांचे परवानगीसाठी प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४** **मंदिर परिसराचे पूर्वेकडील मोकळ्या जागेत एम. एस. स्ट्रक्चर व टेन्साईल फॅब्रीकचे शेड दक्षिण बाजूस मंदिराचे भिंतीपर्यंत वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, २००४ मधिल तरतूद:-** "२१ (१) विश्वस्तव्यवस्थेचा निधी, आयकर अधिनियम १९६१ च्या तरतुदींना अधीन राहून, समितीकडून पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही प्रयोजनांसाठी वापरण्यात अथवा खर्च करण्यात येईल

(ख) मंदिराची व विश्वस्तशव्यववस्थेच्याच मालमत्तां ची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन;

(ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे."

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-**

१. दि. ०९/१०/२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७१३ खालीलप्रमाणे समंत झालेला आहे.

*"....यावर सविस्तर चर्चा होऊन, तक्त्यामध्ये नमूद केलेले (१६ गुंठे, साईप्रसाद इमारतीजवळील लाडू विक्री काऊंटर, पिंपळवाडी ररस्त्यावरील दर्शन रांग) जागेमध्ये साईभक्तांचा सोयीसाठी एम.एस.स्ट्रक्चर व पी.व्ही.सी. फॅब्रिकचे छत बसविणेस व त्याकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस मान्यता देण्यात आली.*

२ दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयक्र.३२२ (२९) खालीलप्रमाणे समंत झालेला आहे.

"....यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरालगत एम. एस. स्ट्रक्चर व टेन्साईल फॅब्रिकचे छत असलेल्या शेडस् उभारणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यामधील निम्नतम दरधारक वेस्टरर्न आऊटडोअर स्ट्रसक्चदरस, प्रा. लि., ठाणे यांचे दर स्विकारणेत यावेत तसेच त्यांनी सदर जागेची प्रत्यक्ष पाहणी करुन शेडची उंची किती असावी याबाबत निश्चीती करावी, त्यानंतर त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करण्यात आली."

**मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचेकडे दाखल C.A.NO1776/2014, IN PIL NO.18/2011 मध्ये दि.१४/०१/२०१५ रोजीचा आदेश:-**

1. *Heard this is an application for permission to spend an amount of Rs.1,46,18,120/- for the purpose of construction of temporary shed of M.S. structure and shed made up of pvc double coated tensile fabric in and around the temple premises.*
2. *The present application is rejected because request for permanent M.S structure around temple would ruin not only its look but would be obstruction for the devotees. During festival time temporary structures are erected for shed and said practice appears to be proper.*
3. *The Civil Application stands rejected."*

**प्रस्तावना -**

मा. व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ चे निर्णयानुसार मंदिर परिसराचे पूर्वेकडील मोकळया जागेत लाडू काउंटर व पिंपळवाडी रस्ता दर्शन रांग याठिकाणी टेंसाईल शेडस् उभारणेसाठी रक्कम रु.१,२२,९२,८८१/- मात्र रकमेचा कार्यादेश मे. वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा. लि., ठाणे यांना जा.क्र.एसएसएसटी/ बांधकाम/ १०१९/ २०१७ दि.२९/०५/२०१७ अन्वये देण्यात आलेला आहे. सदर काम प्रगतीत आहे.

दि.१९/०८/२०१७ रोजी मा. नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांनी मा. नगराध्यक्षा-तथा-विश्वस्त, नगरसेवक व काही गावक-यांसह सदर कामाचे ठिकाणी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदया यांचेसमवेत पहाणी केली. त्यावेळी सदरहू शेडची दक्षिण बाजूस लांबी (गेट नं.०३ पर्यंत) मंदिराचे भिंतीपर्यंत वाढविण्यात यावी त्यामुळे भक्तांना उन-पाऊस यापासून निवारा मिळेल असे सूचीत केले आहे. याप्रमाणे शेडचे विस्तारीकरण करणेसाठी मे. वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा. लि., ठाणे यांचे मंजूर दराने खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे

| अ.नं. | तपशिल | साईज | | क्षेत्रफळ | एकक | वेस्टर्न आऊटडोअर यांचे मंजूर दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | मंदिर परिसरालगत पुर्वेकडील मोकळ्या जागेत एम.एस. स्ट्रक्चर व टेन्साईल फॅब्रीक शेडचे दक्षिण बाजूस मंदिराचे भिंती पर्यंत विस्तारीकरण करणे | १६ | २४.०८ | ३८५.२८ | चौ.मी | ५३२३.०४ प्रती चौ.मी. | २०,५०,८६०.८५ |
| ०२ | खोदाई सिव्हील वर्क फाऊंडेशन कॉलम इ. | | | ०४ | नग | २६,५५५.५३ प्रती नग | १,०६,२२२.१२ |
| | **एकूण पूर्णांकीत रुपये** | | | | | | **२१,५७,०८३.००** |

ठेकेदार वेस्टर्न आउटडोअर, स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांचे कामाचे स्कोपमध्ये मंदिराचे पूर्वेकडील जागा लाडू काउंटर व पिंपळवाडी रस्त्यावरील दर्शन रांग याठिकाणी शेड उभारणे प्रस्तावीत होते. त्याकरीता त्यांना एकूण रु.१,२२,९२,८८१/- मात्र इतक्या रकमेचा कार्यादेश देणेत आला आहे. तथापी साईप्रसाद नं.०१ व ०२ इमारती पाडण्याचे कामास सुरुवात केल्याने सदर ठिकाणचे लाडू काऊंटर रद्द करण्यात आल्यामुळे त्याठिकाणचे शेडचे काम रद्द करण्यात आले आहे. त्यामुळे सदरचे कामाचे एकूण परिमाणात व खर्चात रु.३०,१०,०००/- मात्रची बचत होत आहे.

गेट नं. ०३ चे समोर सदर शेड वाढविणेकामी वर नमूद केलेनुसार रक्कम रु.२१,५७,०८३/- मात्रचा खर्च अपेक्षीत आहे.

लाडू काऊंटरचे शेडचे काम रद्द केल्याने कार्यादेशानुसार शिल्लक असलेल्या रकमेतून सदर गेट नं. ०३ चे समोरील शेडचे काम ठेकेदार वेस्टर्न आउटडोअर, स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांचेकडून करता येईल असे मत आहे

**प्रस्ताव:-** तरी उपरोक्त तपशिलानुसार मंदिर परिसराचे पूर्वेकडील मोकळ्या जागेत एम. एस. स्ट्रक्चर असलेले टेन्साईल फॅब्रीकचे शेड उभारणेचे काम मे. वेस्टर्न आऊटडोअर स्ट्रक्चरस, प्रा.लि., ठाणे यांचेमार्फत चालू असून त्यांचेकडून उपरोक्त तपशिलात दर्शविले प्रमाणे शेडचे गेट नं. ०३ पर्यंतचे विस्तारीकरणचे काम त्यांचे मंजूर दरात व कार्यादेशातील शिल्लक रकमेतून करुन घेणेस निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.७८१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, वेस्टर्न आउटडोअर, स्ट्रक्चर्स प्रा.लि., ठाणे यांचे कार्यादेशामधील, लाडू काऊंटर शेडचे काम रद्द केलेले असल्यामुळे, त्यांच्या कार्यादेशामधील शिल्लक रकमेतून मंदिर परिसराचे पूर्वेकडील मोकळ्या जागेत एम.एस. स्ट्रक्चर व टेन्साईल फॅब्रीकचे शेड, दक्षिण बाजूस मंदिराचे भिंतीपर्यंत वाढविणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१५** **शताब्दी महोत्सव २०१८ चे गर्दीचे नियोजनाकामी साईभक्तांना मुख दर्शनाकरीता वाढीव दरवाजाची निर्मिती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:-**

१. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये "मंदिराच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी समितीकडून विश्वस्तव्यवस्थेच्या निधीचा विनीयोग करण्याची तरतूद आहे.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम (१) च्या खंड (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल,व्यवस्थापन व प्रशासन करणे व खंड (ग) अन्वये भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे या प्रयोजनांसाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतुद आहे.

**प्रस्तावना-** संस्थानमार्फत १ ऑक्टोंबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव साजरा करणेत येणार आहे. या कालावधीत देश विदेशातून लाखो साईभक्त दर्शनासाठी शिर्डी येथे येणार आहेत. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षाचे कालावधीत श्रींचे दर्शनासाठी साईभक्तांचे मोठया प्रमाणावर गर्दी होणार आहे. त्याकरीता गर्दीचे नियोजनाकामी आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणेकामी दि.१८/०८/२०१७ रोजी कर्नल, व्ही.एन. सुपनेकर, संचालक, आपत्ती व्ुयवस्थापन केंद्र, यशदा, पुणे यांचे समवेत मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करणेत आली होती. सदरहू बैठकीत तसेच मंदिर परिसराचे पहाणी दरम्यान कर्नल, सुपनेकर यांनी केलेल्या सुचनेबाबत संरक्षण विभागाकडील जा.नं.२३३१/ २०१७ दि.०६/०९/२०१७ रोजीचे परिपत्रकान्वये मुखदर्शन करीता वाढीव एक दरवाजाची निर्मिती करणेबाबत निर्देशीत केले आहे.

**प्रस्ताव:-** समाधी मंदिरातील स्टेजसमोरील भागात उत्तर बाजूस साईभक्तांचे मुख दर्शनाकरीता ५'X७' या साईजचा सागवान लाकडामध्ये आकर्षक फ्रेम व शटरचा दरवाजा बसविता येईल. तसेच बाहेरील बाजूस आत प्रवेश करणेकरीता दरवाजा समोर ६'X५' ओटा तयार करुन विट बांधकामात पायऱ्या तयार कराव्या लागतील. त्यानुसार शताब्दी वर्षाचे कालावधी गर्दीचे नियोजन करणेकामी साईभक्तांना मुख दर्शनाकरीता वाढीव दरवाला करणेकामी अपेक्षित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | परिमाण /एकक | दर | रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १. | दरवाजाचे ओपनींग करीता भिंतीचे बांधकाम तोडणे, पेव्हींग ब्लॉक काढणे | लम्बसम | १०००.०० | १०००.०० |
| २. | पाय-यांकरीता विट बांधकाम करणे. | ३.१७ घन मी. | ६१५१.२७ | १९,४९९.५३ |
| ३. | बाहेरील प्लास्टर | १६.८४ चौ.मी. | २९७.८७ | ५,०१६.१३ |
| ४. | मुरुम फीलींग | १.१९ घन मी. | ५४१.५५ | ६४४.४५ |
| ५. | पीसीसी | ०.२८ घन मी. | ३८७१.४८ | १,०८४.०१ |
| ६. | पाय-या व ओटयाकरीता ग्रेनाईट बसविणे. | ८.०० चौ. मी. | ३२२०.०० | २५,७६०.०० |
| ७. | ओटा व पाय-याचे बाजूने अपेक्स पेंटमध्ये रंगकाम करणे. | ४.८४ चौ.मी. | २१०.०० | १,०१६.४० |
| ८. | सागवान लाकडात दरवाजा फ्रेम ५'X७' बसविणे. | ५.०५ घन फुट | ६५००.०० | ३२,८२५.०० |
| ९. | सागवानी लाकडात दरवाजा शटर बसविणे. ४'-४''X६'-४'' | ३.४७ घन फुट | ६५००.०० | २२,५५५.०० |
| १०. | डोअर किट सेट (पितळी)<br>१) अल्ड्राप १४'' – ०१ नग<br>२) बिजागिरी ६''– ०६ नग<br>३) हॅन्डल १२''– ०४ नग | एकत्रित | १०,०००.०० | १०,०००.०० |
| ११. | पाय-या व ओटयाचे कडेने स्टेनलेस स्टीलची रेलींग करणे. | ६.०० र. मी. | ३९५८.०० | २३,७४८.०० |
| १२. | दरवाजा बसविणे कामाची मजुरी खर्च | - | ६०००.०० | ६०००.०० |
| | | | एकूण रक्कम रु. | १,४९,१४८.०० |

उपरोक्त प्रमाणे साईभक्तांना मुख दर्शनकरीता प्रवेशद्वार तयार करणेकामी अंदाजे रक्कम रु.१,४९,१४८/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरहू प्रवेशद्वार तयार करणेकामाचे स्वरुप भिन्न असल्यामुळे याकामी आवश्यक मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करता येईल.

तरी समाधी मंदिरातील स्टेजसमोरील भागात उत्तर बाजूस साईभक्तांना मुख दर्शनाकरीता सागवान लाकडामध्ये आकर्षक फ्रेम व शटरचा दरवाजा बसविणेकामी येणारे रक्कम रु.१,४९,१४८/- मात्रचे खर्चास व सदरहू दरवाजा बसविणेकामी लागणारे आवश्यक मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून सदरचे काम विभागामार्फत करुन घेणेस निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.७८२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, समाधी मंदिरातील स्टेजसमोरील भागात उत्तर बाजूस साईभक्तांना मुख दर्शनाकरीता सागवान लाकडामध्ये आकर्षक फ्रेम व शटरचा दरवाजा बसविणेकामी येणारे रक्कम रु.१,४९,१४८/- मात्रचे खर्चास व हा दरवाजा बसविणेकामी लागणारे आवश्यक मटेरियल विहीत पध्दतीने कोटेशन मागवून सदरचे काम विभागामार्फत करुन घेणेस मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६** **सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्र आयोजित करणे व शिर्डी महोत्सव कार्यक्रम आयोजीत करणेकामी मंडप व इतर अनुषंगीक व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:**

१) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ख) अन्वये, " रूढी व प्रथांनुसार मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजीत करणे व पार पाडणे'' अशी तरतूद आहे.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम (१) च्या खंड (ड) अन्वये, " श्री साईबाबांच्या शिकवणीचा प्रचार करणे'' अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना:** थोर संत श्री साईबाबा यांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर, २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होणार आहेत. त्यानिमित्त श्री साईबाबा संस्थानमार्फत श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ (विजयादशमी) अखेर साजरे करण्यात येणार आहे. श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षामध्ये शिर्डीत येणा-या भाविकांसाठी सोयी-सुविधा उभारणे. तसेच संपूर्ण वर्षभर वेगवेगळ्या धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करुन साईचरीत्रावर आधारीत वेगवेगळे इव्हेन्ट तयार करुन त्याचे सादरीकरण करणे, जेणेकरुन संपूर्ण वर्षभरात शिर्डीमध्ये भक्तीमय वातावरण राहील, अशाप्रकारे श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल या दृष्टीने प्रयत्न करणेत येत आहेत.

दि.११ डिसेंबर, २०१६ रोजी श्री क्षेत्र शिर्डी येथे श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र साई आश्रम परिसरात आयोजित करणेत आले होते. त्याअनुषंगाने सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्षात पून्हा एकदा देश-विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र व शिर्डी महोत्सव कार्यक्रम तसेच साई भजन संध्या आयोजित करणेत येत आहे, जेणेकरून श्री साईबाबा समाधी शताब्दी सोहळा अविस्मरणीय होईल. देश-विदेशातील साई मंदिराचे अंदाजे २००० अधिकारी/ पदाधिका-यांची बैठक व्यवस्था होईल एवढया आकारमानाचा आवश्यकतेनुसार वॉटरप्रुफ सुशोभित मंडप उभारणेबाबतची कार्यवाही करणेबाबत शताब्दी कक्ष यांनी कळविले आहे. साई आश्रम परिसरात डोम मंडप टाकून विषयांकीत कार्यक्रमाचे आयोजन करावयाचे आहे, त्याकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**(कालावधी - २३/१२/२०१७ ते ०१/०१/२०१८).**

| अ. नं. | व्यवस्थेचा तपशिल | साईज | परिमाण/ एकक | अंदाजे दर (रू.) | रक्कम (रू.) | कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | **डोम मंडप व्यवस्थाः-** वॉटरप्रुफ छत असलेला मंडप, आतिल बाजूस सुशोभित कापड, मध्यवर्ती ठिकाणी २७' उंची व दोन्ही बाजूस १२' उंची असलेला डोम मंडप, साईडला व पाठीमागील बाजूस सफेद कनात, संपूर्ण मंडपात लाल रंगाचे कारपेटची बिछायत इ. (लोखंडी स्ट्रक्चर व कैच्या). | ८०'X३००' | २४,००० चौ. फुट | २०/- | ४,८०,०००/- | १० दिवस |
| २ | **स्टेज व्यवस्थाः-** ४०'X३०' साईजचे जमिनीपासून ०४ फुट उंचीचे भक्कम स्टेज उभारणे, स्टेजवर लाल रंगाचे कारपेट, दोन्ही बाजूने भक्कम पाय-या लावणे, स्टेजला बॅकड्रॉपसाठी गडद रंगाचे सुशोभित कापड लावणे. | ४०'X३०' | १२०० चौ. फुट | ३३/- | ३९,६००/- | १० दिवस |
| ३ | **स्वागत कमानी:-** २'X२' आकाराच्या बॉक्स टाईप स्वागत कमानी उभारणे. (रुंदी-२०', उंची-२०'). | --- | ०२ नग | ५,५००/- | ११,०००/- | १० दिवस |
| ४ | पांढरे शुभ्र व स्वच्छ कव्हरसह हाताच्या पी.व्ही.सी खुर्च्या पुरविणे. | --- | २००० नग | २८/- | ५६,०००/- | १० दिवस |
| ५ | थ्री सिटर एस. एस. सोफा व कुशनसह व त्याकरीता पांढरे शुभ्र व स्वच्छ कापड लावणे. | --- | ५० नग | ५००/- | २५,०००/- | १० दिवस |
| ६ | फ्लेक्स बॅनर व इतर प्रिटींग खर्च. | --- | --- | --- | ६०,०००/- | --- |
| ७ | साऊंड सिस्टीम व्यवस्था करणे. | --- | --- | --- | ७५,०००/- | १० दिवस |
| ८ | मंडपामध्ये लाईटस्, फॅन, डेझर्ट कुलर इ. विद्युत व्यवस्था करणे. | --- | --- | --- | १,००,०००/- | १० दिवस |
| ९ | व्ही.आय.पीं करीता व्यासपीठावर खुर्च्या ठेवणे. | --- | ३० नग | ५००/- | १५,०००/- | ०१ दिवस |
| १० | व्ही.आय.पीं करीता व्यासपीठावर टी पॉय ठेवणे. | --- | ०५ नग | १,५००/- | ७,५००/- | ०१ दिवस |
| ११ | मंडपामध्ये आवश्यक ठिकाणी स्टॅण्डसह एल.ई.डी. स्क्रिन-८'X१०' या साईजमध्ये लावण्याची व्यवस्था करणे. कार्यक्रमाचे व्हिडीओ शुटींग करणे व सदर व्हिडीओ शुटींगची सी.डी./ डि.व्हि.डी. तयार करणे. | --- | ०६ नग | ३०,०००/- | १,८०,०००/- | ०१ दिवस |
| १२ | **जेवणाकरीता मंडप व्यवस्थाः-** प्लास्टीक ताडपत्री चा वॉटरप्रुफ छत असलेला भक्कम मंडप, आतिल बाजूस सुशोभित कापड, खांब पट्टी, मंडपाच्या आतील छत नवीन पांढ-या स्वच्छ कापडाद्वारे तयार करणे. मंडपामध्ये व्हेन्टीलेशनची व्यवस्था करणे. मध्यवर्ती ठिकाणी किमान १५' उंची व बाजूस १२' उंची असलेला मंडप, तसेच मंडपाचा मधला गाळा किमान ६०' रुंदीचा असणे आवश्यक, सर्व बाजूस सफेद कनात, संपूर्ण मंडपात पी व्ही. सी. मॅटींग बिछायत इ. (लोखंडी पाईप/ कैची स्ट्राक्चर इ. सह). | ९०'X१८०' | १६,२०० चौ. फुट | ७/- | १,१३,४००/- | ०१ दिवस |
| १३ | **किचनकरीता शेड व्यवस्थाः-** पत्र्याचे छत असलेले | ७५'X४५' | ३३७५ | ८/- | २७,०००/- | ०१ दिवस |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | भक्कम शेड उभारणे, शेडची मध्यवर्ती ठिकाणी १५' ते १६' उंची व दोन्ही बाजूस १२' ते १४' उंची आवश्यक, सर्व बाजूस कनात इ. (लोखंडी पाईप व लाकडी बल्ली स्ट्रक्चर इ.सह). | | चौ. फुट | | | |
| १४ | जेवण व किचनचे मंडपामध्ये विद्युत प्रकाश व्यवस्थेकरीता सी.एफ.एल, फॅन इ. विद्युत व्यवस्था वायरींगसह करणे. | --- | ---- | --- | ३५,०००/- | ०१ दिवस |
| १५ | बिगर हाताच्या पी.व्ही.सी खुर्च्या पुरविणे. | --- | १००० नग | ५/- | ५,०००/- | ०१ दिवस |
| | **एकूण खर्च रक्कम रुपये:-** | | | | **१२,२९,५००/-.** | |

सदर व्यवस्थेसाठी उपरोक्तप्रमाणे रक्कम रु.१२,२९,५००/- मात्र इतका खर्च अपेक्षीत आहे.

**प्रस्ताव:** तरी श्री क्षेत्र शिर्डी येथे देश विदेशातील साई मंदिरांचे चर्चासत्र, शिर्डी महोत्सव कार्यक्रम तसेच साई भजन संध्या आयोजीत करणेसाठी उपरोक्तकामी वरील अंदाजपत्रकानुसार येणारे रू.१२,२९,५००/- मात्रचे खर्चास व सदरहु व्यवस्था साई आश्रम परिसरात करणेसाठी व त्याकरीता वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.७८३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०१७-१८ श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाचे अनुषंगाने देश-विदेशातील साई मंदिरांचे श्री क्षेत्र शिर्डी येथे चर्चासत्र आयोजित करणे व शिर्डी महोत्सव कार्यक्रम आयोजीत करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे मंडपासह इतर अनुषंगीक व्यवस्था करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रु.१२,२९,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७** **आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**निर्णय क्र.७८४** मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२८ जुलै, २०१७ रोजी पारित केलेल्या शासन निर्णयानुसार संस्थानकडे देणगी रुपाने जमा झालेल्या सोने-चांदींच्या वस्तुपैकी, वितळविणे योग्य असलेल्या वस्तु वितळविणेत येऊन, त्यापासुन शुध्द सोने-चांदी प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही पुर्ण करणेत यावी. त्यानंतर या शुध्द सोने-चांदीपासून संस्थानसाठी आवश्यक असलेली नाणी तयार करुन घेण्यात. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**निर्णय क्र.७८५** जानेवारी- २०१६ ते माहे ऑक्टोबर- २०१६ या कालावधीमध्ये ३१% पेक्षा जास्त गैरहजरीचे प्रमाण असलेल्या कुशल/ अकुशल/ सुरक्षा कंत्राटी कर्मचाऱ्यांना दंड म्हणून इतर कंत्राटी कर्मचाऱ्यांना देण्यात आलेली ४०% वेतनवाढ, दिलेली नाही. सदरहू कंत्राटी कर्मचाऱ्यांची हजेरीचे प्रमाण व कामातील सुधारणा पाहून त्यांची रोखलेली वेतनवाढ पुढील महिन्यापासुन सुरु करणेत यावी. (कार्यवाही- कामगार अधिकारी)

---

**निर्णय क्र.७८६** श्री साईबाबा समाधी शताब्दी निमित्ताने श्री साईबाबांचा फोटो असलेली टपाल तिकिटे प्रकाशित करणेकामी भारतीय डाक विभागाने "माय स्टॅम्प शिर्डी साई टेंम्पल" साठी श्री साईबाबांचे/ मंदिराचे विविध फोटो वापरणेची परवानगी, तसेच श्रींची उच्च दर्जाची, सुस्पष्ट फोटोंची सॉफ्ट कॉफी मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यांचे विनंतीस अनुसरुन भारतीय डाक विभागास श्री साईबाबांचे/ मंदिराचे विविध फोटो वापरास परवानगी व श्रींची उच्च दर्जाची, सुस्पष्ट फोटोंची सॉफ्ट कॉफी उपलब्ध करुन देण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही- समाधी शताब्दी कक्षप्रमुख)

---

**निर्णय क्र.७८७** संस्थान रुग्णालयांचे विस्तारीकरण सुरु असून त्यासाठी जास्त डॉक्टर्सची आवश्यकता भासणार आहे. या नवीन घेण्यात येणाऱ्या डॉक्टरांच्या निवासासाठी अद्ययावत स्टाफ क्वॉटर्स असणे आवश्यक आहे. तसेच संस्थानवर प्रतिनियुक्तीने येणाऱ्या अधिकाऱ्यांसाठीही अद्ययावत निवासस्थाने असावीत. याकरीता नवीन सुसज्ज निवासस्थानांचे बांधकाम करणे, त्याचप्रमाणे सध्याच्या प्रशासकीय इमारतीमध्ये प्रशासकीय कार्यालयांसाठी जागा अपुरी पडत आहे, त्याकरीता श्रींचे समाधी शताब्दी वर्षानिमित्ताने नवीन प्रशासकीय इमारत उभारणेकामीचे सविस्तर प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने सभेसमोर सादर करणेत यावेत.

(कार्यवाही- कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग)

---

**निर्णय क्र.७८८** श्री साईबाबा रुग्णालयाकरीता एम.आर.आय. मशिन खरेदी करणेकामी ई-निविदा प्रक्रियेमधून प्राप्त झालेल्या निम्नतम दरधारकाबाबत इतर पुरवठाधारकांनी आजचे सभेत तक्रारी केल्या. यासाठी निम्नतम दरधारक कंपनीचे एम.आर.आय. मशिनची, ज्या ठिकाणी असेल, त्या ठिकाणी जाऊन, तांत्रिक बाबींची प्रत्यक्ष पहाणी करावी.
(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**निर्णय क्र.७८९** श्री.संजय काळे, कोपरगाव यांनी दीनदयाल बहूउद्देशीय प्रसारक मंडळ, यवतमाळ या संस्थेस आत्महत्याग्रस्तांच्या कुटूंबीयांचे पुनर्वसनासाठी संस्थानमार्फत देण्यात येणाऱ्या निधीबाबत, मा.उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये पी.आय.एल. एस.टी नं. ३००६०/२०१७ दाखल केलेली असलेची सभेस माहिती देण्यात आली.

यावर अशी चर्चा झाली की, या पी.आय.एल.वर मा.उच्च न्यायालयाचा निधी देण्यास मनाई आदेश नाही. याकरीता पंडीत दिनदयाल संस्था,यवतमाळ यांना निधी देणेस हरकत नाही. परंतु त्यापुर्वी पुढील सभेसमोर यावर चर्चा करणेत यावी. (कार्यवाही- मुख्यलेखाधिकारी)

---

**निर्णय क्र.७९०** संस्थानमध्ये विविध खरेदी/ सेवांसाठी संबंधीत विभागांमार्फत प्रसिध्द करण्यात येणाऱ्या ई-निविदा सुचना, प्रसिध्द केल्यानंतर माहितीसाठी व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्यांना मेलद्वारे पाठविण्यात याव्यात.
(कार्यवाही- सर्व विभागप्रमुख)

---

**निर्णय क्र.७९१** श्री साईबाबा समाधी शताब्दी वर्ष १ ऑक्टोबर, २०१७ पासुन सुरु होत असुन १८ ऑक्टोबर, २०१८ रोजी समाप्त होणार आहे. या संपुर्ण कालावधीत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत विविध धार्मिक, सामाजिक, सांस्कृतीक कार्यक्रमाचे आयोजन करणेत आलेले आहे. त्यासाठीच्या वेळापत्रकास दि.२०.०८.२०१७ रोजीच्या व्यवस्थापन समितीच्या सभेत मान्यता देण्यात आली आहे. तसेच देशात व परदेशात विविध ठिकाणी पादुका दर्शन सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करणेत आलेले आहे. १ ऑक्टोबर, २०१७ रोजी उदघाटन सोहळा आयोजित करणेत आलेला असुन १८ ऑक्टोबर,२०१८ रोजी समारोप कार्यक्रम आयोजित करणेत आलेला आहे. समाधी शताब्दी वर्ष हे १०० वर्षातुन एकदाच साजरे करणेत येणार आहे. श्री साईबाबांचे जीवनकार्याचा व विचारांचा प्रचार-प्रसार व्हावा यासाठी संपूर्ण समाधी शताब्दी वर्षातील कार्यक्रमांचे चित्रिकरण करुन कायमस्वरुपीसाठी Documentry तयार करणे आवश्यक आहे. सबब सदर Documentry साठी तातडीने Request for Quatation मागविणेत यावेत. यासाठी आवश्यक कार्यवाहीस व त्यासाठी येणा-या खर्चास मान्यता देणेत आली. (कार्यवाही- सीसीटीव्ही कक्ष विभागप्रमुख)

---

वरील निर्णय क्र.७५० ते ७९१ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०४.३० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.) | (सुरेश हावरे) |
| मुख्यकार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**